**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयात नविन आय.सी.यु. व C.V.T.S.O.T.2 या विभागासाठी लागणारे मशिनरी/ उपकरणे/ किरकोळ साहित्य खरेदीकामी प्रत्येक साहित्यांसाठी तीनही निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले नसल्यामुळे याकामी फेर ई-निविदा मागविण्यात याव्या, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०३ **किराणा माल व इतर वस्तु खरेदी चौथ्यांदा मागविण्यात आलेल्या ई-निविदा Commercial Bid उघडणे बाबत.**

किराणामाल व इतर वस्तू खरेदीकामी चौथ्यांदा ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. याकामी खालील २ निविदाधारकांनी निविदा सादर केल्या होत्या.

१. मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक

२. मे.शैला एंटरप्रायजेस, नाशिक

वरील अ.नं. १ व २ च्या निविदा तांत्रिक समितीने पात्र ठरविल्या होत्या. तथापि अ.नं.२ मे.शैला एंटरप्रायजेस, नाशिक यांचे Shop Act Licence Renew केल्याची खात्री करण्याचे ठरले होते. त्यास अनुसरुन मे.शैला एंटरप्रायजेस, नाशिक यांना Shop Act Licence (मुळ) प्रत सादर करणेसाठी दूरध्वनीवरून विचारणा केली असता, त्यांनी Shop Act Licence, नुतनीकरणासाठी सादर केलेले आहे. परंतू त्याची प्रत अद्याप प्राप्त झालेली नाही व Licence Renew करण्यासाठी Online Application Submission ची पावती ई-मेल द्वारे पाठविली आहे, ती सोबत अवलोकनार्थ सादर केली आहे. मे.शैला एंटरप्रायजेस, नाशिक यांनी चहा पावडर व कॉफी या दोनच Items चे Sample दिलेले आहेत. तरी त्यांची निविदा उघडावी अगर कसे?

तसेच चौथ्यांदा एकच निविदा असल्यामुळे मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांची निविदा उघडता येईल. त्यांनी किराणा मालाचे Items साठी Sample एका खोक्यात दिलेले आहेत.

चौथ्यांदा मागविण्यात आलेल्या किराणामालाच्या ई-निविदांचे Commercial Bid उघडून, प्रसादालयातील आचारी यांचेमार्फत किराणामालाचे Sample निवडता येतील व आचा-यांनी जे नमुने निवड केलेले असतील, त्याच Item साठी आलेल्या व्यापारी निविदांचा विचार करता येईल, त्याप्रमाणे पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत त्यातील आवश्यक किराणा माल खरेदी करता येईल.

तरी...

१. वरीलप्रमाणे निविदाधारकाने सादर केलेले नमुने मा.उपसमितीचे सभेत उघडून प्रसादालय आचारी यांचेमार्फत निवडणेस,

२. मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांच्या ई-निविदेचे Financial Bid उघडणेस,

३. मे.शैला एंटरप्रायजेस, नाशिक यांच्या ई-निविदेचे Financial Bid उघडावे अगर कसे?

वरीलप्रमाणे अ.नं. १, २ व ३ बाबत निर्णय होणेकामी मा. उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, किराणा माल व इतर वस्तु ज्या कालावधीसाठी खरेदी करावयाच्या होत्या, तो कालावधी संपुष्टात आलेला आहे. तसेच याकामी नवीन निविदा मागविणेची प्रक्रिया सुरु असल्यामुळे प्रस्तावित ई-निविदा रद्द करण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०४ **वाहनांच्या फुटलेल्या काचा बदलणे कामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडून निर्णय घेणेस व निम्नतम दर पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७ अन्वये ११ वाहनांच्या फुटलेल्या काचा बदली करणे कामी, विहित पध्दतीने कोटेशन मागवून घेण्यास व याकामी येणा-या अंदाजे रु.२,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. संबंधीत वाहनाचे तपशिवार माहिती खालीलप्रमाणे.

| अ.न. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | अ.न. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH-17-V-1702 | (टाटा सुमो) | 7 | MH-17-T-8505 | (भक्तनिवास बस) |
| 2 | MH-17-T-3103 | ( स्कुल बस ) | 8 | MH-17-K-9370 | (भक्तनिवास बस) |
| 3 | MH-17-T- 8503 | ( स्कुल बस ) | 9 | MH-17-T-7109 | (नगरसूल बस) |
| 4 | MH-17-T-9501 | ( स्कुल बस ) | 10 | MH-17-T-7111 | (मालवाहतूक गाडी) |
| 5 | MH-17-T-3301 | (भक्तनिवास बस) | 11 | MH-17-AG-2420 | (रुग्णवाहीका) |
| 6 | MH-17-T-3302 | (भक्तनिवास बस) | | | |

उपरोक्त प्रमाणे ११ वाहनांच्या फुटलेल्या काचा बदलणे कामी, बाहेरील ठिकाणचे काचा बसविणारे पुरवठाधारक यांचेकडून वरील तपशिलात नमूद केले प्रमाणे वाहनांकरीता विहित पध्दतीने दरपत्रक मागविण्यात आले होते.

त्यानुसार प्राप्त झालेल्या दरपत्रकांचे तपशिलवार माहिती खालील प्रमाणे.

| अ.न. | पुरवठादारांचे नाव व पत्ता | दरपत्रकांचा आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| १. | ओम प्रकाश छोटानी., श्रीरामपुर | २४६२९-१५-०३-२०१६ |
| २. | सचिन भालेराव., संगमनेर | २४६३२-१५-०३-२०१६ |
| ३. | महेश शर्मा., अस्तगाव | २५२४०-२३-०३-२०१६ |

उपरोक्त प्रमाणे ११ वाहनांच्या फुटलेल्या काचा बदलणेकामी, वर नमुद केले प्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.न. | पुरवठादारांचे नाव | दरपत्रकामधील एकत्रित मूळ दर रु. |
|---|---|---|
| १. | ओम प्रकाश छोटानी, श्रीरामपुर | ८५,३००/- |
| २. | सचिन भालेराव, संगमनेर | ९२,२००/- |
| ३. | महेश शर्मा, अस्तगाव | १,२६,०००/- + रबर वापरल्यास रु. ३००००/- मात्र जादा |

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित ११ वाहनांच्या फुटलेल्या काचा बदलणेकामी ओम प्रकाश छोटानी, श्रीरामपुर (साई मोटार ग्लास हाऊस) यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील रु.८५,३००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

०५ **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईप्रसादालय, साईप्रसाद निवासस्थान, मंदिर परिसर वॉटर हायड्रंट यंत्रणेचे साहित्य तसेच फायर विभागाकरीता इतर आवश्यक साहित्य खरेदी कामी पात्र तांत्रिक निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमूद आहे.

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साई प्रसादालय, साईप्रसाद निवासस्थान, मंदिर परिसरातील वॉटर हायड्रंट यंत्रणेचे खराब झालेले साहित्य तसेच फायर विभागाकरीता इतर आवश्यक साहित्य खरेदी कामी मा.व्य.समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेमधील विषय नं.२५ व निर्णय क्र.२५ नुसार ई- निविदा प्रक्रीया राबविणेत आलेली आहे. सदर प्रक्रिये मार्फत मागविणेत आलेल्या ऑनलाईन/ प्राप्त लिफाफ्यातील तांत्रिक बाबीची पडताळणी करणेकामी दि.२९.०३.२०१६ रोजी सकाळी ११.३० संस्थानचे अतिथीगृह येथील सभागृहात मा.प्र.अ.सो, मा.मुख्यलेखाधिकारी सो, फायर विभागाचे श्री गंगावणे सो, ई.डी.पी. विभाग तसेच ध्वनीक्षेपण विभागाचे यांचे उपस्थितीत खालील निविदाधारकांचे मागविलेल्या तांत्रिक बाबीची तपासणी संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत करणेत आली आहे. सदर साहीत्य पुरविणे कामी खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्याचा सविस्तर तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| अ. नं | निविदाधारकांचे नाव | दुकान नोंदणी दाखला | व्हॉट / टिन नंबर | पॅनकार्ड | बयाणा रक्कम रु.१०,०००/- | निविदा किमंत रक्कम रु.२०००/- | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | A | B | C | D | E | |
| ०१ | अजय इंडस्ट्रीज, मुंबई | √ | √ | √ | NSIC सर्टी. | √ | पात्र |
| ०२ | एशियन सेल्स, नाशिक | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| ०३ | बी.एस.ए. कॉर्पो, पुणे | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| ०४ | ईस्ट वेस्ट इंडस्ट्रीज, दिल्ली | √ | √ | √ | NSIC सर्टी. | NSIC सर्टी. | पात्र |
| ०५ | इंटरगल सेफ्टी इंजि, | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| ०६ | इन टाईम फायर ॲप्ला. प्रा.लि., मुंबई | √ | √ | √ | √ | √ | <u>अपात्र</u> (दुकाण नोंदणी दाखला दि.३१.१२.२०१५ अखेर आहे.) |
| ०७ | मनोज फायर इक्वी., पुणे | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| ०८ | रॅपीड सिटी सेल्स ॲण्ड सर्व्हि., पुणे | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| ०९ | सेफ प्रो फायर सर्व्हि., मुंबई | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| १० | तनया टेक इंफ्रा, औरंगाबाद | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| ११ | युनियन ट्रेडर्स, नाशिक | √ | √ | √ | √ | √ | पात्र |
| १२ | ओस्टफायर सेफ्टी इंजि., ठाणे | -- | -- | -- | -- | -- | निविदा ऑनलाईन न भरलेमुळे निविदा उघडणेत आली नाही. |

**मागणी-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साई प्रसादालय,साईप्रसाद निवासस्थान,मंदिर परिसरातील वॉटर हायड्रंट यंत्रणेचे खराब झालेले साहित्य तसेच फायर विभागाकरीता इतर आवश्यक साहित्य खरेदी कामी उपरोक्त निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्यापैकी अ.नं. ०६ यांचे दुकाण नोंदणी दाखला दि.३१.१२.२०१५ अखेर आहे तसेच व अ.नं.१२ यांनी निविदा ऑनलाईन न भरलेमुळे त्यांची निविदा उघडणेत आलेली नाही त्यामुळे दोनही निविदा अपात्र होत असून उर्वरीत १० पात्र ई-निविदाधारकांचे दरपत्रके उघडून न्युनतम दरधारकांकडून साहीत्य खरेदी करता येईल.

संस्थानमार्फत प्रसिध्द केलेल्या ऑनलाईन निविदेमध्ये उपरोक्त A, B, C, D व E बाबींची मागणी करणेत आलेली होती. परंतु टेक्नीकल बीड मध्ये अ.नं.०६ व १२ यांनी सादर केलेले कागदपत्रके मागणी प्रमाणे नसल्यामुळे त्यांना अपात्र करणेत आले व अ.नं.०१, ०२, ०३, ०४, ०५, ०७, ०८, ०९, १०, ११ या पात्र निविदाधारकांच्या

कमर्शियल निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sl.No | Description of Work / Item(s) | AJAY INDUSTRIES | Integral Safety Engineers | East West Engineering Company | BSA CORPORATION LIMITED | Safepro Fire Services Pvt Ltd |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate per nos. in Rs. | | | | |
| 1.0 | Fire equipment (IS code) | | | | | |
| 1.01 | RRL HOSE with Instentenious GM male /female coupling 15 mtr ISI mark hose with cupling & binding 36 nos. | 5600 | 4400 | 4363 | 8295 | 4083 |
| 1.02 | Ball walve 1" cast iron 24 nos. | 650 | 375 | 867 | 910 | 302 |
| 1.03 | 30 mtr hose reel hose (Thermo plast dubble layer) Hosereel pipe 30m with nozal & clip (tharmo plast dubble layer ) 24 nos. | 2100 | **1850** | 5981 | 4500 | 4500 |
| 1.04 | Porth mouth with lug GM 4 inch piller hydernt female brass cupling (mouth cupling with luges ) 12 nos. | 1550 | 1750 | 1589 | 2970 | **480** |
| 1.05 | lug GM Hydrent wall mouth (brass ) luges 24 nos. | 425 | 395 | 433 | 995 | 480 |
| 1.06 | Hydrant valve GM 63 mm. IS 5290 6 nos. | 5500 | 5750 | 5173 | 10620 | 5990 |
| 1.07 | Spindle gm 63 mm. IS 5290 6 nos. | 950 | 1810 | 1011 | 995 | 1800 |
| 1.08 | Hose rill hose drum with shutup nossel & clip (Tharmo plast dubble layer) U.L.Approud 6 nos. | 5800 | 3825 | 5981 | 7651 | NQ |
| 1.09 | hose box Key IS code 36 nos. | **15** | 70 | 85 | 85 | 30 |
| 1.1 | Water type fire Extingusher stored pressure 9 lit Standard IS code 50 nos. | **1300** | 1765 | 1705 | 3150 | 1390 |
| 1.11 | Foam type fire Extingusher stored pressure 9 lit Standard IS code 10 nos. | **1400** | 1850 | 1935 | 3440 | 1518 |
| 1.12 | Dcp type fire Extingusher trolley mounted 25 k.g. Standard IS code 5 nos. | 6750 | 9960 | 11531 | 9900 | 9500 |
| 1.13 | CO2 type fire Extingusher trolley mounted 22.5 k.g.Standard IS code 5 nos. | 13000 | 14200 | 23207 | 23050 | 16800 |
| 1.14 | CO2 type fire Extingusher 4.5 k.g. Standard IS code 25 nos. | **4100** | 4975 | 4709 | 7850 | 4390 |
| 1.15 | CO2 type fire Extingusher 2 k.g. Standard IS code 75 nos. | 2800 | **2775** | 3439 | 5870 | 3750 |

| Sl.No | Description of Work / Item(s) | Union Trading | Tanaya Tech Infra Pvt Ltd | Manoj Fire Equipments Pvt Ltd | Rapid city sales and services | Asian Sales Corporation |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate per nos. in Rs. | | | | |
| 1.0 | Fire equipment (IS code) | | | | | |
| 1.01 | RRL HOSE with Instentenious GM male /female coupling 15 mtr ISI mark hose with cupling & binding 36 nos. | 5410 | 4500 | **3844** | 9200 | 5317 |
| 1.02 | Ball walve 1" cast iron 24 nos. | 710 | **150** | 510 | 1840 | 696 |
| 1.03 | 30 mtr hose reel hose (Thermo plast dubble layer) Hosereel pipe 30m with nozal & clip (tharmo plast dubble layer ) 24 nos. | 2738 | 2400 | 1916 | 5100 | 2850 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.04 | Porth mouth with lug GM 4 inch piller hydernt female brass cupling (mouth cupling with luges ) 12 nos. | NQ | 1050 | 1893 | 2840 | NQ |
| 1.05 | lug GM Hydrent wall mouth (brass ) luges 24 nos. | 435 | **310** | 631 | 870 | 445 |
| 1.06 | Hydrant valve GM 63 mm. IS 5290 6 nos. | 6510 | **3600** | 6713 | 9830 | 6650 |
| 1.07 | Spindle gm 63 mm. IS 5290 6 nos. | 845 | **800** | 975 | 2850 | 870 |
| 1.08 | Hose rill hose drum with shutup nossel & clip (Tharmo plast dubble layer) U.L.Approud 6 nos. | 6460 | 5500 | **3729** | 14600 | 6700 |
| 1.09 | hose box Key IS code 36 nos. | 32 | 20 | 17 | 80 | 29 |
| 1.1 | Water type fire Extingusher stored pressure 9 lit Standard IS code 50 nos. | 1710 | 1450 | 1434 | 3440 | 1652 |
| 1.11 | Foam type fire Extingusher stored pressure 9 lit Standard IS code 10 nos. | 1915 | 1550 | 1434 | 3870 | 1800 |
| 1.12 | Dcp type fire Extingusher trolley mounted 25 k.g. Standard IS code 5 nos. | 7900 | 6800 | **5795** | 22400 | 7453 |
| 1.13 | CO2 type fire Extingusher trolley mounted 22.5 k.g.Standard IS code 5 nos. | 18130 | 14500 | **12393** | 23800 | 17200 |
| 1.14 | CO2 type fire Extingusher 4.5 k.g. Standard IS code 25 nos. | 5394 | 4950 | 4246 | 8500 | 5500 |
| 1.15 | CO2 type fire Extingusher 2 k.g. Standard IS code 75 nos. | 4200 | 3400 | 3156 | 6700 | 3872 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे श्री साईप्रसादालय, साईप्रसाद निवासस्थान, मंदिर परिसर वॉटर हायड्रंट यंत्रणेचे तसेच फायर विभागाकरीता इतर आवश्यक साहित्य खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

०६ **आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) व पूर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणुकीबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद-** १७(२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्ताविक:-** मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.२८.११.२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.५६३ अन्वये आर्थिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ संस्थान साठी अंतर्गत लेखापरिक्षकाची (Internal Auditor) नेमणुक करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येवुन, नामांकित (साधारणत:रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/ कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या) अंतर्गत लेखापरिक्षकांना बंद पाकिटामध्ये त्यांचे फीसह अर्ज करण्यासाठी आवाहन करणेत यावे. तसेच मुदतीमध्ये आलेल्या अर्जांची उपसमिती सभेसमोर छाननी करणेत येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षकांच्या फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ त्रीसदस्सीय समिती सभेपुढे सादर करणेत यावा. असा निर्णय संमत झाला होता.

फेब्रुवारी १६.दस्यीय समितीच्या दित्रिस.मा, २०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र९३. अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

प्रस्तावातील तक्यामध्ये नमुद केलेल्या अ अंतर्गत लेखापरिक्षक ४ते १.नं.(Internal Auditor) आर्थिक वर्ष २०१५ .त आलीता देण्यास मान्यकरीत नेमणुक करण्या १६-तसेच सन २०१६या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत १७-लेखापरिक्षक(Internal Auditor) नेमणुकीकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, नामांकित लेखापरिक्षकांकडून अर्जांची मागणी करणेत यावी असे ठरले .

त्यानुसार अंतर्गत लेखापरिक्षक व पुर्व लेखापरिक्षक नेमणुकीसाठी दि०७./०३/२०१६ ते दि २०१६/०३/१२. ळावर जाहिरात प्रसिध्द अधिकृत संकेतस्थनच्यापर्यंत संस्थाकरण्यात आली होतीअर्ज करण्याची अंतिम मुदत . १२.दि.०३.२०१६ अशी ठेवण्यात आली होती/अंतिम मुदतीपर्यंत अंतर्गत लेखापरिक्षक . पुर्व लेखापरिक्षक

कामकाजासाठी एकुण १९ निविदा१२ .तसेच दि .दरपत्रके प्राप्त झालेल्या आहेत //०३/२०१६ च्या विहित मुदतीनंतर एकुण ०६ संस्थाच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्यांचा तपशिल सोबत जोडलेल्या परिशिष्ठ ."अ" प्रमाणे

**मागणी:-** उपरोक्त प्राप्त निविदा/ दरपत्रके मा.उपसमितीचे सभेसमोर छानणी करणेत येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षकांच्या फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ त्रीसदस्सीय समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) व पूर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणूकीसाठी प्राप्त झालेली निविदा/ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत आली. या उघडण्यात आलेल्या निविदा/ दरपत्रकांची छाननी करणेत येऊन त्यामधील दरांचा तुलनात्मक तक्ता अंतीम निर्णयार्थ त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

०७. **मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविण्यात आलेल्या ई निविदांचे व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधिल तरतुद-** २१ (१) (घ) भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीच्या (त्रिसदस्य) दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेतील ठराव क्र.६४२

**मा.उच्च न्यायालय मान्यता-** दि.३०/०३/२०१६

**प्रास्ताविक-** साईभक्तांना प्रसादरुपी विक्री करण्यात येणारे मोतीचूर बुंदीचे लाडू, मंदिर दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटण्यात येणारी सुट्टी बुंदी तसेच प्रसादालयात भोजनात मिष्ठान्न म्हणून देण्यात येणारी बर्फी बनविणेकामी सन २०१६-१७ करिता ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार खालील तपशिलाप्रमाणे तीन ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. श्री साई सिध्दी महीला बचत गट, व्दारा सौ. रोहीणी राजेंद्र कोते, शिरडी.
२. श्री साई केटरर्स व्दारा शकुंतला नामदेव शिंदे, श्रीरामपूर
३. दि यशोधरा महीला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या, व्दारा सौ.संगिता अनिल दशपुते, नासिक

उपरोक्तप्रमाणे संस्थानला प्राप्त झालेल्या तीनही निविदाधारकांच्या ई निविदांचे तांत्रिक लिफाफे (Technical Bid) दि.०७/०४/२०१६ रोजी उघडण्यात आली आहेत.प्राप्त झालेल्या तीनही ई- निविदा या पात्र ठरल्या आहेत

आता सदरहु तीनही निविदाधारकांचे व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) उघडून न्युनतम दर असलेल्या मंजुर निविदाधारकास सन २०१६-१७ करीता कार्यादेश देता येईल.

**उपरोक्तप्रमाणे तीनही निविदाधारकांचे व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | तपशील | श्री साई केटरर्स व्दारा शकुंतला नामदेव शिंदे, श्रीरामपूर | दि यशोधरा महीला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या, व्दारा सौ.संगिता अनिल दशपुते, नासिक | श्री साई सिध्दी महीला बचत गट, व्दारा सौ. रोहीणी राजेंद्र कोते, शिरडी |
|---|---|---|---|---|
| | | | निविदेमधील दर रु. | |
| १ | गावरान तुपातील मोतीचूर बुंदिचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ.चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचा एक लाडू) हाताने पॅकींग करणे | २४०/- | २२०/- | २६०/- |
| २ | गावरान तुपातील मोतीचूर बुंदिचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ.चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचा एक लाडू) मशिनने पॅकींग करणे | २२१/- | २२०/- | १९५/- |
| ३ | गावरान तुपातील सुट्टी बुंदिचा प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ.चा दर प्रती ५०० नग पाकिटास (अंदाजे १०० ग्रॅम वजनाचे एक पॅकेट) हाताने पॅकींग करणे | २४०/- | २२०/- | २३५/- |
| ४ | गावरान तुपातील सुट्टी बुंदिचा प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ.चा दर प्रती ५०० नग पाकिटास (अंदाजे १०० ग्रॅम वजनाचे एक पॅकेट) मशिनने पॅकींग करणे | २२१/- | १८५/- | २१०/- |
| ५ | वनस्पती तुपातील रवा, खोबरा बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेचे) | २१०/- | १८५/- | २७०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ मध्ये साईभक्तांना प्रसादरुपी विक्री करण्यात येणारे मोतीचूर बुंदीचे लाडू, मंदिर दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटण्यात येणारी सुट्टी बुंदी तसेच प्रसादालयात भोजनात मिष्ठान्न म्हणून देण्यात येणारी बर्फी बनविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

---

०८. **श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडिकल गॅस प्लँट विभागाकरिता एअर कॉम्प्रेसर खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध एकूण ६ ऑपरेशन थिएटर्स, एकूण ४ सी. आर. यु., जी. आय. सी. यु आणि आय. सी. सी. यु. तसेच विविध वॉर्डस करिता सन २००५ यावर्षी सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांचेकडून एकूण रु. २७,५१,६८८/- इतक्या रकमेत बसवून घेण्यात आली आहे. सदर सिस्टीमच्या मेडिकल गॅस प्लँट मध्ये एकूण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ. विविध ॲक्सेसरीजसह बसविणेत आले आहेत.

मेडिकल गॅस प्लँट मध्ये एकूण दोन व्हॅक्युम पंप, दोन एअर कॉम्प्रेसर, कंट्रोल पॅनल इ. मशिनरी बसविणेत आले पासुन (६ वर्षापासून) २४ तास सतत सुरु असतात. ऑपरेशन थिएटर्स व आय. सी. सी. यु. येथे अत्यवस्थ रुग्णांना कृत्रीम श्वासोच्छवास देणेसाठी व्हेंटिलेटर्स करीता एअर कॉम्प्रेसर द्वारे कॉम्प्रेसड एअरचा पुरवठा पाईपलाईन द्वारे केला जातो. त्यामुळे सदर कॉम्प्रेसरवर कामाचा बोजा हा खूपच वाढलेला आहे.

सध्या ऑक्सिजन प्लँटमध्ये दोन कॉम्प्रेसर आहेत. त्यापैकी एक Kirloskar कंपनीचा कॉम्प्रेसर असुन तो सन २००५ या वर्षात खरेदी केलेला आहे. तो सध्या खराब झालेला असुन कंपनीने त्याचे उत्पादन देखील बंद केलेले आहे, त्यामुळे बाजारात त्याचे स्पेअर पार्टस् उपलब्ध होत नाहीत. त्यानंतर २०१२ मध्ये Screw Type 15 HP क्षमतेचा एक कॉम्प्रेसर खरेदी केला होता. सध्या सदर कॉम्प्रेसरवर पुर्ण लोड आहे. तो जर ऐनवेळेस बिघडला तर मोठी अडचण निर्माण होईल, त्यामुळे एक पर्यायी (Stand By) त्याच मॉडेलचा कॉम्प्रेसर खरेदी करणे गरजेचे आहे असे बायोमेडिकल विभागाचे म्हणणे आहे तुयामुळे बायोमेडिकल विभागाने (Oxygen Plant) दि.१८/०४/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये नवीन 15 HP क्षमता असलेल्या Compressor एक नगाची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेंट्रल मेडिकल गॅस सिस्टीम करीता एक नवीन एअर कॉम्प्रेसर तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पेशंटची संख्या व त्या अनुषंगाने व्हेंटिलेटर्स ची संख्या सन २००५ पेक्षा दुप्पटीपेक्षा अधिक प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे नवीन एअर कॉम्प्रेसर हा १५ एच. पी. क्षमतेचा घेणे योग्य राहील. १५ एच. पी क्षमतेच्या एअर कॉम्प्रेसर (सर्व ॲक्सेसरीज सह) करीता अंदाजे खर्चाकरिता M/s. Almed Equipments, Mumbai यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदकामी अंदाजे रक्कम रु. ३,६५,६२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र. ७२५ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडिकल गॅस प्लँट विभागाकरिता एअर कॉम्प्रेसर खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ३,६५,६२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या

वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नसून, मुंबई कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1) | M/s. Al. Med. Equipmut, Navi Mumbai | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे खरेदीकामी एक निविदा प्राप्त झाली आहे. परंतु, खरेदीकामी कमीत – कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे दिनांक १०/१२/२०१४ मंजूर टिप्पणीन्वये फेर निविदा मागविण्यास मान्यता मिळाली.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात ही फ्री प्रेस जनरल मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश – पुणे दिव्यमराठी – नाशिक पुण्यनगरी – औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानच्या संकेतस्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती तसेच एकूण ७२ पुरवठा धारकांना ई – मेलव्दारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले.

निविदा विक्रीची मुदत दिनांक ११/०५/२०१५ ते २५/०५/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती. तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दिनांक २७/०५/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात तीन निविदा प्राप्त झालेल्या असून मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1) | M/s. Datta Enterprises, Ahmednagar | 30/05/2015 |
| 2) | M/s. PPC, Poonam Pneumatic, Pune | 01/06/2015 |
| 3) | M/s. Parkeen Brothers, Mumbai | 01/06/2015 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या तीन तांत्रिक सिलबंद निविदा वैद्यकीय संचालक यांचे समोर दि. ०३/०८/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांच्या तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त तीनही निविदाधारकांच्या दिनांक १५/०९/२०१५ रोजी ऑनलाईन कमर्शियल उघडण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यानंतर दि. २०/०९/२०१५ रोजी ऑनलाईन डिजीटल सिगनेचरची मुदत संपल्यामुळे सदर खरेदीकामी पुन्हा निविदा मागविणे आवश्यक आहे.

परंतु, यापूर्वी सेंट्रल मेडिकल गॅस प्लॅंट येथे एक १५ एच पी क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर filter System सन २०१२ मध्ये खरेदी करण्यात आला होता. त्यावेळी आपलेकडे उपलब्ध असलेल्या जुने एअर कॉम्प्रेसरचे टॅंक त्याकरिता वापरण्यात आले त्यामुळे आता नवीन कॉम्प्रेसर खरेदी करतांना यापूर्वी खरेदी करतांना कॉम्प्रेसरची filter System व टॅंक वापरता येईल त्यामुळे फक्त एअर कॉम्प्रेसरची खरेदी करण्याची आवश्यकता आहे.

त्यानुसार एअर कॉम्प्रेसर १५ एच पी क्षमता (Flooer mounted with out filter System and without tank) करिता नव्याने दर मागविले असता, M/s. Atlas Copco यांचे अधिकृत M/s. Datta Enterprises यांनी रु.२,५०,२३०/- इतक्या खर्चाचे ई- मेलव्दारे पत्र पत्र क्र. DE/15/16/4090 Dt 11/09/2015 रोजी कळविले आहे.

उपरोक्त खर्च हा ३०००००/- पेक्षा कमी असल्यामुळे ई – निविदा मागविण्यची आवश्यकता नाही.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटल मधील १५ एच पी क्षमतेचा एअर कॉम्प्रेसर विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. २,५०,२३०/- चे खर्चास मान्यता असावी.

| S. n. | Description | M/s. Al-med Equipments, Mumbai | | M/s. Parkeen Brothers, Mumbai | | M/s. United Surgical, Thane | | M/s. Datta Enterprises, Ahmednagar | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make - Model - | Rate Per in Rs. | Make - Model - | Rate Per in Rs. | Make - Model - | Rate Per in Rs. | Make - Model - | Rate Per in Rs. |
| 1 | **Rotary Screw Air Compressor for Central Medical Gas Plant** | GX 11 MFG - by Atlas Copco Motor - 15Hp, Floor Mounted without Tank, pressure 4-20 kg cm2, along with starter, pressure switch, automatic start/ stop operation | 444375/- | Fs Cartis / SEG 15 Type - Lubricuted Air Cooled, Base Mounted Max - Pressure - 12 Bar, Capacity 42 CFM Motor - 11kw/ 15Hp Warranty 1 Year | 281250/- | SF - 11 Atlas capco Warranty - 3 Years Max. Pressure 8 Bar, Capacity 42.8 CFM Motor 11kw / 15Hp+ Air receiver 250 liter | 2475000/- | Atlas Capco Make Flocr Mounted Model - GX 11 p7.5 Floor Mounted 11kw (15Hp) Motor 57.2 CFM 7.5 kg Pressure | **225788/-** |
| | It should be oil free, air cooled | | | | | | | | |
| | Whisper-quiet, low sound operation max. 65 dB noise level | | | | | | | | Warranty- 1 year, AMC- Rs 15000/- year (without spares) |
| | It should be floor mountable without Storage Tank | | | | | | | | |
| | Pressure range from 40 kg/cm$^2$ to 220 kg/cm$^2$ | | | | | | | | |
| | Output Compressed Air should be Oil less, Clean & Dry Air | | | | | | | | |
| | It can be connected to existing Medical Gas Distribution System | | | | | | | | |
| | 15 hp compre ssors shall have spring type vibration isolation with smaller foot print | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | It should work continuously for more than 24 Hours without any damage to Compressor or its any part | | | | | | | | |
| | Control Panel if required should be supplied along with | | | | | | | | |
| | It should be supplied with all required electrical accessories like Starter, Preset Pressure switch, Low Pressure Alarm System, Electric Moisture Drain, Fuse less Circuit Breaker Control Panel, Automatic start/stop operation etc. | | | | | | | | |
| | All electrical items should be ISI marked, CE marked | | | | | | | | |
| | It should be supplied with Dryer- Dual Refrigerated Desiccant Dryer System, After cooler and Drain Trap, safety valves and required accessories if any | | | | | | | | |
| | The filtration system required for medical supply should be provided along with all accessories & disposables, Medical Filter Package. | | | | | | | | |
| | It should meet NFPA guidelines for medical air compressors | | | | | | | | |
| | Details of Air System : | | | | | | | | |
| | • A high-efficiency rotary screw air compressor | | | | | | | | |
| | • Low pressure drop piping | | | | | | | | |
| | • A high-efficiency moisture separator | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | • Oil removal down to 0.01 micron | | | | | | | | |
| | • Two stages of filtration to deliver best performance reduce pressure losses and extend operating life. | | | | | | | | |
| | A high-efficiency coalescing filter-10 micron coalescing air filter and canister | | | | | | | | |
| | A high-efficiency particulate filter-Particulate removal to industry-leading 1 micron | | | | | | | | |
| | • 3 micron, water-resistant air intake filter | | | | | | | | |
| | • Stainless steel, braised heat exchanger for low losses, high thermal efficiency and long service life | | | | | | | | |
| | • High Efficiency, NEMA rated, ISI marked electric Motors should be used | | | | | | | | |
| | • 100% duty cycle, low noise levels should be maintained | | | | | | | | |
| | • Belt drive for maximum flexibility in pressure selection | | | | | | | | |
| | • High temperature, high pressure and anti-rotation shutdown | | | | | | | | |
| | • Micro processor control for load/no-load and auto shut-off | | | | | | | | |
| | • Premium drive system to minimize belt stretching and increase air output. | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Compressor design shall also include stainless steel valves with PTFE coated aluminum die-cast valve plates- Solenoid drain valve and high-efficiency moisture separator to permanently discharge condensate | | | | | | | | |
| | • Intake and discharge flexible connectors, a solenoid valve discharge line unloader, an isolation valve, an air cooled after cooler, a moisture separator with automatic drain, and a high discharge temperature shutdown switch on each cylinder. | | | | | | | | |
| | • Integrates the compressor, dryer and controls into an energy-reducing, optimized system | | | | | | | | |
| | • Incorporates the entire supply side system into one whisper-quiet package to enable installation anywhere | | | | | | | | |
| | • Heavy steel cabinets should be powder coated to withstand the wear and tear of any | | | | | | | | |
| | Type of environment for many years. Highest quality components from internationally | | | | | | | | |
| | Renowned suppliers should be used. | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | • Compressor features hydraulic fittings and reverse rotation sensors. Sound attenuating foam barriers with oil resistant coating should be incorporated to reduce noise levels. | | | | | | | | |
| | • Plug-and-play simplicity | | | | | | | | |
| | • Energy efficient operation | | | | | | | | |
| | Total System Warranty: 3 Years | | | | | | | | |
| | Transportation, Installation and connection to the existing Pipeline System should be free of cost | | | | | | | | |
| | The product should be time tested, branded and should be OEM | | | | | | | | |
| | ❖ Cost of consumables (or items not included in warranty or CMC) should be given | | | | | | | | |
| | ❖ All Technology should be mandatorily with safety approval - UL, IEC & CE. | | | | | | | | |
| | ❖ Approval certificates should be submitted. | | | | | | | | |
| | ❖ AMC/CMC Cost- AMC should be 3% of basic cost including Taxes. CMC should be between 3 to 5% of basic cost including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | | | | | |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सेंट्रल मेडिकल गॅस प्लॅंट विभागाकरिता एअर कॉम्प्रेसर खरेदीकामी **M/s. Datta Enterprises, Ahmednagar** यांचे रु.२,२५,७८८/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०९. **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता डस्टबीन खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद –** १७ (२) ण

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** नवीन प्रस्ताव

**प्रास्ताविक –** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे हाऊस किपिंगचे काम आऊटसोसींग पध्दतीने मे. बी.व्ही.जी. इंडिया., पुणे यांना दिलेले आहे. रुग्णालयाचे आरोग्याचे दृष्टीने परिसरातील स्वच्छतेसाठी वेगवेगळया ठिकाणी डस्टबीन आवश्यकता आहे. दि. १३/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये ७० नग डस्टबीनची मागणी केलेली होती. परंतु, त्यामध्ये त्यांनी डस्टबीनची साईज् दिलेली नव्हती.

सध्या त्यांच्याकडे असलेल्या डस्टबीन या वापरुन खराब झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी नवीन खालील प्रमाणे ७० नग डस्टबीन खरेदी करणे गरजेचे आहे. त्यामुळे मे. बी.व्ही.जी. इंडिया., पुणे यांनी दि. १९/१२/२०१५ खालील डस्टबीनची मागणी केलेली आहे.

| अ. नं. | तपशिल | नग संख्या |
|---|---|---|
| १) | व्हील डस्टबीन – १०० लीटर | ३५ |
| २) | व्हील डस्टबीन – १०० लीटर | ३५ |

सदरचे डस्टबीन खरेदीकामी मे. साई एन्टरप्राईजेस्, श्रीरामपूर यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दूरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार मे. साई एन्टरप्राईजेस्, श्रीरामपूर यांनी दि. ०४/१२/२०१५ रोजीचे कोटेशनव्दारे दर कळविले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| Sr. No. | Description | Make | Qty | Rate Per in Rs | Total Amt in Rs |
|---|---|---|---|---|---|
| १) | Wheeled bin – 100 Litre | Nilkamal | 35 | 3450.00 | 120750.00 |
| २) | Wheeled bin – 120 Litre | Nilkamal | 35 | 3750.00 | 131250.00 |
| | | Total Amt. in Rs. | | | 252000.00 |

उपरोक्त डस्टबीन खरेदीकामी अंदाजे रु. २,५२,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** मे. बी.व्ही.जी. इंडिया., पुणे यांचे दि. १३/१०/२०१५ व दि.१९/१२/२०१५ चे (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/१०/२०१५) अन्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सध्या त्यांच्याकडे असलेल्या डस्टबीन या वापरुन खराब झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी नवीन खालील प्रमाणे ७० नग डस्टबीन खरेदी करणे गरजेचे आहे. त्यानुसार सदर ७० नग डस्टबीन खरेदीकामी रु.२,५२,०००/- इतका खर्च येणार आहे.

सदर डस्टबीन विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी व याकामी येणा-या रु. २,५२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता.

त्यानुसार, दि. ०२/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ४३ अन्वे कोटेशन मागवून खरेदीस व येणा-या रु. २,५२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ३३११, दि. ०५/०३/२०१६ अन्वये एकूण ११ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि. १२/०३/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे दूरध्वनीव्दारे अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांना कोटेशन देणेबाबत तगादा करण्यात आला होता त्यानुसार ०२ सिलबंद कोटेशन दि. १८/०३/२०१६ रोजी उशिराने प्राप्त झाले आहेत व M/s. S. B. Surgical, Pune यांचे दि. २२/०३/२०१६ रोजीचे ई – मेलव्दारे, तसेच M/s. Fibrecrafts India Ltd., Pune यांचे ई – मेलव्दारे औषध भांडार विभागात प्राप्त दि. ०६/०४/२०१६ रोजी व M/s. S. Ramanathan यांचे दि. ०३/०४/२०१६ रोजीचे ई – मेलव्दारे कोटेशन उशिराने प्राप्त झाले आहे. परंतु, तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल त्यामुळे ते विचारात घ्यावे लागेल असे नम्र मत आहे.

**प्राप्त कोटेशनचा तपशिल खालीलप्रमाणे -**

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Nilkamal Limited., Mumbai | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२३/०३/२०१६ (उशिराने प्राप्त) |
| 2 | M/s. Niral Plastic., Aurangabad | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०६/०४/२०१६ (उशिराने प्राप्त) |



करणेत आले.

| S. | Description | M/s. Nilkamal | M/s. Niral Plastic., | M/s. Fibrecrafts | M/s. S. B. | M/s. S. |
|---|---|---|---|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 3 | M/s. S. B. Surgical, Pune | ई – मेलव्दारे प्राप्त दि. २२/०३/२०१६ (उशिराने प्राप्त) |
| 4 | M/s. Fibrecrafts India Ltd., Pune | ई – मेलव्दारे औषध भांडार विभागात प्राप्त दि.०६/०४/२०१६ (उशिराने प्राप्त) |
| 5 | M/s. S. Ramanathan | ई– मेलव्दारे औषध भांडार विभागात प्राप्त दि.०६/०४/२०१६ (उशिराने प्राप्त) |

वरीलप्रमाणे मुदतीनंतर प्राप्त झालेले सर्व कोटेशन विचारात घेऊन, त्यासह त्यामधील ०२ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर समक्ष उघडणेत येऊन, कोटेशनमधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| S. N. | Description | M/s. Nilkamal Ltd., Mumbai | | M/s. Niral Plastic., Aurangabad | | M/s. Fibrecrafts India Ltd., Pune | | M/s. S. B. Surgical, Pune | | M/s. S. Ramanathan | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make - Nilkamal Model- | Rate Per in Rs. | Make- Model- | Rate Per in Rs. | Make- Fibrecrafts Model- | Rate Per in Rs. | Make- Model- | Rate Per in Rs. | Make- Model- | Rate Per in Rs. |
| 1 | Dustbin 100 Ltr. OD – 500X 500X 700 mm 35 nos. | | 2583/- | | --- | | | STD | **<u>924.00</u>** | | --- |
| 2 | Dustbin 120 Ltr – with wheel Dimension – 550(L) x480 (W) 960 (H)mm Description – Plastic two wheeled bin 35 nos. | 560 (L) x 477(W) x 955 (H) mm | **<u>2221/-</u>** | Green Colour Dustbin Height 37" / Top 19" x 21" Tee /UV Protected | 2550/- | Hight 3 Ft | 2812.50 | STD | 3037.00 | Gurbage bin 120 Ltr Delivery Charges Extra | 2925/- |
| | Warranty- | 6 month | | | | | | 1 year | | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता डस्टबीन खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ०४** **श्रींचे चावडीकरीता चांदीचे मखर व फोटो फ्रेम देणगी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री अश्विनकुमार एन. जैस्वाल, रा.वडोदरा, गुजरात यांनी दि.०५.०४.२०१६ चे पत्रान्वये श्रींचे चावडीतील महिलांच्या बाजूने चांदीचे मखर व मखरातील फोटोकरीता चांदीची फ्रेम देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केलेली आहे.

श्रींची चावडी मंदिर हे पुर्वीचे शिर्डी गावाची चावडीचे ठिकाण असल्याने याठिकाणी पुर्वीपासून स्त्री व पुरुष असे दोन वेगवेगळे प्रवेश पुर्वीपासून करण्यात आलेले आहे. चावडीमध्ये श्रीसाईबाबा दिवसाआड झोपत असे असा उल्लेख श्रीसाईसच्चरितामध्ये आढळुन येतो. तसेच श्रींचे नित्याची गुरुवारची पालखी मिरवणूकीने श्रींच्या पादुका-सटका व चावडीतील फोटो समाधी मंदिरातून द्वारकामाईमध्ये जाते. द्वारकामाईमध्ये श्रींचे भजन होऊन त्यानंतर श्रींचे पादुका-सटका व फोटो पालखीमध्ये ठेवून चावडीपर्यंत नेण्यात येते. त्यानंतर चावडीमध्ये आरती करण्यात येते. त्यावेळी श्रींचे चावडीतील फोटोला चिलीम दाखविण्यात येते. तसेच आरतीनंतर श्रींच्या पालखीची मिरवणूक चावडीतून पुन्हा समाधी मंदिरामध्ये काढण्यात येते. त्यामुळे श्रींचे चावडीला अनन्य साधारण महत्व आहे.

सध्या चावडीमध्ये पुरुषांकडील बाजुने श्रींचा फोटो ठेवणेसाठी एक चांदीचे मखर ठेवण्यात आलेले आहे व त्यामध्ये चांदीच्या फ्रेममध्ये श्रींचा फोटो व त्यासाठी चांदीची फ्रेमही ठेवण्यात येतो. त्याचप्रमाणे चावडीचे पश्चिमेकडे स्त्रीयांना दर्शनाची सोय करण्यात आलेली आहे. त्याठिकाणीही हुबेहुब पुरुषांकडील मखरासारखे परंतु मेटलचे मखर व फोटो ठेवण्यात आलेला आहे.

अर्जदार श्री अश्विनकुमार जैस्वाल, रा.गुजरात यांचे विनंतीनुसार श्रींचे चावडीतील पश्चिमेकडील महिलांच्या बाजुने पुरुषांकडील असलेले चांदीचे मखर व फोटो व फ्रेम प्रमाणे चांदीचे मखर वा फोटो-फ्रेम तयार करुन देणगीदाखल स्विकारणेकामी सदर प्रस्तावास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.२६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अर्जदार श्री.अश्विनकुमार जैस्वाल, गुजरात यांचे विनंतीनुसार श्रींचे चावडीतील पश्चिमेकडील महिलांच्या बाजुने पुरुषांकडील बाजुस असलेप्रमाणे चांदीचे मखर व फोटोफ्रेम देणगीदाखल स्विकारणेत यावी. याकामी चांदीसह जेवढा खर्च येईल, त्या खर्चाच्या रकमेची देणगी पावती त्यांना देण्यात यावी. देणगीदारास पावती देताना योग्य ती खबरदारी घ्यावी, असे ठरले.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं. ०५** **उत्सवातील बॅण्ड पथकाचे मानधन वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** सालाबादप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव -२०१६ गुरुवार दि.१४/०४/२०१६ ते शनिवार दि.१६/०४/२०१६ अखेर असा तीन दिवस साजरा केला जाणार आहे. पुर्वीपासून तीनही उत्सवामध्ये श्री.बालमभाई पापाभाई सय्यद यांचे बॅण्डपथकाला मिरवणूकीमध्ये बॅण्ड वादनाचे काम नेमणेत येते. याबाबत दि.०१/०३/२०१६ रोजीचे टिपणीव्दारे श्री.बालमभाई पा.सय्यद यांचे बॅण्ड पथकास मागील वर्षाप्रमाणे रु.२,०००/- व श्री.सखाराम रा.गुरव यांना रु.३०००/- असे एकुण रु.५,०००/- देणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

श्री.बालमभाई पा. सय्यद, साई दरबार बॅण्ड पथक, राहाता यांनी त्यांचे दि.१४/०३/२०१६ रोजीचे अर्जाव्दारे उत्सवातील बॅण्ड पथकचे मानधनात वाढ करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच त्यांना रु.५०००/- इतके मानधन मिळावे अशी विनंती त्यांनी आपल्या अर्जामध्ये केलेली आहे. श्री.बालमभाई पापाभाई सय्यद हे पुर्वीपासून श्रींच्या श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी उत्सवामध्ये मिरवणूकीमध्ये बॅण्ड वाजविण्याचे काम करीत आहे.

श्री.रामकृष्ण सखाराम गुरव, कोपरगांव यांचेदि.०१/०४/२०१६ रोजीचे अर्जानुसार उत्सवातील चौघडा वाद्याचे मानधनात वाढ करुन मिळणेबाबत विंनती केलेली आहे. त्यांनी रु.५०००/- इतके मानधन मिळावे अशी विनंती आपल्या अर्जामध्ये केलेली आहे. श्री.रामकृष्ण सखाराम गुरव, कोपरगांव हे अजोबा, वडीलांपासून श्रींच्या श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी उत्सवामध्ये चौघडा वाद्याचे काम करीत आहे.

तरी सध्या असलेल्या महागाईचा विचार करता त्यांचे मानधनामध्ये वाढ करावी, असे वाटते. श्री.बालमभाई पापाभाई सय्यद, राहाता व श्री.रामकृष्ण सखाराम गुरव, कोपरगांव यांना प्रती उत्सवाकरीता रुपये रु.४५००/- देणेस काही हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी सदर मानधनाची वाढ श्रीरामनवमी उत्सव- २०१६ पासून देणेस मान्यता असावी. तरी सदर खर्चाची तरतूद उत्सव बजेटमधून करण्यात येते. तरी याबाबत मान्यता मिळणेस विंनती.

**निर्णय क्र.२६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बालमभाई पापाभाई सय्यद, राहाता यांच्या अर्जाचा व वाढत्या महागाईचा विचार करता, श्री.बालमभाई पापाभाई सय्यद, राहाता व श्री.रामकृष्ण सखाराम गुरव, कोपरगाव यांना यापुढे प्रति उत्सवाकरीता (उत्सवातील तीन/ चार दिवसांसाठी) रु.४०००/- मात्र बॅण्ड वादनाचे मानधन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं. ०६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये साईसेवा उपक्रम चालू करणे संदर्भात प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्तांचे व गोर गरीबांचे आजार बरे करण्यासाठी विभुतिचा वापर करीत असे. बदलत्या काळानुसार साईबाबांचे हे उदिष्ट पुढे चालु ठेवण्यासाठी संस्थानने जनरल स्पेशिलटी रुग्णालय सुरू केले. भक्तांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत गेली व त्याप्रमाणे वैदयकिय सेवा देणे क्रमप्राप्त असल्याने शिर्डीसारख्या लहान ठिकाणी सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु केले. सुपर स्पेशालिटी सेवांमध्ये दर्शनाला येणारे भक्त व पंचक्राशीतील गोर गरीब जनता यांना अत्यावश्यक असलेली–हदय शस्त्रिक्रया, न्युरो सर्जरी विभाग, युरो सर्जरी, रेडिओलॉजी विभाग इत्यादी सुपर स्पेशालिटी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहे. दिवसेंदिवस श्रीसाईबाबा संस्थान रुग्णालयाची व्याप्ती वाढत आहे. माफक दरामध्ये उपचार होत असल्याने रुग्णांची संख्या वाढत आहे. गोर गरीब भक्तांना रुग्णांना रुग्णालयाविषयी आजाराविषयी शासनाच्या वेगवेगळया योजने संदभार्त माहिती नसते तसेच उपलब्ध सुविधेबददल व त्यांच्या रुग्णालयाविषयी अडीअडचणी ब-याच वेळा रुग्णांची हेळसांड होण्याची शक्यता असते.

डॉ. हेगडेवार हॉस्पिटल औरंगाबाद या रुग्णालयात सेवाव्रती हा उपक्रम गेले १५ वर्षापासुन अविरत चालु आहे. सेवाव्रत उपक्रम म्हणजे सेवानिवृत्त व्यक्ति रोज ०२ ते ०४ तास विनामोबदला हेगडेवार हॉस्पिटल प्रमाणे सेवा देतात. यामध्ये वय वर्ष ६० पासुन वय वर्ष ९५ पर्यत व वर्ग ०१ मधील अधिकारी समाविष्ट असुन अशा प्रकारे एकुण् ५५ व्यक्ती १० ते १५ वर्षापासुन सेवा देत आहेत.हॉस्पिटलने १७ ठिकाणी यांची नियुक्ती केलेली आहे. या सर्वांनी आपआपसामध्ये करावयाची सर्वकामे ठरवुन घेतलेले आहे. अशा व्यक्तिनां रुग्णालयामार्फत ओळखपत्र देण्यात येत आहे. यामध्ये रुग्णालयामध्ये आलेल्या रुग्णांना आजारानुसार कोणत्या डॉक्टराकडे जावे याबाबत मार्गदर्शन करणे ,सदर रुग्णास शासनाच्या काही सेवासवलती आहेत किंवा नाहीत याबाबत माहिती देणे, अशिक्षीत व वयोवृदध् रुग्णास केसपेपर काढणेपासुन ,संबंधीत डॉक्टरांचे केबीनपर्यंत सोडणे व उपचारानंतर डॉक्टरांनी सांगितलेप्रमाणे गोळया औषधे कशाप्रकारे घ्यावयाचे याबाबत मार्गदर्शन करणे. ऑपरेशनच्या रुग्णांना धीर देणे तसेच गरिब रुग्णांना समुपदेशन करणे व गरज पडल्यास स्वखर्चाने उपचारासाठी बील भरणे. मुख्य म्हणजे रुग्णाच्या मनावरील ताण कमी करण्यास मदत होते.

डॉ हेगडेवार हॉस्पिटल सेवाव्रती मध्ये समाविष्ट करणेसाठी वैदयकिय संचालक यांच्यामार्फत सदर व्यक्तिची मुलाखत घेवुन त्याची सेवा देण्याविष्यीची भावना तपासली जाते. वैदयकिय संचालक यांना व्यक्ति योग्य असल्यास त्याला सेवाव्रत करण्याची संधी देण्यात येते. वैदयकिय संचालकामार्फत सेवाव्रती व्यक्तिची दर महिन्याला बैठक घेवुन त्यांच्या अडिअडचणीविषयी विचारणा केली जातेव त्यावर तोडगा काढला जातो. सेवाव्रत करणारे व्यक्ति यांचा वाढदिवस साजरा करणे व अशा काही छोटया छोटया गोष्टीतुन त्याचे मनोबलव प्रोत्साहन वाढवले जाते. मुख्य म्हणजे रुग्णालयामार्फत सदर सेवेकरी व्यक्तिंना कुठल्याही प्रकारची सवलत, भोजन, चहा, मोफत उपचार किंवा वैदयकिय परतावा दिला जात नाही.

**श्री साईबाबा संस्थान हॉस्पिटलमध्ये सेवाव्रती सारखी उपक्रम चालु केल्यास खालीलप्रमाणे कामे करण्यास मदत होईल.**

- रुग्णांना श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलबाबत योग्य मार्गदर्शन करणे.
- रूग्णालयामध्ये आलेल्या रुग्णांना आजारानुसार कोणत्या डॉक्टरांकडे जावे याबाबत मार्गदर्शन करणे.
- शासनाच्या काही सेवा सवलती आहेत किंवा नाहीत याबाबत रुग्णांना माहिती देणे.
- अशिक्षीत व वयोवृदध् रुग्णास केसपेपर काढणेपासुन, संबंधीत डॉक्टरांचे केबीन पर्यंत सोडणे.
- उपचारानंतर डॉक्टरांनी सांगितलेप्रमाणे गोळया औषधे कशाप्रकारे घ्यावयाचे याबाबत मार्गदर्शन करणे.
- ऑपरेशनच्या रुग्णांना धिर देणे तसेच गरीब रूग्णांना समुपदेशन करणे व गरज पडल्यास उपचारासाठी चॅरिटी व राजीव गांधी योजने अंतर्गत मदत करणे.
- रुग्णांच्या मनावरील ताण कमी करणे.
- रुग्णांच्या रुग्णालयाविषयी काही तक्रारी असतील तर उप वैदयकिय संचालक किंवा वैदयकिय संचालक यांच्या मार्फत सोडविण्यास मदत करणे.

साईसेवा उपक्रमामध्ये व्यक्ति समाविष्ट करण्यासाठी खालील नियम करता येतील.

1. सेवा करणा-या व्यक्तिचे शैक्षिणक पात्रता किमान १०/१२ वी असावी जेणेकरुन रुग्णांना योग्य माहिती देता येईल.
2. साईसेवा देणारी व्यक्ति शारीरीक दृष्टया व मानसिक दृष्टया पुर्णपणे सक्षम असावी.
3. साईसेवा करणा-या व्यक्तिवर कुठलाही गुन्हा दाखल नसावा अथवा सदर व्यक्ति गुन्हेगार नसावा व त्याबाबत पोलीस स्टेशनचे ना हरकत प्रमाणपत्र हॉस्पिटल प्रशासनाकडे जमा करावे लागेल.
4. साईसेवा करणारे व्यक्तिला मोफत जेवण व दोन वेळेचा चहा देता येईन.
5. साईसेवा करणारी व्यक्तिला श्री साईबाबा संस्थानमध्ये सेवेत समाविष्ट केले जाणार नाही किंवा सदर व्यक्तिला सेवे बाबत हक्क सांगता येणार नाही.
6. साईसेवा देणारी व्यक्तिची नियुक्ती वैदयकिय संचालक यांचे मार्फत प्रत्यक्ष मुलाखत घेवुन केली जाईल.
7. साईसेवा देणारी व्यक्तिची सेवा समाधानकारक असेल तरच त्यांच्याकडुन सेवा घेतली जाईल.
8. साईसेवा देणारी व्यक्तिची सेवा असमाधानकारक असेल तर त्यांना सेवा बंद करण्याचा अधिकार वेदयकिय संचालक यांना राहतील.
9. साईसेवा करणारी व्यक्ति रुग्णास सवलत देण्याबाबत आग्रह करु श्कणार नाही किंवा त्यांना त्याबाबत अधिकार राहणार नाही.
10. साईसेवा करणारी व्यक्तिला रुग्णालयाच्या कोणत्याही प्रकारची नशा मदयपान करता येणार नाही आढळल्यास तत्काळ त्याची सेवा खंडीत केली जाईल.
11. साईसेवा करणा-या व्यक्तिला रुग्णालयाच्या कोणत्याही प्रकारच्या कामामध्ये हस्तक्षेप करता येणार नाही.
12. साईसेवा करणा-या व्यक्तिस रुग्णालयामार्फत ओळखपत्र देण्यात येईल व सेवा कालावधी संपुष्टात आले नंतर रुग्णालय प्रशासनाकडे जमा करावे लागेल. साईसेवा कालावधीत ओळख पत्राचा इतर कुठेही गैरवापर करता येणार नाही.

डॉ हेगडेवार हॉस्पिटल औरंगाबाद च्या धर्तीवर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रायोगिक तत्वावर साईभक्तांकडुन अशा प्रकारचा साईसेवा उपक्रम सूरू करता येईल. त्यासाठी जेष्ट नागरीक संघटना, साईभक्त, निवृत्त अधिकारी तसेच संस्थानमधील निवृत्त कर्मचारी यांची मदत घेवुन हा उपक्रम सुरू करता येईल.

साईसेवा उपक्रमा संदर्भात दि.१६/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा नविन प्रसादालय येथील हॉलमध्ये मा. जिल्हाधिकारी श्री. अनिलजी कवडे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मा.कार्यकारी अधिकारी श्री बाजीराव शिंदे साहेब, प्रशासकिय अधिकारी श्री गमे, व श्री गोंदकर यांचे उपस्थीत सभा घेणेत आली. यावेळी हेगडेवार हॉस्पिटल, औरंगाबाद येथील श्री.पी.आर.पान्से , सौ मिनाक्षी सुर्यवंशी , श्री देशपांडे आदि मान्यवर उपस्थीत होते.

समवेत श्री साईबाबा संस्थानचे सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी तसेच राजश्री शाहु महाराज जेष्ट नागरीक संघटना कोपरगाव, कोपरगाव जेष्ठ नागरीक सेवा मंच व महिला समिती, जनसेवा कल्याण समिती महाराष्ट्र राज्य, कोपरगाव, सर्वदायी मित्र जेष्ट नागरीक संघटना अस्तगाव, वात्सल्य वृदधाश्रम, राहाता, रसिक कला सांस्कृतीक मंडळ, राहाता, जेष्ट नागरीक विरंगुळा मंच, पुणतांबा. आधारवड ग्रुप मुठेवडगाव. अष्टविनायक सामाजिक व सांस्कृतिक मित्रमंडळ, श्रीरामपुर. साई श्रदधा ग्रुप, श्रीरामपुर. जनविकास फायनान्स ग्रुप, श्रीरामपुर. पंचवटी ज्येष्ट नागरीक संघटना, सात्रळ. लोमेश्वर जेष्ट नागरीक संघटना,लोणी. स्वच्छता अभियान व हरित शिर्डी. योगा ग्रुप, शिर्डी. प्रभात शाखा,शिर्डी व सप्तश्री ग्रुप शिर्डी, जेष्ट नागरीक संघटनेचे सदस्य मोठया संख्येने उपस्थीत होते.

ज्येष्ट नागरीक संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व श्री साईबाबा संस्थानचे सेवा निवृत्त कर्मचारी यांनी श्री साईबाबा हॉसिपटल येथे साईसेवा उपक्रम चालु करणेस सहमती दर्शवली आहे.

तरी वरील नियम व अटीच्या अधिन राहुन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रायोगिक तत्वावर साईसेवा उपक्रम चालु करणे संदर्भात योग्य तो निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद नियम व अटीच्या अधिन राहून श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रायोगिक तत्वावर साईसेवा उपक्रम चालू करणेस मान्यता देण्यात आली. तसेच या उपक्रमामध्ये सेवा देणा-या जेष्ठ नागरीकांना मोफत चहा, नाष्टा, जेवण व मागणी केल्यास साईधर्मशाळा विभागाकडे निवासव्यवस्थाही देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ प्र.अधिक्षक, प्रसादालय, प्र.अधिक्षक, कॅन्टीन, प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं. ०७** **ॲंजिओग्राफी विनाशुल्क करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोग रुग्णांची संख्या जास्त प्रमाणात आहे. अशा रुग्णांच्या हृदयाची ॲन्जिओग्राफी ही तपासणी केली जाते. सदर तपासणी नंतरच्या रिपोर्टनुसार रुग्णांची ॲन्जिओग्राफी, बायपास किंवा इतर उपचार करण्याचे निश्चित केले जाते. रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यन्वित असून सदर योजनेत ॲन्जिओग्राफी मोफत करण्यात येते. मात्र सदर ॲन्जिओग्राफीचे असलेले चर्जेस रु. ५०००/- सदर योजनेतून मिळत नाही,मात्र त्यानंतरची असलेली शस्त्रक्रीया व प्रोसिजर यांचे चार्जेस संस्थानला मिळत असतात.

रुग्ण सदर योजनेतच ॲन्जिओग्राफी करण्याचे प्रमाण जासुत आहे. तर चार्जेस मध्ये ॲन्जओग्राफी करण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे ॲन्जिओग्राफी तपासणी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सर्वच रुग्णांना मोफत केल्यास रुग्णांची संख्या चांगल्या प्रमाणात वाढुन पुढील उपचार सदर योजनेत अथवा योजनेत न बसलेले रुग्णांना चार्जेस भरुन करता येईल.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ॲन्जिओग्राफी तपासणी विनाशुल्क करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ॲन्जिओग्राफी तपासणी विनाशुल्क करणेसाठी एका आर्थिक वर्षामध्ये किती तपासण्या मोफत व किती तपासण्या दर आकारुन केल्या जातात. तसेच सदरहू तपासणी विनाशुल्क केल्यास संस्थानवर किती आर्थिक बोजा पडेल यासह अभ्यासपुर्वक फेर प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा. त्याचबरोबर सी.टी.स्कॅन व एमआरआय या तपासण्यांचीही उपरोक्तप्रमाणे माहिती सादर करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ०८** **श्री.सतिष गोविंद कासार, प्र.अधिक्षक यांना वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०२/०२/२०१६ रोजीच्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये श्री.सतिष गोविंद कासार यांचा जादा वैद्यकिय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर मा.चेअरमन साहेब यांनी सदर प्रस्तावावर खालील सुचना केलेल्या आहेत-

०१) सदर प्रस्तावातील वैद्यकिय बिलाची पुन्हा तपासणी करावी.
०२) सदर वैद्यकिय बिले हे Cross checking करुन उपचार घेतलेल्या ठिकाणी फोन करुन त्याची सत्यता बघावी.
०३) तसेच संबंधितांनी तेथील हॉस्पिटलचे सर्टीफिकेट / प्रमाणपत्र जोडलेले आहे किंवा नाही याची तपासणी करावी.

वरील बाबींची फेर तपासणी केली असता, संबंधितांनी उपचार घेतलेल्या ठिकाणी फोन करुन विचारले असता कोणत्याही त्रुटी आढळून आलेल्या नाहीत. तसेच वैद्यकिय खर्चापोटी सत्यता तपासून घेतलेली आहे.तसेच भगवती स्पेशालिटी एन्डोस्कोपी हॉस्पिटल, नाशिक यांनी दि.०९/०३/२०१६ चे पत्रान्वये सदर उपचार तातडीने घेणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>**– सुचना केलेल्या बाबींची फेर तपासणी केली असता, तसेच संबंधितांनी उपचार घेतलेल्या ठिकाणी फोन करुन विचारले असता कोणताही त्रुटी आढळून आलेल्या नाहीत. तसेच श्री. कासार यांनी ज्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेले आहेत्या हॉस्पिटलची वैद्यकिय खर्चापोटी सत्यता तपासून घेतलेली आहे. तसेच भगवती स्पेशालिटी एन्डोस्कोपी हॉस्पिटल, नाशिक यांनी दि.०९/०३/२०१६ चे पत्रान्वये सदर उपचार तातडीने घेणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. सबब श्री.सतिष गोविंद कासार यांनी सादर केलेल्या वैद्यकिय बीलाचा परतावा मिळणेकामी रु.४,७५,७१७/- पैकी खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम रु.३,४१,०२६/- मात्र इतकी देता येईल असे मत आहे.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे फेर सादर करण्यास विनंती असावी.

**निर्णय क्र.२७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.वैद्यकिय संचालक यांनी श्री.सतिष गोविंद कासार, प्र.अधिक्षक यांनी सादर केलेल्या बीलांची संबंधीत रुग्णालयाकडून सत्यता तपासून घेतलेली असल्यामुळे नियमाप्रमाणे सदरहू बीलाच्या ८०% रु.३,४१,०२६/- मात्र रक्कम श्री.सतिष गोविंद कासार, प्र.अधिक्षक यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ०९** **डॉ.धिरज मोरे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट यांचे वेतनाबाबत.**

**प्रस्ताव-** कंत्राटी व व्हिजीटींग कार्डीओलॉजीस्टची संख्या कमी पडत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३७/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर मा. न्यायालयाने दि. १०/०४/२०१५

रोजीचे आदेशानुसार चार कार्डीओलॉजीस्टना Ad hoc बेसिस वर नेमणूक करणेस मान्यता दिलेली आहे. सदर मंजुरीनुसार डॉ. धिरज मोरे, डीएम यांना रु ६१,०००/- एकत्रित मासिक वेतनावर नेमणूक देण्यात आलेली आहे.

डॉ. धिरज मोरे यांनी दि. १०/१०/२०१५ रोजीचे अर्जान्वये हजर तारखेपासुन वेतन वाढवुन मिळणेबाबत विनंती केल्याने त्यांना त्याच पदावर काम करणारे डॉ. भारत जैन यांचेप्रमाणेच रु. १,५०,०००/- एकत्रित मासिक मानधन देणेबाबतचा विषय दि. २८/१२/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ६२५ खालीलप्रमाणे झाला आहे.

"डॉ. धिरज मोरे यांनी मासिक मानधन वाढ मिळणेबाबत केलेली विनंती संस्थान वकीलांरणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे निदर्शनास आणून द्यावे."

उपरोक्त निर्णयानुसार विधी विभागाने संस्थान वकिलामार्फत सिव्हील ॲप्लिकेशन तयार करुन रुग्णालयाकडे तपासणीसाठी पाठविले आहे. सदर सिव्हील ॲप्लिकेशनमधील प्रेज मध्ये डॉ धिरज मोरे यांना मानधन वाढविणेबाबत नमुद केले आहे मात्र किती मानधन वाढवावे? याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नाही. तथापि, मा व्यवस्थापन समितीसमोर ठेवलेल्या प्रस्तावामध्ये डॉ. धिरज मोरे यांना रु. १,५०,०००/- इतके मानधन देणेबाबतचा उल्लेख केलेला आहे. परंतु निर्णयात मात्र फक्त 'मासिक मानधन वाढ मिळणेबाबत' असा उल्लेख केलेला आहे. सदरचे निर्णयाबाबत प्र. विधी अधिकारी यांनी संस्थानचे वकील यांचेशी चर्चा केली असता मा. त्रिसदस्य समितीत झालेला निर्णय आहे तसाच सिव्हील ॲप्लीकेशचे प्रेज मध्ये नमुद केला जात असल्याने डॉ धिरज मोरे यांचेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयात डॉ. धिरज मोरे यांना मासिक एकत्रित मानधन वेतन रु १,५०,०००/- देणेबाबत स्पष्ट उल्लेख असणे गरजेचे आहे, असे संस्थानचे वकीलांनी सांगितले .

तरी, संस्थान वकील यांनी सुचविलेप्रमाणे डॉ. धिरज मोरे यांच्याबाबतीतल्या निर्णयात रक्कम रु. १,५०,०००/- एकत्रित मासिक मानधन देता येईल, असे मत आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वकिल यांनी सुचविलेप्रमाणे डॉ.धिरज मोरे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट यांच्या बाबतीतल्या निर्णयामध्ये रु.१,५०,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनाचा उल्लेख करुन मा.उच्च न्यायालयामध्ये तसा अर्ज दाखल करणेस मान्यता देण्यात आली.**

**परंतु डॉ.धिरज मोरे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट यांचे वेतनाबाबत मा.खंडपीठाचा आदेश होईल त्या तारखेपासून सुधारीत वेतन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं. १०** **डॉ.धिरज मोरे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असलेने त्यांना पुढील नेमणूक आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्टचे २ पदे व नॉन इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्टचे १ पद मंजुर असुन डॉ. बजाज व डॉ. गौरव वर्मा यांची इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. तथापि, डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना त्यांनी केलेल्या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत खाते चौकशी पूर्ण होईपर्यंत दि. ०८/११/२०१४ पासून संस्थान सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही डॉक्टर्सना निलंबित केल्याने रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी Ad hoc बेसिसवर तात्पुरत्या स्वरुपात नविन कार्डीओलॉजीस्टची नेमणूक करणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. ३९३७/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर मा. न्यायालयाने दि. १०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार चार कार्डीओलॉजीस्टची वैद्यकीय अधिका-यांना Ad hoc बेसिस वर नेमणूक करणेस मान्यता दिलेली आहे.

मा. न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ९०/ २०१५ दि. २५ मे २०१५ अन्वये डॉ. धिरज भागचंद मोरे यांची दि. २२/०५/२०१५ पासून पुढे १ वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर तात्पुरती नेमणूक करणेत आलेली आहे. सदर नेमणूक कालावधी दि. २१/०५/२०१६ अखेर संपुष्टात येत आहे.

तरी, डॉ. धिरज भागचंद मोरे यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांना यापूर्वी दिलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्ती आहे तशाच ठेवून नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याचे दिनांकापासून ०१ वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.धिरज मोरे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांना यापूर्वी दिलेल्या नेमणूक आदेशातील अटी/ शर्तीवर, नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याचे दिनांकापासून पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ११ वैद्यकीय संचालक पदाची वयोमर्यादा शिथील करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/९) का.सोळा मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडील आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदरच्या आकृतीबंधामध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलकडे वैद्यकीय संचालक या पदाचा समावेश आहे.

श्री साईबाबा संस्थानमार्फत जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि. २६/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रत्येक पदासाठी असलेली पात्रता नमुद करुन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वैद्यकीय संचालक पदासाठी खालीलप्रमाणे पात्रता नमुद करण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Designation | Pay Scale | Permanent Post | Contract Post | Total | Qualification | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | By Nomination | By Promotion |
| 01 | Medical Director | 12000-16500<br>Pay Band 15600-39100<br>Grade Pay 7600 | 01 | 00 | 01 | 1. Age not more than 55 years.<br>2. MBBS from any Government recognized University.<br>3. DHA/MD/MHA/ M Phil in Hospital administration from recognized university.<br>4. Experience of minimum 300 beded hospital administration for 07 years.<br>5. Experience in NABH accreditation process is preferable. | 1.MBBS from any Government recognized University.<br>2. DHA/ MD/ MHA / M Phil in Hospital administration from recognized university.<br>3. Experience Minimum 07 years as Dy. Medical Director / Medical Officer / Medical Administrator/ Medical superintendent.<br>4. Experience in NABH accreditation process is preferable. |

तथापि, याबाबत आजपावेतो शासनाकडून कुठल्याही प्रकारची मान्यता मिळालेली नाही.

श्री साईबाबा रुग्णालयाची स्थापना सन २००६ मध्ये झाली. तथापि, सदरचे रुग्णालयाची उभारणी व इतर तत्संबंधी कामासाठी डॉ. टाकळकर यांना वरिष्ठ वैद्यकीय प्रशासक म्हणून नेमण्यात आले होते. त्यानंतर खाली नमुद केलेप्रमाणे वैद्यकीय संचालकांकडे पदभार होता.

| अ.नं. | नाव | कालावधी | वय | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. टाकळकर | दि. ११/०२/२००५ ते दि. १७/०५/२००६ | ६४ वर्षे | वरिष्ठ वैद्यकीय प्रशासक म्हणून नेमणूक |
| ०२. | डॉ. टिंगरे | दि. ०३/०५/२००६ ते दि. ३०/११/२००६ | ५४ वर्षे | --- |
| ०३. | डॉ. ढवळे | दि. ०१/१२/२००६ ते दि. २९/०२/२००८ | ५८ वर्षे | --- |
| ०४. | डॉ. बोबडे | दि. ०७/०४/२००८ ते दि. ०५/०४/२०१० | ५९ वर्षे | जाहिरातीत वयाची अट ५५ ठेवण्यात आली होती. |
| ०५. | डॉ. ब्रिगे श्रीमती मुखर्जी | नेमणूक करण्यात आली होती परंतु कामावर हजर झाल्या नाहीत. | ६२ वर्षे | जाहिरातीत वयाची अट ठेवण्यात आली नव्हती. |
| ०६. | डॉ. म्हस्के | दि. ०६/०४/२०१० ते दि. ०५/०८/२०१२ | --- | उपवैद्यकीय संचालक यांचेकडे तात्पुरता पदभार |
| ०७. | डॉ. मकवाना | दि. ०६/०८/२०१२ ते दि. १७/०३/२०१४ | --- | वैद्यकीय प्रशासक यांचेकडे तात्पुरता पदभार |
| ०८. | डॉ. प्रभाकरराव | दि. १८/०३/२०१४ ते दि. ०६/०१/२०१६ | --- | वरिष्ठ भुलतज्ञ यांचेकडे तात्पुरता पदभार |

दि. २६/१०/२०१३ रोजी वर्तमानपत्रात वैद्यकीय संचालक व इतर पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती. सदर जाहिरातीत वैद्यकीय संचालक पदासाठी वयाची अट ५० वर्ष ठेवण्यात आलेली होती.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशानुसार दि. ०१/०२/२०१४ रोजी जाहिरातीस अनुसरुन पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर त्याचा सविस्तर अहवाल मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे सादर करणेत आला होता.

त्यावर मा. अध्यक्ष व मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य, त्रिसदस्य समिती यांनी दि. १७/०२/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांना पत्र दिले पत्रातील अ.नं. ४ मध्ये खालीलप्रमाणे आहे.

It seems from the advertisement published, that though the age of the candidate was mentioned in the advertisement, it was also mentioned that any condition can be relaxed by the Sansthan. It seems from noting recorded by the interview committee that some members were not interviewed because they were overage. In my opinion, the committee should have interviewed the persons though they were overage as it is the discretion of Sansthan, whether to relax age limit or not? and in proper cases the age limit could have been relaxed considering nature of the post and experience of the person to be appointed. For example, the post of Medical Director and Residency Deputy Medical Director, are very important posts, which require person having vast experience in the field and mere age in such post cannot be considered to debar proper and qualified person it also seems that initially the persons who applied were very less in number as they might not get sufficient time and therefore, advertisement was given in national news papers. However, very few persons seem to have appeared for the interview. In order to get good number of experienced and well qualified persons, it will be in the interest of trust and patients in general to re-advertise the posts. In an advertisement it be specifically mentioned that age or any other condition may be relaxed in proper cases, if the Three Member Committee of Sansthan finds it necessary in appropriate cases.

त्यानंतर दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २७१ नुसार "दि. ०१/०२/२०१४ रोजी झालेल्या मुलाखती रद्द करणेत याव्यात, रुग्णालयांसाठी भरावयाच्या विविध पदांसाठी फेरजाहिरात देण्यात यावी व सदर जाहिरातीमध्ये वैद्यकीय संचालक पदासाठी वयापेक्षा अनुभवाला प्राधान्य देण्यात यावे, वयोमर्यादा किती ठेवायची याबाबत विचार विनिमय करणेत येऊन निश्चित करणेत यावी व मा. औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे समिती गठीत करणेत येऊन मुलाखती घेण्यात याव्यात" असे ठरले आहे.

उपरोक्त निर्णयानुसार नंतरच्या जाहिरातीत वैद्यकीय संचालक पदासाठी वयोमर्यादा टाकण्यात आली नव्हती. जाहिरातीनुसार पात्र अर्जांची निवड करुन दि. ०१/०३/२०१५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. मा. न्यायालयाने मुलाखती घेण्यासाठी निवड केलेल्या तज्ञ समितीने मुलाखती घेतल्यानंतर वैद्यकीय संचालक या पदाचे अहवालामध्ये "In advertisement no age limit is mentioned so selection list should be decided as per govt. recruitment rules regarding age criteria" असा अभिप्राय दिलेला आहे. त्यावर दि. १२/०३/२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आली. त्यामधील शुद्धीपत्रकात वैद्यकीय संचालक पदाच्या नियुक्तीबाबत पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे. The decision regarding post at Sr. No. 1 i.e. Medical Director is kept reserved on technical grounds.

उपरोक्त निर्णय क्र. २७१ व शुद्धीपत्रकाचा आधार घेऊन डॉ. आर.व्ही. प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांच्यापुरती विशेष अपवादात्मक बाब म्हणून वयोमर्यादा शिथील करण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीची मान्यता न घेता शासनास परस्पर जा.नं.एसएसएसटी/वशी६९२/२०१५ दि.०५/०५/२०१५ अन्वये तत्कालीन मा कार्यकारी अधिकारी साहेब यांनी पाठविलेला होता.

सबब, मा. त्रिसदस्य समितीची मान्यता न घेतल्याने, एच आर विभाग, रुग्णालयाचे दि. १३/०९/२०१५ रोजीची मंजुर टिपणीनुसार जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/३६३०/२०१५ दि. २८/०९/२०१५ अन्वये उपरोक्त दि. ०५/०५/२०१५ रोजीचे पत्रान्वये वैद्यकीय संचालक पदाची वयोमर्यादा शिथील करणेबाबतचा प्रस्ताव रद्द करणेबाबत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेबाबत आले होते.

त्यानंतर विधी व न्याय विभाग क.सासंवि-२०१५/२०५/प्र.क्र.५३/का.१६ दि. ०६/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये रा. व. चव्हाण, कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ०५/०५/२०१५ रोजीचा प्रस्ताव मागे घेण्याबाबतची कारणमिमांसा नमूद करुन स्वयंस्पष्ट अहवाल संबंधित सर्व कागदपत्रांसह उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

त्यास अनुसरुन याबाबतचा प्रस्ताव दि. २८/१२/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेसमोर ठेवणेत आला होता. त्यावर पूर्वी निर्णय झालेप्रमाणे वैद्यकीय संचालक पदासाठी वयापेक्षा अनुभवाला प्राधान्य देणे हे उचित ठरेल पण त्याचबरोबर विशेष अपवादात्मक बाब म्हणून वयाची अट ही कोणत्याही एका व्यक्तीसाठी शिथील करणे योग्य ठरणार नाही असे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेबाबतचे प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र. ६६३ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णय क्र. ६६३ नुसार शासनाचे विधी व न्याय विभागास कळविलेनंतर याबाबत शासनाची संधिग्धता संपुष्टात आल्यानंतर पुढील कार्यवाही करणे उचित ठरेल तसेच, दि. २८/१२/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य

समिती सभेतील निर्णय क्र. ६३० नुसार संस्थान रुग्णालयामध्ये आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिका-यांच्या पदांबरोबरच वैद्यकीय संचालक पद भरावयाचे ठरल्याने दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २७१ नुसार वैद्यकीय संचालक पदासाठी वयापेक्षा अनुभवाला प्राधान्य देण्यास व वयोमर्यादा निश्चित करणेबाबत दि. २०/०१/२०१६ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत आली होती. त्यावर मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

सेवानियमानुसार जाहिरात द्यावी. वैद्यकीय संचालक पदासाठी वयोमर्यादा अट शिथील करण्यासाठीचा शासनास पाठविलेला प्रस्ताव मागे घेणेबाबत त्रि. समितीने ठराव केलेला आहे. सेवानियमानुसार जाहिरात द्यावी.

दि. २८/१२/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६३० व मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दिलेल्या उपरोक्त निर्देशानुसार वैद्यकीय संचालक पदाची जाहिरात प्रसिद्ध केली असुन आकृतीबंधानुसार वयोमर्यादा ५५ ठेवलेली आहे. सदर जाहिरातीत Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to make any changes / relaxation in above mention posts असेही नमुद केलेले आहे. त्यानुसार वैद्यकीय संचालक पदासाठी जाहिरातीत नमुद केलेल्या कालावधीत (दि. ०५/०३/२०१६ पर्यंत) ०९ अर्ज प्राप्त झालेले आहेत. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मुलाखती घेणेकामी नियुक्त केलेल्या समितीमधील मा. डीन, बीजेएमसी, पुणे यांचेकडे अर्ज छाननीसाठी पाठविणेत आलेले आहेत.

प्र. वैद्यकीय संचालक डॉ. पाटील यांनी याकामी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत –

- Age relaxation can be done but upper age limit to be fixed for interview.
- Staffing pattern age limit is 55 years as per advertise of 2016 of 60 is age of Retirement of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
- More experience will be more aged candidate.
- So interview committee to be guided in this matter.
- Rules of Governmnent to be followed for the age limit of Medical Director.

वैद्यकीय संचालक हे पद अतिशय जबाबदारीचे असल्याने त्यासाठी आकृतीबंधात दर्शविलेनुसार उच्च शैक्षणिक पात्रता व अनुभवी उमेदवार मिळणेकामी वेळोवेळी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुनही फक्त वयोमर्यादेमुळे प्रशिक्षित व अनुभवी उमेदवार मिळत नाहीत. त्याचप्रमाणे आकृतीबंधास शासनाची अद्याप मान्यता मिळालेली नसल्याने वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल या पदाची वयोमर्यादा शिथील करणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे दि. १२/०४/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. २७१ नुसार कार्यवाही करता येईल तसेच याकामी शासनाकडे पत्रव्यवहार करण्याची आवश्यकता नाही असे वाटते.

तरी, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, जाहिरातीत Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to make any changes / relaxation in above mention posts अशी अट असल्याने संस्थानकडे असलेल्या राखीव अधिकारात वैद्यकीय संचालक पदासाठी आता आलेल्या अर्जातुन जाहिरातीत नमुद केलेल्या वयापेक्षा जास्त परंतु कमाल ६५ वर्षे वयोमर्यादा असणारा तसेच अनुभवी उमेदवार प्राप्त झाल्यास त्याची नेमणूक करण्यसाठी पूर्वी निर्णय झालेप्रमाणे वयोमर्यादा शिथील करणेस मान्यता असावी. तसेच या कामी आकृतीबंधात वैद्यकीय संचालक पदासाठी वयोमर्यादा ६५ वर्षे दर्शविणेसाठी शासनास कळविणेसही मान्यता असावी.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२७५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय संचालक पदाची वयोमर्यादा शिथील करणेसाठी शासनास कळविणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मा.समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आली असता त्यावर मा.अध्यक्ष महोदय यांनी याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा अशी लेखी सुचना केली होती.**

**परंतु वेळोवेळी जाहिरात प्रसिध्द करुनही वैद्यकीय संचालक पदाच्या वयोमर्यादेमुळे प्रशिक्षीत व अनुभवी उमेदवार मिळत नसल्याने तांत्रिक दृष्टया रुग्णालयाचे व्यवस्थापनावर नियंत्रण राहिलेले नाही, याकरीता उच्च शिक्षीत व अनुभवी उमेदवार स्थायी स्वरुपात तात्काळ नेमणे गरजेचे आहे. तसेच कोणत्याही पदासाठी वय, शैक्षणिक पात्रता इत्यादी बाबी संस्थान व्यवस्थापनाच्या कक्षेत येत असल्याने वैद्यकीय संचालक पदाची भरती करणेकामी उमेदवाराची वयोमर्यादा शिथील करणेसाठी मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अप्लीकेशन दाखल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या प्रस्तावासही समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेणेत येऊन कार्यवाही करण्यात आलेली आहे, याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं. १२ **डॉ.महेश जगन मिस्तरी, क्लिनिकल असिस्टंट (सी.व्ही.टी.एस) यांचा कन्सल्टंट कार्डीयाक सर्जन पदावर काम करणेस परवानगी मिळणेस दि.११.०२.२०१६ रोजीचे अर्जाबाबत.**

प्रस्ताव- रुग्णलयाचे रिक्त पदांवर भरती करणेसाठी मुलाखती घेणेकामी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी नियुक्त केलेल्या समितीने डॉ. महेश मिस्तरी यांची क्लिनीकल असिस्टंट (सीव्हीटीएस) या पदासाठी मुलाखत घेऊन शिफारस केल्याने दि. १२/०३/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णयानुसार डॉ. महेश मिस्तरी यांची

जा.नं.एसएसएस/वशी-एसएसबीएच/ एचआर/४१५४/२०१५ दि. १४ मार्च २०१५ अन्वये क्लिनीकल असिस्टंट (सीव्हीटीएस) पदावर नेमणूक करणेत आली असुन ते दि. २८ मार्च २०१५ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधात कार्डीयाक सर्जनसाठी ०३ पदे मंजुर असुन त्यासाठी एचसीएच/ डीएनबी ही शैक्षणिक पात्रता दर्शविली असुन अनुभव २ वर्ष दर्शविलेला आहे. सध्या ०३ कार्डीयाक सर्जनची स्थायी पदावर नेमणुक झालेली आहे. त्यापैकी डॉ. विद्युतकुमार यांनी दि. ०५/०३/२०१६ रोजी एक महिना पुर्व राजीनामा नोटीस दिलेली आहे तथापि त्यांचा राजीनामा आजतागायत मंजुर झालेला नाही व ते दि. ०५/०४/२०१६ पासुन कामावरही येत नाहीत. सबब, स्थायी स्वरुपात सध्या दोनच कार्डीयाक सर्जन कार्यरत असुन एक कार्डीयक सर्जन (डॉ. कैचे) व्हिजीटींग पद्धतीने दर बुधवारी येतात.

आता, डॉ. महेश जगन मिस्तरी, क्लिनीकल असिस्टंट (सीव्हीटीएस) यांचा दि. ११/०२/२०१६ रोजीचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाला आहे सदर अर्जात त्यांनी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

"I undersigned, Dr. Mahesh Jagan Mistari, Mch(CVTS) Cardiac Surgeon from Lokmanya Tilak Medical College, Sion Hospital, Mumbai. I was working for one year after Mch in seth G.S. Medical College, KEM hospital, Parel, Mumbai as lecture on teaching post.

Sir I joined, Shri Saibaba hospital in March 2015 on post of Clinical Assistant in Cardiac Surgery. I am performing independent surgery as well as assisting in Saibaba Hospital daily.

Kindly consider me eligible candidate for performing dependent cases as well as consultant cardiac surgeon."

उपरोक्त विनंती विचारात घेऊन, प्र. वैद्यकीय संचालक यांनी डॉ. विद्युतकुमार-कार्डीयाक सर्जन, डॉ. नरोडे-सिनीअर इंन्टेसिव्हीस्ट व डॉ. कैचे- कार्डीयाक सर्जन यांचेकडून अभिप्राय मागितले होते. संबंधितांचे अभिप्रायासह दि. २२/०३/२०१६ रोजी प्र. वैद्यकीय प्रशासक यांनी याकामी टिपणी सादर केली होती. सदर टिपणीवर मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी " क्ष बाबत तपासणी होणे आवश्यक आहे." असे निर्देश दिले आहेत.

मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देशानुसार याबाबत माहिती घेतली असता डॉ. महेश मिस्तरी यांनी स्वतंत्ररित्या शस्त्रक्रिया केल्याचे उपलब्ध कागदपत्र / रजिस्टरवरुन आढळून येत नाही. मात्र "डॉ. मिस्तरी हे स्वतंत्ररित्या कार्डीयाक सर्जरी करु शकतील" असे कार्डीयाक सर्जन डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी अभिप्राय दिले आहेत तसेच व्हिजीटींग पद्धतीने कार्यरत असलेले डॉ. कैचे यांनी "डॉ. मिस्तरी यांनी स्वतंत्ररित्या शस्त्रक्रिया केल्याचे" अभिप्राय दिलेले आहेत. त्याचप्रमाणे डॉ. मिस्तरी यांनी उपरोक्त दोन्ही डॉक्टरांना सहाय्यक म्हणून शस्त्रक्रिया केल्याची नोंद रजिस्टरमध्ये आहे.

तरी, कार्डीयाक रुग्णांची व रुग्णालयाची तातडीची गरज विचारात घेता, डॉ. महेश जगन मिस्तरी, क्लिनीकल असिस्टंट (सीव्हीटीएस) यांचेकडे रुग्णालयाचे आकृतीबंधात कार्डीयाक सर्जन पदासाठी दर्शविलेली शैक्षणिक पात्रता असल्याने तसेच उपरोक्त अभिप्राय विचारात घेता त्यांना स्थायी स्वरुपात कार्डीयाक सर्जन उपलब्ध होईपर्यंत अथवा पुढील ओदश होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात कार्डीयाक सर्जन पदाचे काम देणेस व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.वैद्यकीय संचालक यांचाअभिप्राय व कार्डीयाक रुग्णांसाठी कार्डीयाक सर्जनची असलेली गरज विचारात घेता तसेच डॉ.महेश जगन मिस्तरी, क्लिनिकल असिस्टंट (सी.व्ही.टी.एस) यांचेकडे रुग्णालयाच्या आकृतीबंधात कार्डीयाक सर्जन पदासाठी दर्शविलेली शैक्षणिक पात्रता असल्यामुळे, स्थायी स्वरुपात कार्डीयाक सर्जन उपलब्ध होईपर्यंत अथवा पुढील आदेश होईपावेतो, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत डॉ.महेश जगन मिस्तरी यांना तात्पुरत्या स्वरुपात कार्डीयाक सर्जन पदावर काम करणेस परवानगी देण्यात आली.**

**तसेच त्यांना आदेश दिल्याच्या तारखेपासून संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता लागु करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं. १३ **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रस्तावित न्युरो आय.सी.यू. व एस.आय.सी.यू.साठी आवश्यक असलेले मनुष्यबळ घेणेकामी दि.२८.१२.२०१५ रोजी मा.त्रिसदस्य सभेत झालेल्या निर्णयाबाबत.**

प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२/०६/२०१४ रोजीचे निर्णय क्र. ५२५ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल मधील न्युरो ओटीतील रिकव्हरी रुम तसेच आर्थो ओटीतील रिकव्हरी रुम व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करुन तेथे १० ते १२ बेडचे न्युरो आयसीयु व सर्जिकल आयसीयु बनविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार आर्थो ओटी, रिकव्हरी रुम व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करण्याची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत पूर्ण झालेली असुन सध्या मशिनरी खरेदी बाबतची कार्यवाही सुरु आहे. याकामी खालीलप्रमाणे मनुष्यबळ आवश्यकता आहे.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पदे | | | कार्यरत | | | रिक्त पदे | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | एकूण | स्थायी | कंत्राटी | एकूण | स्थायी | कंत्राटी | एकूण | |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| ०१. | निवासी वैद्यकीय अधिकारी | ४० | ०० | ४० | २८ | ०२ | ३० | १२ | -०२ | १० | ०८ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२. | परिसेविका | २१ | ०० | २१ | १४ | ०० | १४ | ०७ | ०० | ०७ | ०२ |
| ०३. | परिचारिका | १६० | ४० | २०० | १०२ | ९८ | २०० | ५८ | -५८ | ०० | ३० |
| ०४. | वॉर्डबॉय / मदतनीस | १३ | ७२ | ८५ | १९ | ७० | ८९ | -०६ | ०२ | -०४ | ०८ |
| ०५. | आया | ०८ | ३२ | ४० | ०५ | ५३ | ५८ | ०३ | -२१ | -१८ | ०८ |
| ०६. | स्विपर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०८ |
| | | | | | | | | | | **एकुण** | ६४ |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे परिसेविका या पदावर सेवाज्येष्ठता यादीनुसार ०२ परिचारीकांची प्रभारी परिसेविका म्हणून नेमणूक करता येईल. तसेच निवासी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वॉर्डबॉय, आया, स्विपर यांची नेमणूक संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी(आऊटसोर्स) पद्धतीने घेणेस व याकामी येणा-या अंदाजे मासिक रक्कम रु. ८,९८,९७२/- खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय दि. २८/१२/२०१५ रोजीच्या मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ६२६ खालीलप्रमाणे झाला आहे.

"श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन Neuro ICU व SICU विभाग सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले मनुष्यबळ कंत्राटी (आऊटसोर्स) पद्धतीने घेणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदांची मागणी करणेत येऊन, नवीन ठेकेदारांची नेमणूक करण्यात यावी. मात्र तत्पूर्वी याबाबत संस्थान वकीलांमार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी."

उपरोक्त मा. त्रिसदस्य समितीच्या सभेतील निर्णयानुसार संस्थान वकीलांमार्फत सिव्हील ॲप्लिकेशन नं. ३७०७/२०१६ मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सादर करणेत आले होते त्यातील प्रेआर क्लॉज मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले होते.

"The applicant may please be permitted to carry out E-tender process for supply of manpower / staff required for proposed Neuro ICU & SICU in Shri Saibaba Hospital and further permit the applicant to spend the amount required for carrying the above work".

त्यावर दि. २३/०३/२०१६ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिला आहे.

"For the reasons stated in the application, the application is allowed in terms of prayer clause B and accordingly stands disposed of."

प्रस्तावित Neuro ICU व SICU विभाग तातडीने सुरु करणे गरजेचे आहे जेणेकरुन रुग्णांना त्याचा लाभ शक्य तेवढ्या लवकर देता येईल. (याकामी एक साईभक्त Neuro ICU व SICU विभागासाठी लागणारे साहित्यही एक महिन्याचे आत देणगीदाखल देण्यास इच्छुक आहे.) सदर विभागासाठी प्रस्तावित विषयानुसार फक्त ६२ कर्मचा-यांचीच आवश्यकता आहे. त्यासाठी मा. न्यायालयाचे आदेशानुसार विहीत पद्धतीने ई- निविदा मागविणेकामी जाहिरात प्रसिद्ध करणेसाठी अगोदर मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घ्यावी लागेल मान्यता मिळालेनंतर जाहिरात प्रसिद्ध करावी लागेल व जाहिरातीनुसार आलेल्या निविदा मा. त्रिसदस्य समितीसमोर उघडाव्या लागतील याकामी कमीतकमी तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध करणेकामी खर्चही होणार आहे. सबब, यावर पर्याय म्हणून सध्या संस्थानला कुशल – अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारांमार्फत Neuro ICU व SICU विभागासाठी लागणारे कर्मचारी घेतल्यास जाहिरातीद्वारे ई-निविदा मागविणेसाठी लागणारा खर्च तसेच वेळही वाचणार आहे व रुग्णांनाही या सुविधेचा फायदा लवकर देता येईल, असे नम्र मत आहे.

तरी, तातडीची गरज म्हणून सध्या संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारांमार्फत Neuro ICU व SICU विभागासाठी लागणारे निवासी वैद्यकीय अधिकारी, परीचारीका, वॉर्डबॉय, आया, स्विपर यांना कंत्राटी (आऊटसोर्स) पद्धतीने घेणेसाठी मान्यता असावी.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत श्री साईबाबा रुग्णालयातील प्रस्तावित न्युरो आय.सी.यू. व एस.आय.सी.यू.साठी आवश्यक असलेले मनुष्यबळ घेणेकामीचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**याबाबत मा.त्रीसदस्य समितीच्या दि.२८/१२/२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६२६ अन्वये कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. १४** **स्थायी पदाचा राजीनामा मंजूर करुन व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक मिळणेबाबतच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी दि. ०५ मार्च २०१६ रोजी व डॉ. पवार यांनी दि. ०७/०३/२०१६ रोजी वैयक्तिक कारणाने एक महिना पूर्व नोटीस देऊन राजीनामा मंजुर करणेबाबत व व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक मिळणेबाबत विनंती केली आहे.

डॉ. विद्युत अमुल्यचंद्र सिन्हा यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीयाक सर्जन या पदावर नेमणूक करण्यात आल्याने ते दि. ३०/०६/२००६ रोजी कामावर रुजू झालेले असुन दि. ०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी लागू करुन त्यांची सेवा पुढे चालु ठेवण्यात आली आहे. डॉ. प्रशांत पंडीत पवार यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ भुलतज्ञ

या पदावर नेमणूक करण्यात आल्याने ते दि. ०१/०८/२००९ रोजी कामवर रुजू झालेले असुन त्यांना दि. ०१/०८/२०१० पासून वेतनश्रेणी लागू करुन त्यांची सेवा पुढे चालु ठेवण्यात आली आहे.

डॉ. विद्युत अमुल्यचंद्र सिन्हा व डॉ. प्रशांत पंडीत पवार यांना देण्यात आलेल्या नेमणूक पत्रातील अट-शर्त क्र. अनुक्रमे ०८ व ०७ मध्ये "संस्थान सेवेत असताना राजीनामा द्यावयाचा झाल्यास अगोदर एक महिना लेखी पूर्व नोटीस अथवा एक महिन्याचा पगार संस्थानला नोटीस पे पोटी जमा करावा लागेल" अशी अट आहे.

त्यानुसार डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी एक महिना पुर्व राजीनामा पत्र दि. ०५ मार्च २०१६ रोजी दिलेले असल्याने त्यांचा कार्डीयाक सर्जन या पदाचा राजीनामा दि. ०४ एप्रिल २०१६ अखेर पासून तसेच डॉ. प्रशांत पवार यांनी एक महिना पूर्व राजीनामा पत्र दि.०७ मार्च २०१६ रोजी दिलेले असल्याने त्यांचा वरिष्ठ भुलतज्ञ या पदाचा राजीनामा दि. ०६ एप्रिल २०१६ अखेर पासून मंजूर करता येईल.

डॉ प्रितम बाळासाहेब जपे हे दि. २८/०५/२००७ पासून आर्थोसर्जन पदावर कार्यरत होते त्यांनी दि.१५/०१/२०१६ पासून एक महिना पुर्व राजीनामा नोटीस दिल्याने त्यांचा आर्थोपेडीक सर्जन या पदाचा दि १४/०२/२०१६ अखेर पासून राजीनामा मंजुर केलेला आहे. त्यांनीही दि. १४/०१/२०१६ रोजीच्या अर्जान्वये व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक मिळणेकामी विनंती केली आहे.

सबब, राजीनामा मंजुर झालेले डॉ प्रितम जपे तसेच एक महिना पुर्व राजीनामा पत्र दिलेले डॉ. विद्युतकुमार सिन्हा व डॉ. प्रशांत पवार यांना व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक मिळणेबाबत केलेल्या मागणीवर धोरणात्मक निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.विद्युत कुमार सिन्हा, कार्डीयाक सर्जन व डॉ.प्रशांत पवार, वरिष्ठ भुलतज्ञ यांची श्री साईबाबा रुग्णालयामध्ये झालेली प्रदिर्घ सेवा, अनुभव व कार्यक्षमता याचा सर्वांगीन विचार करता त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीयाक सर्जनची विहीत पध्दतीने नेमणुक होईपर्यंत व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणेत यावी.**

**तसेच डॉ.प्रितम जपे, आर्थोसर्जन यांचे बाबतीत रुग्णांना अनेक तक्रारी असल्यामुळे त्यांना व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणे उचीत होणार नाही, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. १५** **प्रसाद लाडू व बुंदी पाकीटे वाहतुकीसाठी कॅरेटस खरेदीकामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केले अध्यादेश व विनयम १७ (१) मधील कलमानुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणेची तरतुद केली आहे.

**व्यवस्थापन समितीचे ठराव क्रं.-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.११६

**प्रस्ताविक-** कॅन्टीन विभागासाठी २०० नग प्लॅस्टिक कॅरेटस खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळाली आहे.कॅन्टीन विभागासाठी २०० नग प्लॅस्टिक कॅरेटस खरेदीकामी रु.२,२०,०००/- पर्यंतचे अपेक्षित खर्चास मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१६/०२/२०१६ रोजी झालेली सभेतील निर्णय क्रं.११६ अन्वये मान्यता मिळालेली आहे.कॅन्टीन विभागाकरीता ५०० (एल) x ३६०(बी) x ४०० (एच) या साइजचे प्लॅस्टीक कॅरेटस खरेदीकामी पुरवठाधारकांकडून सिलबंद कोटेशन (दरपत्रके) मागविण्यात आली असुन मा.प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष कोटेशन उघण्यात आली असुन कोटेशन मधील दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | अभिषेक स्टील कोपरगाव | श्री बालाजी एन्टरप्रायजेस अहमदनगर | मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर | निलकमल लिमिटेड, नाशिक | एकून किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्लॅस्टीक कॅरेटस ५०० (एल) x ३६० (बी) x ४०० (एच) निलकमल २०० नग | १२६५/- प्रति नग | ११५०/- प्रति नग | ९९०/- प्रति नग | ७७५/- प्रति नग | १५,५००० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात निलकमल लि.नाशिक यांचे दर न्युनतम आहेत.परंतु त्यांनी ५४०(एल) x ३६० (बी) x ३४० (एच) या साइजचे प्लॅस्टिक कॅरेटसचे दर दिले आहेत.याबाबत त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी तुम्ही मागणी केलेल्या कॅरेटसच्या साइजचे उत्पादन कंपनीने बंद केले आहे.सदयस्थितीत उत्पादित केलेल्या कॅरेटसची लांबी वाढविण्यात आलेली असुन उंची २ ते २II इंच कमी केलेली आहे.कॅरेटसचे आकारमानात फारसा बदल केलेला नाही. त्यामुळे मालाचे साठवण क्षमतेत फरक पडणार नाही.सध्या मार्केटमध्ये सर्वत्र या साइजचे कॅरेटस उपलब्ध आहेत असे त्यांनी सागितले.

निलकमल लि.नाशिक हे अधिकृत विक्रेते असुन त्यांनी दिलेले दर न्युनतम आहेत.तरी त्यांचे कडून मॉडेल जेबीसी ५४३६३४० OD: ५४० (L) X ३६० (B) X ३४० (H) या साइजचे कॅरेटस खरेदी केलेस याकामी रु.१,५५,०००/- खर्च येईल.तसेच प्रसाद लाडू व बुंदी पाकिटे वाहतुकीसाठी अडचण येणार नाही.असे नम्र मत आहे.

**मागणी –** कॅन्टीन विभागासाठी २०० नग प्लॅस्टिक कॅरेटस खरेदी करणे आवश्यक आहे.

निलकमल लि.नाशिक यांचे कोटेशन मधील दर न्युनतम आहे.तरी त्यांचे कडून मॉडेल **जेबीसी ५४३६३४० OD: ५४० (L) X ३६० (B) X ३४० (H)** या साइजचे कॅरेटस खरेदी करणेस व या कामी रु.१,५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर

निर्णय क्र.२७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असलेले २०० नग प्लॅस्टिक कॅरेटस् निलकमल लि., नाशिक यांचेकडून रु. ७७५/- प्रति नग मात्र या दराने खरेदी करणेस व त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

विषय नं. १६ **पाणी टंचाईमुळे प्रसाद भोजनकामी पत्रावळ खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** सन **2004** चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.**14** (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील **14 (2** घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच **21** (1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** संदर्भिय नूसार उपरोक्त विषयास अनुसरुन पाणी पुरवठा विभागामार्फत श्री साई प्रसादालयासाठी वापरण्यात येणारे पाणी काटकसरीने वापरणेत यावे तसेच पाणी टंचाई काळात पत्रावळीचा वापर करणेत यावा याबाबत पत्र देवून सुचित केलेले आहे. करीता प्रसादभोजनासाठी पत्रावळीचा वापर दिनांक 15/03/2016 रोजीपासून सुरु करणेत आलेला आहे.

चालू वर्षी पावसाचे प्रमाण खुपच कमी झालेले असल्याने पाणी पुरवठा करणारे धरणे पुर्ण क्षमतेने भरलेली नसल्यामुळे संस्थान तळयातील व नगरपंचायतचे तळयातील पाणीसाठा शिल्लक नाही. सध्या पाणी पुरवठा विभागामार्फत इतर विहीर, बोअर यांचे पाणी एकत्र करुन श्री साई प्रसादालयासाठी पाणी पुरवठा करणेत येत आहेत.

1) सन 2013-2014 मध्ये पाण्याची टंचाई असल्यामुळे आवश्यकतेनूसार दिनांक 01/04/2013 ते 31/08/2013 अखेर पाच महिन्यासाठी एकूण 25,04,300 नग पत्रावळी वापरण्यात आलेली होती. प्रती नग रु.1.40 पै. प्रमाणे 25,04,300 नग पत्रावळीसाठी रक्कम रु.35,06,020/- इतका खर्च झालेला आहे.
2) सन 2014-2015 याही वर्षी पाण्याची टंचाई असल्यामुळे दिनांक 01/04/2014 ते 18/07/2014 अखेर आवश्यकतेनूसार 6,28,100 नग पत्रावळीचा वापर करण्यात आलेला आहे. प्रती नग रु.1.40 पै. प्रमाणे 6,28,100 नग पत्रावळीसाठी रक्कम रु.8,79,340/- इतका खर्च झालेला आहे.
3) श्री साई प्रसादालयामध्ये मागील वर्षाचे सरासरी (जाने.15 ते डिसेंबर-15) नूसार दैनंदिन सरासरी 38,833 साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. त्यानूसार एक दिवसाचे 38,833 नग पत्रावळीसाठी अंदाजे रक्कम (38833 नग x रु.1.80) = रु.69,899/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणसत्तर हजार आठशे नौव्यान्नव मात्र) एवढा खर्च होत आहे.

पाणी पुरवठा विभागास (श्री गाडेकर) दुरध्वनी करुन कॅनॉल ला पाणी कधी येणार? याबाबत विचारणा केली असता त्यांनी माहे एप्रिल महिन्याचे दुसऱ्या आठवडयात येईल असे सांगितले. त्यानूसार एप्रिल महिना सोडून माहे मे-2016 व जुन-2016 या दोन महिने (61 दिवसासाठी) करीता पत्रावळी वापरणे झाल्यास अंदाजे 23,68,813 नग पत्रावळीची आवश्यकता लागेल.

दि.23/03/2016 रोजी खरेदी विभागास अंतर्गत दुरध्वनीवर पत्रावळीचे शिल्लकबाबत विचारणा केली असता, मुख्यभांडार कडील शिल्लक पत्रावळी 8,50,000 नग, पुरवठादाराकडून येणे असलेली 5,00,000 नग व उपभांडारकडील शिल्लक 5,00,000 नग अशी एकूण 18,50,000 नग पत्रावळी शिल्लक आहे. असे सांगणेत आले.

त्यानूसार दोन महिनेसाठी लागणारी अंदाजे एकूण पत्रावळी 23,68,813 नग - 18,50,000 नग विभागांतर्गत शिल्लक वजा जाता, साधारणत 5,18,813 नग पत्रावळीची आवश्यकता लागणार आहेत. त्यासाठी अंदाजे रक्कम रु.9,33,863/- (5,18,813 x 1.80) (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख तेहतीस हजार आठशे त्रेसष्ट मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

**मागणी:-** प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साई प्रसादालयाकरीता माहे मे-2016 व जुन-2016 या दोन महिन्याचे कालावधीमध्ये पत्रावळी वापरणे झाल्यास अंदाजे रक्कम रु.9,33,863/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख तेहतीस हजार आठशे त्रेसष्ट मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे गरजेचे आहे. त्यानूसार सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करुन खरेदी विभागामार्फत पत्रावळी खरेदी करुन वापर करता येईल.

**संस्थान अधिनियम /ठराव यानूसार अनुमान:-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** श्री साई प्रसादालयाकरीता माहे मे-2016 व जुन-2016 या दोन महिन्याकरीता पाणी पुरवठा विभागाकडून पाणी पुरवठा न झालेस, सदर कालावधीमध्ये साईभक्तांना प्रसादभोजन पुरविणेकामी पत्रावळीचा वापर करावा लागेल. त्याकरीता खरेदी विभागामार्फत 5,18,813 नग पत्रावळी खरेदी करणेकामी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,33,863/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख तेहतीस हजार आठशे त्रेसष्ट मात्र) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या श्री साई प्रसादालयामध्ये साधारणत: तीन महिने पुरेल इतक्या पत्रावळया शिल्लक असल्यामुळे उपरोक्त प्रस्ताव रद्द करण्यात आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं. १७** **साईभक्तांचे सुविधेकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान येथील क्लोकरुम करीता लोखंडी रॅक बनविणेकामी मटेरीयल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी दिनांक 02/01/2016 रोजीचे पत्रान्वये " साईभक्तांचे सोयीसाठी इकडील विभागामार्फत मोफत क्लोकरुम सुविधा साईभक्तांना 24 तास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. श्री क्षेत्र शिरडी येथे होणा-या गर्दीचा विचार करता विभागाकडे सध्या उपलब्ध असणारी क्लोकरुम सुविधा फक्त 250 साईभक्तांना उपलब्ध करुन देता येते कारण याकामी आवश्यक असणा-या योग्य त्या मापाच्या लोखंडी रॅक आपणाकडे पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने मर्यादित प्रमाणात मोफत सेवा देण्यात येते. तरी मेकॅनिकल विभागामार्फत समक्ष पहाणी करुन योग्य त्या मापाच्या लोखंडी रॅक तातडीने बनवून देणेस" कळविले आहे. इकडील विभागामार्फत प्रायोगिक तत्वावर क्लोकरुमकरीता 1 लोखंडी रॅक तयार केली असून, त्यानुसार 50 लोखंडी रॅक बनविण्याची आवश्यकता आहे. लोखंडी रॅक बनविणेकामी आवश्यक फॅब्रिकेशन मटेरिअलची आवश्यकता भासणार आहे. सदरील आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे तसेच भांडार विभागाकडे नसल्याने बाहेरील पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करावे लागणार आहे. मटेरिअल प्राप्त झालेनंतर सदरची कामे विभागांअतर्गत करण्यात येतील. मटेरिअल खरेदीकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Angle<br>Size – 25 x 25 x 3 mm | 1,675 kg. | 47/- | 78,750/- |
| 2. | M.S. Flat<br>Size – 25 x 25 x 3 mm | 1,375 kg. | 47/- | 64,625/- |
| 3 | Asian Paint Black | 25 Lit | 225/- | 5,625/- |
| | | | **एकूण:** | **1,49,000/-** |

उपरोक्तप्रमाणे विषयाकिंतकामी आवश्यक मटेरिअल खरेदी करणेसाठी अंदाजे रुपये 1,49,000/- खर्च अपेक्षित आहे.

तरी साईभक्तांचे सुविधेकरीता साईबाबा भक्तनिवाससथान येथे क्लोकरुमकरीता 50 लोखंडी रॅक बनविणेकामी आवश्यक मटेरिअल खरेदी करणेकामी बाहेरील पुरवठादार यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 1,49,000/- (अक्षरी रुपये एक लाख, एकोणपन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे सुविधेकरीता साईबाबा भक्तनिवास स्थान येथील क्लोकरुसाठी ५० लोखंडी रॅक बनविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले मटेरियल खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये १,४९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभाग प्रमुख)

---

**विषय नं. १८** **शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद:** कलम 14(2)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माध्यमातून शिर्डी येथे अद्ययावत सेवा सुविधायुक्त असे बसस्थानक व त्यावरील भक्तनिवासाचे बांधकाम चालू असून, सध्या हा प्रकल्प पुर्णत्वात येत आहे. या इमारतीमध्ये तीन मजले असून, संस्थानला स्वखर्चात बांधून वापरण्यात येणारे क्षेत्र पुढीलप्रमाणे आहे:

| अ.नं. | मजला | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| 1. | तळ | जोता क्षेत्रफळ 122 चौ.मी. ज्यामध्ये माहिती केद्र, इतर सुविधा व दुकान यांचा समावेश आहे. |
| 2. | पहिला | साईभक्तांसाठी डॉमेटरी जोता क्षेत्रफळ 1216 चौरस मीटर |
| 3. | दुसरा | साईभक्तांसाठी डॉमेटरी जोता क्षेत्रफळ 1216 चौरस मीटर |

वरीलप्रमाणे संसथानला वापरणेस मिळणारे एकूण क्षेत्रफळ 2,554 चौ. मीटर आहे. सदर इमारतीमध्ये पहिला व दुसरा मजला संस्थानला मिळणार असून, तिसरा मजला महामंडळास वाहक/चालक विश्रांतीगृह व अधिकारी विश्रांतीगृह यांच्यासाठी वापरण्यात येणार आहे.

संस्थानला मिळणा-या पहिल्या व दुस-या मजल्यावरील खोल्यांची संख्या व त्यात साईभक्तांसाठी निवास व्यवस्था संख्या खालीलप्रमाणे आहे:

| अ.नं. | तपशील | पहिला मजला | दुसरा मजला | निवासव्यवस्था होणा-या साईभक्तांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | मोठे हॉल | 5 | 5 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 100 | 100 | 200 |
| 2. | लहान हॉल | 3 | 3 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 30 | 30 | 60 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | सिंगल रुम | 6 | 6 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 30 | 30 | 60 |
| 4. | डबल रुम | 1 | 1 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 10 | 10 | 20 |
| | **एकूण साईभक्तांसाठी निवासाची व्यवस्था :** | | | **340** |

उपरोक्तप्रमाणे पहिल्या व दुस-या मजला मिळून 10 मोठे हॉल, 6 लहान हॉल, 12 सिंगल रुम, 2 डबल रुम असून, सर्व रुम / हॉल मिळून एकूण 340 साईभक्तांची राहण्याची सोय होणार आहे. या साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाणी मिळावे याकरीता सोलर हॉट वॉटर सिस्टम यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. तसेच या इमारतीमध्ये पहिल्या व दुस-या मजल्यावर साईभक्तांसाठी निवासाची व्यवस्था केलेली असल्यामुळे, साईभक्तांना तळमजल्यावरुन वरील मजल्यावर जाणेकरीता लिफ्टची सोय करणे आवश्यक आहे.

वरील दोन्ही प्रकल्पाकरीता संस्थानचे आर्किटेक्ट श्री काबरे चौधरी आर्किटेक, नाशिक यांनी तयार केलेल्या आराखडयानुसार खालीलप्रमाणे अंदाजित खर्च येईल :

शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथील साईभक्तांना सोलर हॉट वॉटर व लिफ्टची सुविधा देणेसाठी येणा-या अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे:

| **अ.नं.** | **तपशील** | **अंदाजे किंमत रुपये** |
|---|---|---|
| 1. | Supply, Installation, Testing & Commissioning of Solar Water Heating Systems Capacity 14000 Ltrs. at Shirdi Bus Stand Bhaktaniwas | 26,53,000/- |
| 2. | Supply, Installation & Commissioning of 2 Nos. Automatic Electrically Operated Lift for Shirdi Bus Stand. | 30,00,000/- |
| | **Total :** | **56,53,000/-** |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे 14,000 लिटर क्षमतेची सोलर वॉटर हिटींग सिस्टीम तसेच एक लिफ्ट 10 प्रवासी व एक लिफ्ट 8 प्रवासी वाहतुक क्षमता असलेली अशी एकूण दोन लिफ्ट बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये 56,33,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामी येणा-या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची तसेच सदर खर्च मेजर फायनान्सशिअल असलेने, त्यास संस्थान वकीलामार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अर्ज दाखल करुन मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मान्यता:** प्रशासकीय व मा.उच्च न्यायालयाची मान्यता आवश्यक

**विभागाचे स्पष्ट मत:** संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याची तसेच खालील मजल्यावरुन वरील मजल्यावर जाणे-येणेसाठी लिफ्टची सोय/ सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथील साईभक्तांनाकरीता गरम पाणी तसेच लिफ्टची सुविधा करणे आवश्यक आहे. तसेच शिर्डी येथील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारत संस्थान निधीतून विकसित करणे कामासाठी संस्थान व रा.प. महामंडळ यांचे दरम्यान करावयाच्या करारनाम्यातील मुद्दा क्र. 19 मध्ये "श्री साई संस्थान यांना टेरेसवर सौरउर्जा संयंत्राची उभारणी करणे शिर्डी नगरपंचायत यांनी दिलेल्या बांधकाम परवानगीमधील अट क्र. 20 नुसार बंधनकारक राहील" असे नमूद आहे.

उपरोक्तप्रमाणे शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथील साईभक्तांना सोलर हॉट वॉटर व लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी येणा-या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता घ्यावी लागेल तसेच सदरचा खर्च मेजर फायनान्सशिअल असलेने, त्यास संस्थान वकीलामार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अर्ज दाखल करुन मान्यता घ्यावी लागणार आहे. मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळाल्यानंतर विषयांकितकामी वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविता येतील व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून ई-निविदा प्रक्रिया करता येईल. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

तरी शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे साईभक्तांसाठी सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेकामी पुढील कार्यवाहीस तसेच याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 56,53,000/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेकामी विहीत पध्दतीने पुढील कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५६,५३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेत यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यांवी, असे ठरले.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं. १९** **श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक दुरुस्ती देखभाल (AMC) करारास मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतूद** : अधिनियम कलम 21(1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तंची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना** : बांधकाम विभागाने श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 200 Cum/Day) परिसरामध्ये डेक्कन एन्व्हायरोमेंट कन्सल्टंटस् प्रा. लि., पुणे यांचेमार्फत रुग्णालयाचे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयत्र उभारणेत आलेले आहे. एक वर्षाच्या वारंटी कालावधीत व त्यानंतर तीन वर्ष करीता सदर प्रकल्पाचे AMC चे काम डेक्कन एनव्हायरो सर्व्हीस, पुणे यांना देणेत आले होते. त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 3(3) अन्वये सदर प्रकल्पाचे वार्षिक देखभाल दुरुस्ती (O & M) करणेचे काम मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 या कालावधीसाठी देणेत आलेले होते. सदरचा कालावधी हा 31/03/2016 रोजी संपुष्टात येत आहे.

बांधकाम विभागाचे दिनांक 10/01/2016 रोजीचे मंजूर टिपणी अन्वये सदरचे दोन्ही सयंत्र मेकॅनिकल विभागाकडे हस्तांतरीत करणेस तसेच दिनांक 31/3/2016 चे पुढिल कालावधीकरीता AMC देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही मेकॅनिकल विभागामार्फत होणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यामुळे बांधकाम विभागाने सदर कामी फाईल्स दिनांक 11.1.2016 रोजी मेकॅनिकल विभागाकडे हस्तांतरीत केलेल्या आहेत.

यावर मेकॅनिकल विभागाने तात्काळ सदरचे दोन्ही सांडपाणी सयंत्राचे दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीसाठी वार्षिक AMC/Operation & Maintenance देणेकरीता व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये 9,00,000/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता तसेच ई-निविदा मागविणेकामी सदर प्रस्ताव दिनांक 26/01/2016 रोजी मिटींग विभागाकडे सादर केला. सदरचे प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची दिनांक 16/2/2016 रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

**मागणी :-** उपरोक्त मान्यतेनुसार दोन्ही प्रकल्पाचे AMC करीता ई निविदा प्रक्रिया सुरु केलेली आहे. मात्र 31/03/2016 अखेर पर्यंत ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होणार नसल्याने सध्याचे ठेकेदार मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना देणेत आलेल्या जा. नं. एसएसएस/वशि/बांधकाम/6160/2015 दिनांक 14/3/2015 रोजीचे कार्यादेशास मुदतवाढ द्यावी लागणार आहे. मुदतवाढी बाबत सध्याचे ठेकेदार मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना विचारणा केली असता त्यांनी सध्याच्या अटी/ शर्ती व दरात ( प्रती महा रक्कम रु. 65000/- प्रमाणे) पुढिल दोन महीने कालावधीत काम करणेस सहमती दिनांक 9.03.2016 रोजीचे ई-मेल पत्राद्वारे कळविलेले आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मत :-** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडील दोन्ही सांडपाणी प्रक्रिया संयत्र सुरळीत कार्यान्वित राहणे आवश्यक असल्याने ई निविदा प्रकिया पुर्ण होईपर्यंत पुढिल दोन महिने कालावधी दिनांक 1/04/2016 ते दिनांक 31/5/2016 पर्यंत मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना मुदतवाढ देणेत यावे असे मत आहे.

तरी मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना दिनांक 1/04/2016 ते दिनांक 31/5/2016 या दोन महिनेचे कालावधीकरीता श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडील दोन्ही सांडपाणी प्रक्रिया सयंत्राचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सध्या देणेत आलेल्या कार्यादेशातील दरानुसार मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या रक्कम रु.1,30,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिस्दस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक दुरुस्ती देखभाल (AMC) करारास २ महिने मुदतवाढ देणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं. २०** **साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील A, B व C इमारतीचे ए.सी.यंत्रणेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमामधील तरतूद 2014 :**

(1) कलम)(2)14 घ – (भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे

(2) कलम 21(1)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना**: शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल साईआश्रम भक्तनिवास येथे A,B,C या तीन इमारतीमध्ये प्रत्येकी 128 रुम नुसार एकूण 384 रुममध्ये डायकीन कंपनीचे VRV (Variable Refrigerant Volume) टाईप ए.सी. यंत्रणा बसवून दिलेली आहे.

सदर ए.सी. यंत्रणा दिनांक 11/01/2013 रोजीपासून कार्यान्वित झालेली आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांचेत सदर यंत्रणा बसविणेकामी दिलेल्या कार्यादेशाच्यावेळी करण्यात आलेल्या करारनाम्यात खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. (ही बाब मा. श्री रमणी सर यांचे पत्रात व ई-मेलमध्ये नमूद आहे)

"Cost of Annual Maintenance Charges (AMC) after the warranty period, will be Rs. 6,10,500/- per year. The AMC will be comprehensive and will include cost of labour and parts. Other Taxes on the AMC Charges will be paid at actuals. The AMC Price will remain fixed and confirmed as valid for 8 years after warranty, by Dalkin (i.e.) 10 years from the date of acceptance of the installation."

सदर यंत्रणेचा वारंटी कालावधी दिनांक 10/01/2015 रोजी संपुष्टात आलेला असल्याने उपरोक्त नमूद करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 18/2/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 30(30) अन्वये साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील VRV ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षे (दिनांक 01/04/2015 ते 31/03/2016 ) कालावधीसाठी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देण्यात आले होते. सदरच्या AMC ची मुदत दिनांक 31/03/2016 रोजी संपुष्टात येत असून, त्यापुढील एक वर्ष कालावधीकरीता मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना AMC देणे आवश्यक आहे.

**मान्यता** : प्रशासकीय मान्यता आवश्यक

**विभागाचे स्पष्ट मत**: मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद समोर C.A. No. 9216 of 2014 in PIL No. 18 of 2011 दिनांक 26/09/2014 अन्वये झालेल्या सुनावणीत "वार्षिक मेन्टेनंन्स सर्व्हीस कॉन्टॅक्ट तसेच रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्टॅक्ट हे त्या-त्या मशीनरीचे उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीचे उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांचे अधिकृत सर्व्हीस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यात यावे " असा आदेश दिलेला आहे.

तसेच साईआश्रम भक्तनिवास येथील सदरची ए.सी. यंत्रणा बसवितेवेळी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार वारंटी कालावधी संपलेपासून पुढील 8 वर्षाचे कालावधीसाठी वार्षिक ए.एम.सी. करीता प्रत्येक वर्षी रक्कम रुपये 6,10,500/- + टॅक्सेस याप्रमाणे दर निश्चिती करण्यात आली आहे. या 8 वर्ष कालावधीपैकी 1 वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून, पुढील 7 वर्षाचा कालावधी बाकी आहे. प्रत्येक वर्षी ए.एम.सी. कामी अदा करावयाची रक्कम निश्चित करण्यात आलेली असल्याने, AMC करीता पुढील 1 वर्ष कालावधीसाठी (दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 पर्यंत ) कार्यादेश देणे आवश्यक आहे.

मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना AMC करीता कार्यादेश देणेकामी तसेच AMC कामी वार्षिक रक्कम रुपये 6,10,500/- + टॅक्सेस याप्रमाणे अदा करणेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील ए.सी. यंत्रणेचे पुढील 1 वर्ष कालावधीसाठी (दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 पर्यंत) उत्पादक कंपनी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेस व याकामी रुपये 6,10,500/- + टॅक्सेस अदा करणेसाठी मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील A, B व C इमारतीमधील ए.सी.यंत्रणेचे पुढील एक वर्ष कालावधीसाठी (दि.०१.०४.२०१६ ते दि.३१.०३.२०१७ पर्यंत) उत्पादन कंपनी मे.डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा.लि. यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेस व त्यासाठी येणा-या रु.६,१०,५००/- +टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं. २१** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील साईआश्रम (१५०० रुमलगत) तसेच २४.०० मीटर रुंद रस्त्यालगत असलेली जमीन सर्वे नं.१०७ कलेक्टर एन.ए. झालेली जमीन श्री साईबाबा संस्थानला थेट पध्दतीने (वाटाघाटीने) विकत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.प्रभाकर गोविंदराव कोते,श्री.कैलास गोविंदराव कोते व सौ.सुमित्रा कैलास कोते,रा.शिर्डी,ता.राहाता यांचे दि.१५/०२/२०१६ रोजीचे अर्जान्वये त्यांचे मालकीची खालीलप्रमाणे वर्णन असलेली जमीन संस्थानला कायम खरेदी देणेबाबत प्रस्ताव दिलेला आहे.

मौजे शिर्डी हद्दीतील सर्वे नं.१०७/४ क्षेत्र ०.२६.४ आर, सर्वे नं.१०७/१० क्षेत्र ०.४९.८८ आर + ०.७ आर खराबा = ०.५६.८८ आर, सर्वे नं.१०७/११ क्षेत्र ०.६१.० आर + ०.६ आर खराबा = ०.६७.०० आर,सर्वे नं.१०७/१४ क्षेत्र ०.५६.१३ आर + ०.४ आर खराबा = ०.६०.१३ आर ही लेआऊट झालेली कलेक्टर एनए वाणिज्य कारणासाठी झालेली जमीन श्री साईबाबा संस्थानच्या साईआश्रम (१५०० रुम) लगत शेजारीच असून ही जमीन श्री साईबाबा संस्थानला थेट पध्दतीने (वाटाघाटीने) विकत देणेबाबत श्री.प्रभाकर गोविंदराव कोते व इतर दोन यांनी विषयांकित अर्ज केलेला असून त्यात त्यांनी उपरोक्त जमीनी देतांना त्यांना सन २०१५ च्या भूसंपादन कायद्याप्रमाणे जमीन देणे आहे. ही जमीन भूसंपादन कायद्याप्रमाणे संस्थानने विचार केल्यास अर्जदार सदर जमीन संस्थानला देण्यास तयार आहेत,असे बाबत अर्जात नमूद केलेले आहे.

उपरोक्त अर्जात नमूद केलेल्या जमीनी संस्थानसाठी आरक्षित केलेल्या नाहीत अथवा सदर जमीनींवर नवीन प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित नाही. त्यामुळे सदर जमीनी प्रचलित भूसंपादन कायद्यानुसार खरेदी करण्याची आवश्यकता नाही,असे नम्र मत आहे. तथापि संस्थानला सदर जमीनींचा भविष्यात उपयोग होणार असल्यास शासनाच्या रेडी रेकनर दराप्रमाणे खरेदी करता येईल,असे नम्र मत आहे. तसे अर्जदार यांचेबरोबर चर्चा करुन त्यांची

शासकीय रेडी रेकनरच्या दराप्रमाणे खरेदी देण्याची संमती घ्यावी लागेल तसेच अर्जदार यांची संमती असल्यास सदर जमीनी खरेदीकामी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद व महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत जमिन अर्जदार शासकीय रेडीरेकनरच्या दराप्रमाणे देण्यास तयार असेल तर त्याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता मिळणेकामी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं. २२ **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील साईआश्रम (१५०० रुमलगत) तसेच २४.०० मीटर रुंद रस्त्यालगत असलेली जमीन सर्वे नं.१०७ येलो झोन झालेली जमीन श्री साईबाबा संस्थानला थेट पध्दतीने (वाटाघाटीने) विकत देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.कैलास गोविंदराव कोते,श्री.नितीन भानुदास औताडे व श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर,रा.शिर्डी,ता.राहाता यांचे दि.१५/०२/२०१६ रोजीचे अर्जान्वये त्यांचे मालकीची खालीलप्रमाणे वर्णन असलेली जमीन संस्थानला कायम खरेदी देणेबाबत प्रस्ताव दिलेला आहे.

मौजे शिर्डी हद्दीतील सर्वे नं.१०७/६ क्षेत्र ०.६० आर, सर्वे नं.१०७/६ क्षेत्र ०.४२.२५ आर ही येलो झोन मधील जागा श्री साईबाबा संस्थानच्या साईआश्रम (१५०० रुम) लगत शेजारीच असून ही जमीन श्री साईबाबा संस्थानला थेट पध्दतीने (वाटाघाटीने) विकत देणेबाबत श्री.कैलास गोविंदराव कोते व इतर दोन यांनी विषयांकित अर्ज केलेला असून त्यात त्यांनी उपरोक्त जमीनी देतांना त्यांना सन २०१५ च्या भूसंपादन कायद्याप्रमाणे जमीन देणे आहे. ही जमीन भूसंपादन कायद्याप्रमाणे संस्थानने विचार केल्यास अर्जदार सदर जमीन संस्थानला देण्यास तयार आहेत,असे बाबत अर्जात नमूद केलेले आहे.

उपरोक्त अर्जात नमूद केलेल्या जमीनी संस्थानसाठी आरक्षित केलेल्या नाहीत अथवा सदर जमीनींवर नवीन प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित नाही. त्यामुळे सदर जमीनी प्रचलित भूसंपादन कायद्यानुसार खरेदी करण्याची आवश्यकता नाही,असे नम्र मत आहे. तथापि संस्थानला सदर जमीनींचा भविष्यात उपयोग होणार असल्यास शासनाच्या रेडी रेकनर दराप्रमाणे खरेदी करता येईल,असे नम्र मत आहे. तसे अर्जदार यांचेबरोबर चर्चा करुन त्यांची शासकीय रेडी रेकनरच्या दराप्रमाणे खरेदी देण्याची संमती घ्यावी लागेल तसेच अर्जदार यांची संमती असल्यास सदर जमीनी खरेदीकामी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद व महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत जमिन अर्जदार शासकीय रेडीरेकनरच्या दराप्रमाणे देण्यास तयार असेल तर त्याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता मिळणेकामी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं. २३ **शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी कायमस्वरुपी प्रदर्शनाकरीता जागा मिळणेबाबत श्री.अभिजीत देविदास शिंदे रा.श्रीरामपूर यांनी मा.बाबासाहेब पुरंदरे, पुणे यांचेमार्फत दि.०५/०३/२०१६ रोजीचा मा.ना.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सादर केलेला अर्ज.**

प्रस्ताव- श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांनी मा.बाबासाहेब पुरंदरे यांचेमार्फत मा.ना.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना विषयांकित अर्ज सादर केलेला आहे. मा.बाबासाहेब पुरंदरे यांनी त्यांचेकडील दि.०५/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये सदर अर्जाबाबत मा.ना.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडेस अभिप्राय सादर करुन त्यात श्री.अभिजित शिंदे हे त्यांचे परिचयाचे असून त्यांचेकडेस असलेला शस्त्र संग्रह हा इतिहासाच्या दृष्टीने फार-फार मोलाचा आहे,ते आपल्या सहका-यांबरोबर शिवचरित्रातील प्रसंग नाटयरुपी उदा.शिवराज्याभिषेक तसेच शिवकालीन हत्यारे,चित्ररुपी किल्ले यांची माहीती आजच्या पिढीला देतात. एक प्रकारे छत्रपतींच्या इतिहासाचा प्रसार व महाराष्ट्राची संस्कृती आजच्या पिढीला समजावण्याचे कामच करीत आहेत वगैरे बाबत नमूद करुन त्यांना संस्थानचे जागेमधून जागा देणेबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जावर मा.ना.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी तपासणी करुन उचित कार्यवाही करणेकामी आदेशित केले आहे.

**प्रस्तावना-** मा.श्री.बाबासाहेब पुरंदरे यांचे पत्रासोबतचे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचे अर्जाचे व त्यासमवेतच्या सहपत्राचे अवलोकन केले असता श्री.शिंदे यांचेकडेस श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे २५० हत्यारे आहेत. त्याचे प्रदर्शन ते गावोगावी जावून भरवतात. तसेच सहका-यांबरोबर शिवचरित्रातील प्रसंग सादर करतात. छत्रपतींचा इतिहासाचा प्रसार व महाराष्ट्राची संस्कृती आजच्या पिढीला समजावणेच्या दृष्टीने त्यांचा एक छोटासा प्रयत्न जागतिक पातळीवर पोहोचेल तसेच पर्यटनाच्या दृष्टीनेही पर्यटन वाढीस एक प्रकारे छोटासा हातभार लागेल अशा उद्देशाने त्यांनी शिर्डी येथे संस्थानच्या मालकीची जागा कायमस्वरुपी भाडयाने मिळणेकामी विनंती केलेली आहे. जेणेकरुन श्री क्षेत्र शिर्डी येथे साईबाबांच्या भूमीत येणारे भाविक हे जगभरातून लाखोंच्या संख्येने शिर्डीमध्ये रोज येतात.या सर्वांना या माध्यमातून श्री छत्रपतींचा इतिहास पोहोचविण्याचे काम अधिक सोपे होईल व त्यांना आणि त्यांचे सहका-यांना रोजगार मिळेल,असे बाबत श्री.शिंदे यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेले आहे व अर्जासोबत त्यांनी त्यांची

संकल्पना बाबत निवेदन सादर केलेले आहे. त्यात त्यांनी सदर बाबत विविध माध्यमातून साकार केलेले अतिसुंदर असे कायमस्वरुपी प्रदर्शन शिर्डी येथे तयार व्हावे त्याकरीता लागणारी इमारत शिर्डी येथे श्री साईबाबा देवस्थानच्या मालकीच्या जागेतच योग्य भाडयाने प्रदिर्घ मुदतीने जागा मिळावी,अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. या कायमस्वरुपी प्रदर्शनाकरीता लागणारे आर्थिक बळ ते स्वत: उभारणार आहेत. सदरचे भव्य कलादालन उभे करण्यासाठी फार मोठया किंमतीची साधने व ऐतिहासिक साहीत्य लागणार आहे. ते आजही त्यांचेकडे तयार आहे. फक्त आवश्यकता आहे ती जागेची, वगैरे बाबत नमूद केलेले आहे.

अर्जदार यांचा शिर्डीमध्ये कायमस्वरुपी प्रदर्शनाकरीता भव्य कलादालन उभारणेचा मानस आहे. त्या दृष्टीने अर्जदार यांनी शिर्डी येथे संस्थानच्या मालकीची इमारत (जागा) मागणी केलेली आहे. त्यात त्यांनी इमारतीचा अथवा जागेच्या आकाराबाबत व ठिकाणाबाबतचा तपशिल नमूद केलेला नाही.

**इकडील विभागाचे मत -** संस्थान मालकीच्या इमारती व जागा भाडेतत्वाने अथवा कराराने देणेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ पी.आय.एल.नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे.

(6) We direct that, without prior permission of this court, the committee-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2-trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2-trust:

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;"

उपरोक्तप्रमाणे मा.उच्च न्यायालयाचा आदेश आहे. तसेच संस्थानने अद्यापपावेतो कोणालाही कायमस्वरुपी भाडेतत्वावर जागा अथवा इमारत दिलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे कायमस्वरुपी जागा भाडेतत्वावर संस्थानला देता येणार नाही.

संस्थानकडे सद्यस्थितीत विनावापर असलेल्या इमारतींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे व त्याचे कारण खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.नं. | इमारतीचे नाव | विनावापराचे कारण |
|---|---|---|
| १ | सेवाधाम इमारत | सद्यस्थितीत पाणीटंचाई असल्याकारणाने तूर्तास सदर इमारतीतील खोल्या साईभक्तांना दिल्या जात नाहीत.मात्र सदर इमारतीत काही भागात साईभक्तांच्या सोयीसाठी सुलभ शौचालयाचा वापर होत आहे. |
| २ | साईउद्यान इमारत | सद्यस्थितीत पाणीटंचाई असल्याकारणाने तूर्तास सदर इमारतीतील खोल्या साईभक्तांना दिल्या जात नाहीत. तथापि इमारतीच्या काही भागात पोस्ट ऑफीस व साई संस्थान एम्प्लॉईज को-ऑप.सोसा.लि.शिर्डी यांचे कार्यालयास जागा भाडेतत्वावर यापूर्वीच वापरण्यास दिलेली आहे. |
| ३ | साईप्रसाद नं.१ इमारत | सद्यस्थितीत पाणीटंचाई असल्याकारणाने तूर्तास सदर इमारतीतील खोल्या साईभक्तांना दिल्या जात नाहीत. तथापि इमारतीच्या काही भागात संस्थानचे जनसंपर्क कार्यालय आहे व काही भागात साई संस्थान एम्प्लॉईज को-ऑप.सोसा.लि.शिर्डी यांना साईभक्तांच्या सोयीसाठी क्लोकरुमसाठी जागा भाडेतत्वावर यापूर्वीच वापरण्यास दिलेली आहे. |

तथापि अर्जदाराने विनंती केल्याप्रमाणे वस्तूसंग्रहालयासाठी जागा भाडेतत्तवावर द्यावयाची झाल्यास मंदीर परिसर तसेच जूने प्रसादालय व संस्थानचे भावी नियोजित प्रकल्पाची जागा/इमारत वगळून संस्थानच्या इतरत्र मिळकतीमध्ये ११ महिन्याच्या भाडेतत्वावर मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद व महाराष्ट्र शासनाच्या पूर्वपरवानगीने देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी प्रदर्शनाकरीता जागा देणेकामी, जागेची निश्चीती करणेत येऊन विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी व महाराष्ट्र शासनाची परवानगी मिळाल्यानंतर ११ महिन्याचे कराराने परवानगी मिळणेसाठी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं. २४ **श्री साईबाबा संस्थान परिसरामध्ये दुग्ध पदार्थ विक्री केंद्र उभारणेकामी परवानगी मिळणेबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. मुंबई (महानंद) यांचा विनंती अर्ज..**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद – १७ (२)(झ)** मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमूद आहे.

**प्रस्तावना** – मा.उपव्यवस्थापक,(पणन दुग्धशाळा) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादीत,मुंबई यांनी त्यांचेकडील दि.२१/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबांच्या परिसरातील भाविकांना महानंद दुग्धशाळेच्या दर्जेदार उत्पादनांचा स्वाद घेता यावा याकरीता श्री साईबाबांच्या परिसरामध्ये गर्दीच्या ठिकाणी सुयोग्य स्थळी ४ महानंद दुग्ध पदार्थ विक्रीचे स्टॉल उभारणेकामी परवानगी मिळणेबाबत नमूद केले असून मुंबई ते शिर्डी हे अंतर दूरचे असलेने वाहतून किफायतशीर होणेचे दृष्टीने किमान ४ स्टॉल उभारणेची परवानगी मिळणेकामी मागणी केलेली आहे. तथापि मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ पी.आय.एल.नं.१८/२०११ मध्ये दि.१६ ऑक्टोबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

(6) We direct that, without prior permission of this court, the committee-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2-trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2-trust:

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

अशा परिस्थितीत महानंद यांना त्यांच्या विनंतीप्रमाणे साईबाबा संस्थान परिसरात महानंद दुग्ध पदार्थ विक्रीचे स्टॉल उभारणेकामी परवानगी देता येत नाही,असे बाबत इकडील जा.नं.एसएसएस/ मालमत्ता/६९०५/२०१६ दि.१५/०३/२०१६ अन्वये अलाहीदा कळविलेले आहे.

तरी देखील मा.कार्यकारी संचालक,अपंग साधना संघ संचलित बृहन्महाराष्ट्र अपंग विकास संघटना,मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१५/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये पुन:श्च ४ महानंद दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्र संस्थानचे परिसरात उभारणी करणेकामी परवानगी मिळणेसाठी पत्र सादर केले आहे.

मा.उपव्यवस्थापक, पणन दुग्ध पदार्थ, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादीत,मुंबई यांचेकडील पत्रव्यवहाराचे व कार्यकारी संचालक,अपंग साधना संघ संचलित बृहन्महाराष्ट्र अपंग विकास संघटना यांचेकडील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर संस्था शासन नोंदणीकृत संस्था असून त्याचा ट्रस्ट रजिस्ट्रेशन नंबर एफ-१५७२ संघटना रजि.नं.१७७६ नोंदणी दि.१७/१२/१९८७ असा आहे. सदर उपक्रमास अपंग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ प्रकरण १०,कलम ५२ उपकलम (२) मधील तरतुदीनुसार अपंग पुनर्वसन क्षेत्रात कार्य करण्याकरीता देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र क्रं.अकआ/पुनर्वसन कार्य/नो.प्र./ अपंगसाधना संघ/ठाणे दि.०१/०९/२०१२ चे नुतनीकरण दि.३१/०८/२०१३ पासून दि.३०/०८/२०१६ पर्यंत या तीन वर्षाच्या कालावधीकरीता सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,अपंग कल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी दि.१५/०१/२०१४ रोजी प्रदान केलेले आहे. सदर संस्था महानंद दुग्ध पदार्थ विक्री करणार असलेचे दिसून येते. म्हणजेच महानंद दुग्ध शाळेचे दुग्ध पदार्थ सदर संस्थेद्वारे विक्री करण्यात येणार असलेचे मा.व्यवस्थापक,महानंद दुग्धशाळा यांचे पत्रावरुन दिसून येते.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर परिसर व जूने प्रसादालय परिसर येथे स्टॉलसाठी नव्याने जागा अगर गाळे देता येणार नाही. परंतु महानंद दुग्धशाळा यांनी संस्थानला केलेल्या विनंतीनुसार साईआश्रम भक्तनिवासस्थान व द्वारावती भक्तनिवासस्थान येथील परिसरात प्रत्येकी एक स्टॉल साधारणपणे १० x १५ या आकाराचा असे एकूण २ स्टॉल उभारणेसाठी जागा/गाळे ११ महिन्याच्या भाडेकरार तत्वावर देता येईल. त्यास मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिल्यानंतर मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडेस सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करता येईल. मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. मुंबई (महानंद) यांना श्री साईबाबा संस्थान परिसरामध्ये दुग्ध पदार्थ विक्री केंद्र उभारणेकामी जागा/गाळा देणेबाबतचा निर्णय धोरणात्मक स्वरुपाचा असल्यामुळे त्यावर प्रदिर्घ चर्चा होणे अपेक्षित आहे, असे समितीचे मत झाले. सबब सदरहु विषय तुर्त स्थगित ठेवणेत यावा असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं. २५** **बांधकाम प्रगती अहवाल अ व ब तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८९** **सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. २६** **समाधी मंदिर, चावडी, द्वारकामाई, दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करणेकामी आर्किटेक्टची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :**

वरील विषयासंदर्भात उपरोक्त अधिनियमात खालिल तरतूद आहे.

*"२१.(१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल:--*

*(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;……"*

**मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय:** मा.त्रिसदस्य समिती सभेत उपरोक्त विषयाबाबत खालील निर्णय संमत करण्यात आलेले आहेत.

१) <u>दि.२१/१०/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.८५९:</u>

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या इमारतींना रासायनिक प्रक्रियेद्वारे कोटींग करणेचे कामासाठी ASI यांचेमार्फत कामाची सविस्तर रुपरेषा ठरवून प्रस्ताव मागविणेत यावा. त्यासाठी मा.डायरेक्टर जनरल, ASI, नवी दिल्ली यांना मा.कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत विनंती पत्र पाठविणेत यावे, असे ठरले."*

२) <u>दि.०९/१०/२०१४ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.८९४:</u>

*"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षित वाडा या पुरातन वास्तुंचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेकामी सल्लागाराची नेमणूक करणेसाठी IIT Bombay, VJTI, Mumbai, COEP, Pune या नामांकीत अभियांत्रिकी शिक्षण संस्थांना विचारणा करण्यात यावी. जर या तीनही संस्था सल्लागार म्हणून सेवा देण्यास तयार नसतील तर याबाबत जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, नामांकीत सल्लागार संस्थांकडून प्रस्ताव मागविणेत यावे, असे ठरले."*

**प्रस्तावना:** वर नमूद निर्णय क्र.८५९ नुसार Director General, Archaeological Survey of India (ASI), New Delhi यांना संस्थानतर्फे जा.नं.४१५३, दि.१४/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये विषयांकीत पवित्र पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करण्याचे दृष्टीने मार्गदर्शन करणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन ASI यांचेकडील श्री.पी.जी. देशमुख, Asstt. Superintending Archaeological Engineer व डॉ.तेजस गर्गे, Asstt. Archaeologist या अधिका-यांनी दि.१०/०२/२०१४ रोजी शिर्डी येथे भेट देऊन विषयांकीत पुरातन वास्तुंची पहाणी केली.

त्यानंतर ASI यांचेकडील खालील अधिका-यांनी दि.२४/०१/२०१५ रोजी शिर्डी येथे भेट देऊन समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व दिक्षित वाडा या पवित्र पुरातन वास्तुंची पहाणी केली.

१) श्री. आर.एस. जमवाल, Superintending Archaeological Engineer, ASI, New Delhi.

२) श्री. मॅनेजर सिंग, Superintending Archaeological Engineer, ASI, Aurangabad.

३) श्री. डी.एस. दानवे, Ajanta Caves World Heritage Site Incharge.

वरील अधिका-यांनी सदरचे पहाणीनंतर मा. कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन चर्चा केली व सदर पहाणीबाबतचा सविस्तर अहवाल लवकरच पाठविणेत येईल असे आश्वासन दिले. त्यानुसार दि.१३/०३/२०१५ रोजीचे दि.०१/०४/२०१५ रोजी प्राप्त झालेल्या पत्राद्वारे श्री.आर.एस.जमवाल, Superintending Archaeological Engineer, ASI, New Delhi यांचेकडून अहवाल प्राप्त झाला असून तो सोबत अवलोकनार्थ ठेवला आहे.

दरम्यान वर नमूद निर्णय क्र.८९४ अन्वये IIT Bombay, VJTI Mumbai आणि COEP Pune या नामांकीत अभियांत्रिकी शिक्षण संस्थांना संस्थानचे दि.०९/१२/२०१४ रोजीचे पत्राद्वारे समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पुरातन वारसा इमारतींची पाहणी करुन त्यांचे सुदृढीकरणासाठी अहवाल देणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यास सदर तिनही संस्थांनी प्रतिसाद देऊन सदरहू काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यापैकी IIT Bombay यांनी याकामी दि.३१/०१/२०१५ रोजीचे प्रस्तावाद्वारे त्यांचा Scope of Work व रु.३,००,०००/- अधिक सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे फीची रक्कम कळविली. तसेच COEP Pune यांनी दि.१३/०५/२०१५ रोजीचे पत्राद्वारे याकामी Scope of Work व रक्कम रु.१,६०,०००/- अधिक सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे फी ची रक्कम कळविली आहे. VJTI Mumbai यांचेकडून फीचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

**प्रस्ताव:** वरीलप्रमाणे प्राप्त दोन प्रस्तावातील फीचे रकमेत मोठी तफावत आहे. त्यामुळे यापैकी कुठलाही प्रस्ताव न स्विकारता अशा प्रकारची सेवा देणा-या तज्ञ सल्लागारांकडून स्पर्धात्मक प्रस्ताव मागविणे उचित होईल असे मत आहे. तथापी त्याअगोदर Archaeological Survey of India (ASI) यांनी सुचविल्यानुसार प्रथम या क्षेत्रातील तज्ञ आर्कीटेक्टची नेमणूक करणे आवश्यक आहे. याकरीता पुरातन वास्तु जतन करण्याचे क्षेत्रातील म्हणजेच Conservation Architect ची नेमणूक केल्यास त्यांचे सल्ल्याने व देखरेखीखाली संपूर्ण प्रकल्पाचे काम संयुक्तरित्या (Integrated manner) करता येईल. त्यामधिल कामांचे स्वरुप व टप्पे सर्वसाधारणपणे खलिलप्रमाणे असतिल.

१) तज्ञ स्ट्रक्चरल कन्सल्टंटमार्फत विषयांकीत इमारतींचे इन्सपेक्शन व स्ट्रक्चरल ऑडीट करुन त्यानुसार दगडी बांधकाम, जॅक आर्च फ्लोअरींग इत्यादी स्ट्रक्चरल मेंबर्सचे सुदृढीकरणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे.

२) Archaeological Survey of India (ASI) यांनी केलेल्या शिफारशींनुसार कार्यवाही करणे.

३) दरवाजे, खिडक्या, छत, बाल्कनी इत्यादींचे लाकुडकामाची आवश्यक तेथे दुरुस्ती करुन त्यांचे जतन व सुशोभीकरणासाठी उपाययोजना करणे.

४) विषयांकीत इमारतींमधिल विद्युत, प्लंबिंग, ड्रेनेज, दूरध्वनी, संगणक, ध्वनीक्षेपण, फायर फायटींग व वायुविजन या सेवांचे पुनर्नियोजन व सुसुत्रीकरण करणे.

५) संस्थानचे वस्तु संग्रहालयातील पवित्र वस्तुंचे जतन करण्याचे दृष्टीने सध्या असलेल्या सुविधांमध्ये सुधारणा करणे. त्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती आणि संस्था यांचे मार्गदर्शन घेणे.

वरील कामे Integrated स्वरुपात हाती घेतल्यास सर्व अनुषंगीक कामे नियोजनबद्ध रितीने एकाच वेळी पूर्ण करता येतील. त्यासाठी खालील सल्लागार व्यक्ती अथवा संस्था व संस्थानचे अंतर्गत विभागांचा समावेश आवश्यक राहील.

| अ.नं | सल्लागार व्यक्ती/ संस्था/ संस्थानचे संबंधित विभाग | करावयाची कामे/ जबाबदारी |
|---|---|---|
| ०१. | आर्किटेक्ट | प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व आर्किटेक्चरल सेवा पुरविणे, सर्व सल्लागार व कार्यकारी यंत्रणांचा समन्वय राखणे, कामांची मानके, अंदाजपत्रके, निविदा, तयार करून प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणे. |
| ०२ | स्ट्रक्चरल कन्संल्टंट (यांची सेवा आर्किटेक्टमार्फत असेल व त्याचा समावेश आर्किटेक्टचे स्कोपमध्ये करता येईल) | इमारतींचे इन्सपेक्शन करून आवश्यकतेनुसार Structural Audit करणे, सुदृढीकरणासाठी उपाययोजना ठरविणे, सुदृढीकरणाच्या कामावर देखरेख ठेवणे. |
| ०३. | सर्व्हीसेस कन्सल्टंट (यांची सेवा आर्किटेक्टमार्फत असेल व त्याचा समावेश आर्किटेक्टचे स्कोपमध्ये करता येईल) | इमारती व परिसरातील विद्युत, प्लंबिंग, ड्रेनेज, दूरध्वनी, संगणक, ध्वनीक्षेपण, फायर फायटींग व वायुविजन या सेवांचे आवश्यकतेनुसार पुनर्नियोजन व सुसुत्रीकरण करणे. |

| अ.नं | सल्लागार व्यक्ती/ संस्था/ संस्थानचे संबंधित विभाग | करावयाची कामे/ जबाबदारी |
|---|---|---|
| ०१. | आर्किटेक्ट | प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व आर्किटेक्चरल सेवा पुरविणे, सर्व सल्लागार व कार्यकारी यंत्रणांचा समन्वय राखणे, कामांची मानके, अंदाजपत्रके, निविदा, तयार करून प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणे. |
| ०२ | स्ट्रक्चरल कन्संल्टंट (यांची सेवा आर्किटेक्टमार्फत असेल व त्याचा समावेश आर्किटेक्टचे स्कोपमध्ये करता येईल) | इमारतींचे इन्सपेक्शन करून आवश्यकतेनुसार Structural Audit करणे, सुदृढीकरणासाठी उपाययोजना ठरविणे, सुदृढीकरणाच्या कामावर देखरेख ठेवणे. |
| ०३. | सर्व्हीसेस कन्सल्टंट (यांची सेवा आर्किटेक्टमार्फत असेल व त्याचा समावेश आर्किटेक्टचे स्कोपमध्ये करता येईल) | इमारती व परिसरातील विद्युत, प्लंबिंग, ड्रेनेज, दूरध्वनी, संगणक, ध्वनीक्षेपण, फायर फायटींग व वायुविजन या सेवांचे आवश्यकतेनुसार पुनर्नियोजन व सुसुत्रीकरण करणे. |
| ०४. | वस्तु संग्रहालय तज्ञ (व्यक्ती अथवा संस्था) | संस्थानचे वस्तु संग्रहालयातील सुविधांमध्ये सुधारणा/ नूतनीकरण करण्याचे दृष्टीने पाहणी करून सल्ला व मार्गदर्शन देणे. |
| ०५. | बांधकाम विभाग | सदर प्रकलपासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणे, बांधकाम विभागाशी संबंधित कामांसाठी निविदा प्रक्रीया राबविणे, संस्थानचे सर्व संबंधित विभागांचा समन्वय ठेवणे. |
| ०६. | संस्थानचे इतर संबंधित विभाग- मंदिर, विद्युत, ध्वनीक्षेपण, सीसीटीव्ही, संरक्षण, मॅकेनिकल, आयटी, आणि पाणी पूरवठा विभाग. | संबंधित कामांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे, सल्लागारांशी समन्वय ठेवून संबंधित कामांचे नियोजन करणे. संबंधित कामावर प्रत्यक्ष देखरेख ठेवणे. |

तरी सदर प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट नेमणूकीसाठी वर्तमानपत्रात Request for Proposal (RFP) मागणी करणारी सूचना प्रसिद्ध करुन त्याद्वारे या क्षेत्रातील तज्ञ आर्किटेक्ट्सकडून प्रस्ताव मागविणेकरीता मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.२९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर, चावडी, द्वारकामाई, दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करणेकामी आर्किटेक्टची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात Request for proposal (RFP) मागणी करणारी सुचना प्रसिध्द करुन त्याव्दारे या क्षेत्रातील तज्ञ आर्किटेक्ट्सकडून प्रस्ताव मागविणेस तत्वत: मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं. २७ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त शिर्डी व परिसरात उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधा व त्यासाठी आवश्यक निधीची मागणी करणारा प्रारुप प्रकल्प अहवाल शासनास सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री क्षेत्र शिर्डी, ता. राहाता, जिल्हा. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. याकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे.

सदर बैठकीतील चर्चेअंती सन २०१७-१८ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाच्या तयारीकरीता संस्थानव्दारे नियोजित प्रकल्पांची रुपरेषा आणि वित्तीय भार यांची व्याप्ती पहाता सदर महोत्सवाच्या तयारीसाठी आवश्यक असणारा निधी केंद्र शासनाकडे मागणी करणारा प्रस्ताव सादर करण्यात यावा. श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाच्या पूर्वतयारीकरीता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात यावी. दि. ११/१२/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सुचनेनुसार कृती अराखडयामध्ये उचित बदल करुन सुधारित प्रारुप कृती आराखड्यास मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीची मान्यता घेण्यात यावी. मा. मुख्य सचिव उपसमितीने प्रारुप कृती आराखड्यास मान्यता प्रदान केल्यानंतर अंतीम मान्यतेकरीता प्रारुप कृती आराखडा मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीसमोर सादर करणेत यावा व प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत यावा असे ठरले.

याप्रमाणे हाती घ्यावयाच्या प्रकल्पाचे स्वरुप ठरविणेसाठी सर्वांगीण अभ्यास व सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेकामी सल्लागार नेमणूकीसाठी यापुर्वी संस्थानने विहीत पध्दतीने अर्ज मागविले होते. यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेत Tata Consulting Engineers Limited यांची नेमणूक करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला. सदर प्रस्तावावर *सविस्तर चर्चा होऊन* निर्णय क्र. ४०८ अन्वये *"श्री साईबाबा महासमाधी शताब्दी निमित्त शिर्डी व लगतचे परिसराचे विकासाकरीता कृतीआराखडा तयार करणेकामी Tata Consulting Engineers Limited यांची सल्लागार म्हणून रु.८७,३०,०००/- मात्र फी वर नेमणूक करण्यात यावी. तसेच याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये संस्थान वकिलांमार्फत तात्काळ सिव्हील अर्ज दाखल करण्यात यावा असे ठरले."*

*त्यानुसार* संस्थान त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील PIL No.18/2011 मध्ये Tata Consulting Engineers Limited यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी अदा करावयाचे रु.८७,३०,०००/- चे खर्चास परवानगी मिळणेबाबतचा सिव्हील अर्ज क्र.१६०८६/२०१५ दाखल करणेत आला. सदरहु सिव्हील अर्जावर मा. उच्च न्यायालयाने दि.१५/०१/२०१६ रोजी खालील प्रमाणे आदेश पारीत केला आहे.

*".. .. The present application is seeking permission to appoint Tata Consulting Engineers Ltd., Noida, for submitting Project Report on development of Shirdi and adjoining villages in connection with ShriSaibabaMaha Samadhi ShatabdiMahotsav (01-10-2017 to 19-10-2018). Naturally, if the funds are received from the central Government, the applicant would spend the said funds for the said development activities as would be proposed in the Project Report. It is also submitted that the said Tata Consulting Engineers Limited has given lowest tender.*

*Considering the above, the Civil Application is allowed in terms of prayer clause **"B"** and the same is accordingly disposed of."*

तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी दि. १८/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डी व लगतच्या परिसराच्या विकासाकरीता कृती आराखडा तयार करण्यासाठी सल्लागार संस्था नियुक्त केल्यानंतर त्यांना अदा करावयाची फी रक्कम रु. ८७,८३,०००/- मात्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्याव्दारे अदा करण्यात यावी असे कळविलेले आहे. त्यानुसार याकामी Tata Consulting Engineers Limited, यांना संस्थानचे जा. क्र. ५९४०/२०१६, दि.२७/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये नेमणूक आदेश देण्यात आला. तसेच याबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि-१०१६/२७५/प्र. क्र.४४/का.१६, दि.१६/०४/२०१६ रोजी खालीलप्रमाणे शासन निर्णय पारीत झालेला आहे.

*"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ च्या पूर्वतयारीसाठी शिर्डी व लगतच्या परिसराच्या विकासाकरीता एकत्रित कृती आराखडा तयार करण्यासाठी सर्वात कमी देकार असलेल्या टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि.नोएडा यांची रु.८७,३०,०००/-इतक्या देकारावर सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास व त्यावरील खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. नोएडा यांची नियुक्ती संस्थानव्दारे राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत असून, सदर सल्लागार यांची फी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याव्दारे अनुज्ञेय राहील".*

शताब्दी महोत्सवानिमित्त उपलब्ध करावयाच्या आवश्यक सोयी-सुविधांची उभारणी करणेसाठी करावयाच्या नियोजनाबाबत मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०१/२०१६ रोजी संस्थानचे सर्व विभागांची तसेच दि. २२/०१/२०१६ रोजी सर्व शासकिय व निमशासकिय विभागांची बैठक आयोजित करुन सल्लागार संस्थेच्या प्रतिनिधींना माहिती देण्यात आली आहे.

तदनंतर दि. २२/०४/२०१६ रोजी मा. जिल्हाधिकारी ,अहमदनगर तथा सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे समोर जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, लि. या संस्थेचे प्रतिनिधींनी प्रारुप प्रकल्प अहवाल (Draft DPR)सादर केला आहे.

सल्लागार यांनी सादर केलेला सद्यस्थितीतील प्रारुप प्रकल्प अहवाल इकडील कार्यालयाचे जा. क्रं. एसएसएसटी/ बांधकाम/ शताब्दी/३५७/२०१६,दि.२५/०४/२०१६ रोजीचे पत्रासोबत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय

विभाग यांचे माहितीस्तव सादर करणेत आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. सासंवि-२०१६/प्र.क्र. ३५/का.१६,दि.२०/०२/२०१६ अन्वये मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाच्या पूर्वतयारीकरीता कृती आराखडा उप समिती गठीत करणेत आलेली आहे. सदर समिती सदस्यांना देणेसाठी Draft DPR च्या ०६ प्रती दि. २९/०४/२०१६ रोजी कार्यासन अधिकारी (का. १६) यांचेकडे देण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर सदरचे प्रकल्प अहवालामध्ये काही आवश्यक त्या दुरुस्त्या करणेत आलेल्या आहेत.

तरी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांचेमार्फत तयार करणेत आलेला प्रारुप प्रकल्प अहवाल(Draft DPR) आजचे सभेपूढे सादर करणेसाठी त्यांचे प्रतिनिधींना पाचारण करणेत आले असून सदरहु सादरीकरण पाहून प्रारुप प्रकल्प अहवालराज्य शासनास सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२११** **आजचे सभेपुढे टाटा कंन्सल्टींग इंजिनिअर्स लिमीटेड (TCE) यांचे प्रतिनीधी श्री.बी.एम.दाते, श्रीमती आदिती घोष व श्रीमती सुषमा पियाजा हे उपस्थित होते. त्यांनी टाटा कंन्सल्टींग इंजिनिअर्स लिमीटेड यांचे मार्फत तयार करण्यात आलेल्या प्रारुप प्रकल्प अहवालाचे (Draft DPR) सभेपुढे सादरीकरण केले. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, केंद शासनाकडे प्रकल्प अहवाल सादर केल्यानंतर त्याचे छाननीसाठी बराच कालावधी लागु शकतो व लगेच निधी उपलब्ध होण्याची शक्यता नाही. त्यामुळे निविदा प्रक्रियेस पुरेसा अवधी मिळणार नाही. त्यासाठी खालील सुचना करणेत आल्या.**

**१. प्रकल्प अहवालात समाविष्ट करणेत आलेल्या प्रकल्पचे प्राधान्यगट तयार करणेत यावेत.**

**२. शताब्दी सोहळयासाठी अत्यावश्यक जसे की, गर्दीचे व्यवस्थापन, वाहतुक नियोजन, वाहनतळे, सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही, माहिती केंद्रे, दर्शन रांगा या व्यवस्थांशी निगडीत कामांचा प्रथम प्राधान्य गटात समावेश करावा.**

**३. कामे पूर्ण करण्यास अपेक्षित असलेला कालावधी व फंडीग गॅप विचारात घेऊन शताब्दीपुर्वी पूर्ण होणार नसलेले दिघ मुदतीचे प्रकल्प व्दितीय अथवा तृतीय प्राधान्य गटात समाविष्ट करावेत.**

**४. संस्थानचे स्व:ताचे नियोजीत प्रकल्प हे सर्वांगिण DPR चा भाग आहेत परंतु त्यापैकी जी कामे तातडीने करणे आवश्यक आहेत ते वेगळया स्वरुपात मांडणे.**

**वरील प्रमाणे सुधारणा करुन प्रकल्प अहवाल (Draft DPR) राज्य शासनाकडे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. २८** **माहे मार्च-२०१६ मधील धुलीवंदन, गुड फ्रायडे, छत्रपती शिवाजी महाराज जयंती व चौथा शनिवार तसेच रविवार व त्यास जोडून आलेल्या रंगपंचमी अशा सलग सुट्टयांचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- दिनांक २४/०३/२०१६ ते २८/०३/२०१६ पर्यंत सलग सुट्टया येत असल्याने या कालावधीत शिर्डी येथे साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने गर्दीचे काळात साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेकामी खालील ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी संरक्षण विभागाने जा.नं.२०३५/२०१६ दि.०३/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

१) १६ गुंठे वाढीव दर्शन रांग.
२) गेट नं.२ चे प्रवेशद्वार.
३) पिंपळवाडी रस्त्याचे फुटपाथवर गेट नं. १ ते पॉवर हाऊस ते जुने प्रसादालय हॉल.
४) लाडू काऊंटर रेलींगवर.
५) जुने प्रसादालय बुंदी किचन ते नगर – मनमाड रस्ता फुटपाथ ते लक्ष्मीनगर पर्यंत फुटपाथवर.

वरील मंडप व्यवस्थेव्यतिरिक्त उन्हाळयाचे दिवस असल्याने उन्हाची तिव्रता वाढलेली असल्याने मंदिर परिसरात साईभक्तांनी दर्शन घेतल्यानंतर बाहेर पडण्याच्या मार्गावर तसेच उदी वाटप काऊंटरसमोर रेलींगच्या भागात व माध्यांन्ह आरतीच्या वेळेस साईभक्त सभाकुंड येथे थांबतात. करीता या भागात मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे दि.२४/०३/२०१६ ते २८/०३/२०१६ अखेर ५ दिवस मंडप व्यवस्था करणेकामी दिपावली व नाताळ सुट्टयांचे कालावधीत उभारणेत आलेल्या मंडप व्यवस्थेच्या महेंद्र शांतीलाल चोरडीया ( बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड) व राजेश मंडप अॅण्ड डेकोरेटर्स,औरंगाबाद यांचे मंजूर दर रु.१.११ प्रती चौ. फुट प्रती दिवस या दराने करुन घेता येईल. याबाबत त्यांचेशी दूरध्वनीवर चर्चा केली असता, श्री महेंद्र शांतीलाल चोरडिया यांनी सहमती दर्शविली आहे. याकामी खालीलप्रमाणे खर्च येईल.

**मंडपाचा कालावधी – दि.२४/०३/२०१६ ते २८/०३/२०१६ अखेर ०५ दिवस.**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत (१६ आर) | १२५x४७ | ५८७५ चौ. फुट | | |
| ०२ | गेट नं.२ चे प्रवेशद्वार (पिंपळवाडी रस्त्यावर) | ७५x२८ | २१०० चौ. फुट | | |
| ०३ | पिंपळवाडी रस्त्यावर उत्तर बाजू फुटपाथवर पॉवर हाऊस गेट पर्यंत. | १५०x७ | १०५० चौ. फुट | | |
| ०४ | गेट नं.१ समोर | ४६x१५ | ६९० चौ. फुट | | |
| ०५ | पॉवर हाऊस गेट ते जुने प्रसादालय हॉल | ९०x६ | ५४० चौ. फुट | | |
| ०६ | लाडू काऊंटर समोरील रेलींगवर | ६०x१५ | ९०० चौ. फुट | | |

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०७ | जुने प्रसादालय बुंदी किचन ते नगर – मनमाड रस्त्यावरील फुटपाथ लक्ष्मीनगर पर्यंत. | २७०x९ | २४३० चौ. फुट | | |
| ०८ | मंदिर परिसरात साईभक्तांनी दर्शन घेतल्यानंतर बाहेर पडण्याच्या मार्गावर | १३२x१०<br>३१x१९ | १३२० चौ. फुट<br>५८९ चौ. फुट<br>**१९०९ चौ. फुट** | | |
| ०९ | उदी काऊंटर समोरील रेलींगच्या भागात | ४५x१८ | ८१० चौ. फुट | | |
| १० | रथ पालखी रस्त्यावर द्वारकामाई ते गुरुस्थान गेट पर्यंत | १९०x१२ | २२८० चौ. फुट | | |
| ११ | समाधी मंदिर -उत्तर बाजूकडील सभाकुंड येथे | ६१x६१ | ३७२१ चौ. फुट | | |
| | | **एकूण -** | २२,३०५ **चौ. फुट** | **१.११ प्र. चौ. फुट प्र.दिन.** | १,२३,७९३.०० |

उपरोक्त प्रमाणे दि.२४/०३/२०१६ ते २८/०३/२०१६ अखेर ५ दिवस सलग सुट्टया असल्यामुळे गर्दी होण्याची शक्यता असल्याने या कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी रक्कम रु.**१,२३,७९३**/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

सदरचे काम तातडीचे असल्याने याकामी दिपावली सुट्टीचे कालावधीत मंडप व्यवस्थेचे ठेकेदार श्री महेंद्र शांतीलाल चोरडीया, मनमाड यांचे जा.नं. एसएसएसटी/बांधकाम/४८६६/२०१५ दिनांक ०१/१२/२०१५ रोजीच्या कार्यादेशातील मंजूर दर रु.१.११ प्रती चौ. फुट प्रती दिवस या मंजूर दरानुसार करुन घेणेसाठी दि.०९/०३/२०१६ रोजीचे कार्यालयीन टिपणीवरील मान्यते अन्वये ठेकेदार यांना इकडील जा. नं.६९९३ /२०१६ दि.२१/०३/२०१६ अन्वये तसेच इकडील दि.२६/०३/२०१६ रोजीचे टिपणीवरील मान्यते अन्वये ठेकेदार यांना इकडील जा.नं.७११४/२०१६ दि.२९/०३/२०१६ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. ठेकेदार यांनी मंडप उभारणीचे काम पूर्ण केले आहे. तरी याप्रमाणे येणारे रु.**१,२३,७९३**/- मात्रचे खर्चास व वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२९२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे मार्च-२०१६ मधील धुलीवंदन, गुड फ्रायडे, छत्रपती शिवाजी महाराज जयंती व चौथा शनिवार तसेच रविवार व त्यास जोडून आलेल्या रंगपंचमी अशा सलग सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडपव्यवस्था करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व त्याकामी आलेल्या रु.१,२३,७९३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं. २९ **सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद**:- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना**:- उन्हाळा सुट्टीच्या कालावधीमध्ये शिर्डी येथे साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते, त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर श्री साईप्रसादालय परिसर, भक्तनिवास (५०० रुम) परिसर व जुने प्रसादालय या ठिकाणी ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे.

त्यानुसार याकामी दि.०१/०२/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई – निविदांमधील टेक्नीकल बीड दि.२१/०३/२०१६ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.एस.व्ही.गमे | प्रशासकीय अधिकारी |
| ३ | श्री.यु.पी.गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| ४ | श्री. डी. टी. उगले | प्रशासकीय अधिकारी |
| ५ | श्री. आर.बी. आहेर | उप कार्यकारी अभियंता |
| ६ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ७ | श्री. एम.पी. गव्हाणे | कनिष्ठ अभियंता |
| ८ | श्री. संजय गायकवाड | प्र. वरिष्ठ लेखापाल |
| ९ | श्री. गगन सुर्वे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | पॅन कार्डची छायांकीत प्रत | सर्व्हीस टॅक्स रजिस्ट्रेशन | रु.१००/- मात्रचे मुद्रांकावर हमीपत्र. | मंडप उभारणीच्या उलब्ध साहित्याचा तपशिल | |
| १ | काळे ॲण्ड सन्स, पुणे | SBI – Pune Dt.14/03/2016 D.D. No.328793 Rs.20,000/- SBI – Pune Dt.14/03/2016 D.D. No.328794 Rs. 1,000/- | जोडली आहे | जोडलेले नाही. | जोडले आहे. | जोडला आहे. | अपात्र |
| २ | साईकृपा टेंट हाऊस, बेलापूर, ता. श्रीरामपूर | Bank of Maharashtra Dt.14/03/2016 D.D. No.009531 Rs.20000/- Bank of Maharashtra Dt.14/03/2016 D.D. No.009532 Rs.1000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ३ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | State Bank of H.bad Dt.16/03/2016 D.D. No.523389 Rs.20000/- State Bank of H.bad Dt.16/03/2016 D.D. No.523388 Rs.1000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ४ | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | State Bank of H.bad Dt.03/03/2016 D.D. No.503395 Rs.20000/- State Bank of H.bad Dt.03/03/2016 D.D. No.503396 Rs.1000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ५ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | - | - | - | - | - | अपात्र |
| | शेरा | ठेकेदार यांनी टेक्नीकल बीडची हार्डकॉपी सादर केलेली नसल्याने त्यांचे ई – निविदेतील टेक्नीकल बीड उघडण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर ठेकेदार अपात्र आहे. | | | | | |

सन- २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणेकामी एकूण ५ मंडप ठेकेदार यांनी ई – निविदा भरलेल्या होत्या. त्यापैकी चार ठेकेदार यांनी हार्डकॉपी सादर केलेली आहे. वरील प्रमाणे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता अ.नं. १ चे ठेकेदार काळे ॲण्ड सन्स, पुणे यांनी सर्व्हीस टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडलेले नसल्याने ते अपात्र आहेत. अ.नं. ५ चे ठेकेदार यांनी हार्डकॉपी सादर केलेली नसल्यामुळे त्यांचे निविदेतील टेक्नीकल बीड उघडण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर ठेकेदार अपात्र आहे. तसेच अ.नं. २ ते ४ चे, ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे.

सन- २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप उभारणीकरीता वरील पात्र ठेकेदारांच्या ई - निविदांमधील कमर्शिअल बीड दि.२९/०३/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत उघणेत आले आहे. त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता करावयाची मंडप व्यवस्था ( कालावधी - दि.०१/०४/२०१६ ते दि.१५/०६/२०१६ अखेर ७६ दिवस)**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण/ एकक | मंडप ठेकेदाराचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईकृपा टेंन्ट हाऊस | | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, | | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, | |
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| १ | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे**:- मंदिर परिसरामध्ये समाधी मंदिर उत्तर बाजू सभाकुंड तसेच साई कॉम्प्लेक्स समोरील मोकळया जागेत ( १६ आर) | २४५९९ चौ. फुट | ४१.८० | १०,२८,२३८.२० | ३८.०० | ९,३४,७६२.०० | ३०.४० | ७,४७,८०९.६० |
| २ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप ( लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे:- समाधी मंदीर दक्षिण बाजू, गुरुस्थान मंदिर, श्रींचे चावडीसमोर, शनी, महादेव, श्री गणेश मंदिरासमोर, गेट नं. ३ ते मारुती मंदिर, गेट नं. ३ समोर, गेट नं. ४ चे बाहेरील बाजूने , उदी वाटप काऊंटर समोर, दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, नगर – मनमाड रस्ता व पिंपळवाडी रस्त्याचे फुटपाथवर, दर्शन लाईन प्रवेशद्वार पुर्व व पश्चिम बाजू, लाडू काऊंटर समोर, श्री साईप्रसादालय प्रवेशद्वार ते तिकीट काऊंटर पर्यंत, पिंपळवाडी रस्त्यावर साई कॉम्प्लेक्स समोर, इ. भागात मंडप उभारणे. | ५४२०२ चौ. फुट | ३०.४० | १६,४७,७४०.८० | २६.६० | १४,४१,७७३.२० | १६.०० | ८,६७,२३२.०० |
| ३ | जुने प्रसादालय परिसरात शामियाना मंडप कनात व बिछायतीसह उभारणे. | ८५०५ चौ. फुट | २२.८० | १,९३,९१४.०० | २२.८० | १,९३,९१४.०० | ११.४० | ९६,९५७.०० |
| एकूण रक्कम रु. | | | | २८,६९,८९३.०० | | २५,७०,४४९.२० | | १७,११,९९८.६० |
| | | | | | | | | निम्नतम |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. त्यांचेकडून मंडप व्यवस्था करणेकामी रु.१७,११,९९८/- मात्र इतका खर्च येईल. याबाबत ई-निविदांचे तुलनात्मक तक्त्यावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी "मागील दराशी तुलना करुन L- 1 यांचेशी चर्चा करावी" असा आदेश दिलेला आहे. त्यानुसार निम्नतम निविदाधारक मे. न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी दि.२९/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये त्यांचे ई – निविदा दरात खालील प्रमाणे सुट देऊ केली आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | ई – निविदेतील दर | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांनी देऊ केलेले सवलतीचे दर |
|---|---|---|---|
| १ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे:- मंदिर परिसरामध्ये समाधी मंदिर उत्तर बाजू सभाकुंड तसेच साई कॉम्प्लेक्स समोरील मोकळया जागेत ( १६ आर) | रु.०.४० प्र.चौ.फु. प्र. दिवस | रु. ०.३५ प्र.चौ.फु. प्र. दिवस |
| २ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप ( लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे:- समाधी मंदीर दक्षिण बाजू, गुरुस्थान मंदिर, श्रींचे चावडीसमोर, शनी, महादेव, श्री गणेश मंदिरासमोर, गेट नं. ३ ते मारुती मंदिर, गेट नं. ३ समोर, गेट नं. ४ चे बाहेरील बाजूने , उदी वाटप काऊंटर समोर, दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, नगर – मनमाड रस्ता व पिंपळवाडी रस्त्याचे फुटपाथवर, दर्शन लाईन प्रवेशद्वार पुर्व व पश्चिम बाजू, लाडू काऊंटर समोर, श्री साईप्रसादालय प्रवेशद्वार ते तिकीट काऊंटर पर्यंत, पिंपळवाडी रस्त्यावर साई कॉम्प्लेक्स समोर, इ. भागात मंडप उभारणे. | रु.०.२१ प्र.चौ.फु. प्र. दिवस | रु. ०.१८ प्र.चौ.फु. प्र. दिवस |
| ३ | जुने प्रसादालय परिसरात शामियाना मंडप कनात व बिछायतीसह उभारणे. | रु.०.१५ प्र.चौ.फु. प्र. दिवस | रु. ०.११ प्र.चौ.फु. प्र. दिवस |

ठेकेदार यांनी देऊ केलेल्या सवलतीचे दरानूसार रक्कम रु.१४,६६,९१८/- मात्र खर्च येईल. याकामी मा. उच्च न्यायालय मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांचे परवानगीसाठी सिव्हील अर्ज दाखल करावा लागेल. तथापी मा. न्यायालयाचे परवानगीसाठी बराच कालावधी लागेल. तरी उन्हाळयाचे दिवस असल्याने सावलीसाठी उन्हाळी मंडप लवकरात लवकर उभारणी करणे आवश्यक आहे. निविदेमध्ये मंडप उभारणीसाठी ७६ दिवसाचा कालावधी विहीत करणेत आलेला आहे. दरम्यान साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता सुरुवातीचे ६० दिवसाचे कालावधीसाठी कार्यादेश देता येईल. तसेच खालील मंडप कार्यादेशातुन वगळल्यास खर्च आणखी कमी होईल.

| अ.नं. | कामाचा तपशिल | साईज | परिमाण / एकक |
|---|---|---|---|
| १ | दर्शनद्वार ते शनिमंदिर गेट ( शांतीनिवास इमारतीचे दक्षिण बाजूस) | १०६x२० | २१२० चौ. फुट |
| २ | मारुती मंदिर ते शामसुंदर हॉल | ३९-९x21<br>५७x२७-५ | ४३४.७५ चौ. फुट |
| ३ | जुने प्रसादालय प्रवेशद्वार येथे मोबाईल लॉकर जवळ | ४५-६x३०-६ | १३८७.७५ चौ. फुट |
| ४ | श्री साईप्रसाद निवासस्थान कार्यालयासमोर | ६०x१५<br>३२x८ | ९०० चौ. फुट<br>२५६ चौ. फुट |
| ५ | श्री दत्त मंदिरासमोर | १०१x३०-३ | ३०५५.२५ चौ. फुट |
| ६ | श्री साई प्रसादालय येथे श्री साईबाबांचे शिल्पासमोर | ९०x२० | १८०० चौ. फुट |
| ७ | समाधी मंदिर दक्षिण बाजू चावडी समोरील मंडप व गेट नं. ४ समोरील मंडपाची साईज कमी केलेली आहे. | - | ४४६७.०० चौ. फुट |
| | | **एकूण -** | **१६,३८५ चौ. फुट** |

तरी वर नमूद ई – निविदांपैकी निम्नतम दराचे ठेकेदार न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांना ६० दिवसांचे कालावधीसाठी कार्यादेश देणेस व त्यासाठी सदरहू ठेकेदार यांनी वरीलप्रमाणे देऊ केलेल्या सवलतीचे दरानुसार व वरीलप्रमाणे मंडप वगळून येणारे अपेक्षित रु.९,८१,१३६/- मात्रचे खर्चास तसेच उन्हाळयाच्या कालावधीत ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडपव्यवस्था करणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अपेक्षित रु.९,८१,१३६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं. ३० **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन २०१६ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना:- संस्थानमार्फत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सोमवार दि.१० ऑक्टोबर २०१६ ते गुरुवार दि.१३ ऑक्टोबर २०१६ अखेर ०४ दिवस श्रींचा पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात खालील तपशिलाप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

अ) **समाधी मंदिर परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे:-**

१) **एम.एस .पाईप,कैच्यावापरुनवरीलबाजूनेताडपत्रीवआतिलबाजुनेसुशोभितकाडपअसलेलेमंडप.**

(कालावधी दि.१०/१०/२०१६ते दि.१३/१०/२०१६ अखेर ०४ दिवस)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरद्वार गेटपर्यंत. | २८४'x१९' | ५३९६.०० |
| ०२ | समाधी मंदिरासमोरील सभाकुंडामध्ये | ६१'x६१' | ३७२१.०० |
| ०३ | मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत | २००'x७८' | १५६००.०० |
| एकूण चौ. फुट | | | २४,७१७.०० |
| **अंदाजे रु.२.२०प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -** | | | **२,१७,५१०/-** |

**२) पाईप / बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप.**

(कालावधी दि.१०/१०/२०१६ते दि.१३/१०/२०१६ अखेर ०४ दिवस).

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर दक्षिण बाजूस, द्वारकामाई ते पालखी गेटपर्यंत | १६०'x१८' | २८८०.०० |
| ०२ | अ) समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग (गुरुस्थान गेट) गुरुस्थान समोरील बेसमेंट पर्यंत. | १५०'x१०' | १५००.०० |
| | ब) गुरुस्थानसमोरपश्चिमबाजूसदक्षिण – उत्तरअसा. | ४५'x३५' | १५७५.०० |
| ०३ | गेट नं.३ ते श्री मारुती मंदिर पर्यंत १५ फुट उंचीचा | ६५'x२०' | १३००.०० |
| ०४ | श्री मारुती मंदिर ते शाम सुंदर हॉल पर्यंत | ६०'x२७' | १६२०.०० |
| ०५ | गेट नं.०४ समोर | ६०'x२५' | १५००.०० |
| ०६ | श्रींचे चावडी समोर शामसुंदर हॉल पर्यंत | ८०'x३०' | २४००.०० |
| ०७ | शनि मंदिर, महादेव, श्री गणेश मंदिरासमोर. | ६०'x४०' | २४००.०० |
| ०८ | शनि मंदिर व्हि.आय.पी. गेट समोर दर्शन रांगेकरीता | ८०'x१०' | ८००.०० |
| ०९ | मंदिर परिसरामध्ये कॅलेंडर विक्री काऊंटर समोर | १५'x२०' | ३००.०० |
| १० | श्री साई प्रसादालय मुख्य गेट ते तिकीट बुकींग काऊंटर पर्यंत. | १५०'x१८' | २७००.०० |
| ११ | श्री साईबाबांचे शिल्पासमोर | ९०'x१८' | १६२०.०० |
| १२ | जनसंपर्क कार्यालयासमोर | ४०'x१५' | ६००.०० |
| १३ | लेंडीबागेत श्री दत्त मंदिरासमोर | १०५'x३५' | ३६७५.०० |
| १४ | उदी काऊंटर समोर | ४५'x२०' | ९००.०० |
| १५ | जुना पिंपळवाडी रस्ता दर्शन रांगेच्या पुर्व व पश्चिम बाजूने | ३०'x७५'<br>४५'x१५' | २२५०.००<br>६७५.०० |
| १६ | जुने प्रसादालय परिसरात मोबाईल लॉकर्स समोर | ४५'x२५' | ११२५.०० |
| १७ | लाडू विक्री काऊंटर समोर | ६०'x३०' | १८००.०० |
| १८ | नगर मनमाड रस्ता पुर्व बाजू फुटपाथवर | ४३०'x८' | ३४४०.०० |
| १९ | साई कॉम्प्लेक्स समोर पिंपळवाडी रस्त्यावर दर्शन रांगेसाठी | ३००'x१८' | ५४००.०० |
| २० | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू फुटपाथवर | ४००'x७' | २८००.०० |
| | | एकूण चौ. फुट | ४३,२६०.०० |
| | | **अंदाजे रु.१.६५ प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -** | **२,८५,५१६/-** |
| | | **एकूण (अ १+२)** | **५,०३,०२६/-** |

**ब) साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था:-**

(कालावधी दि.१०/१०/२०१६ते दि.१३/१०/२०१६ अखेर ०४ दिवस).

| अ.नं. | ठिकाण | साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३' -६'' उंचीचे स्टेज अंगल फ्रेममध्ये मजबुत बांधी तयार करुन स्टेजचे वरील बाजुने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०'x२०' साईजचे स्टेज तयार करणे. तसेच सदरहू स्टेजचे वरील बाजूने ताडपत्री बांधून,आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजुने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगाचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे, स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, १००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करणे, तसेच स्टेजचे बाजूने स्पीकर ठेवणेकरीता ६'x६' साईजचे व ३ फुट उंचीचे प्लॅटफॉर्म तयार करणे व स्टेज समोर ४' उंचीचे १५० रनिंग फुट बॅरेकेडींग करणे. इ. सह स्टेज व्यवस्था करणे. | ३०'x२०' | ६००.०० |
| एकूण चौ. फुट | | | ६००.०० |
| **अंदाजे रु.२७.५० प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | | | **१६,५००/-** |
| ०२ | **मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे:-** सदर स्टेजवर सुमारे २० ते २५ कलाकारांकरीता २'-६' उंचीचे स्टेज अंगल फ्रेममध्ये स्टॅण्ड उभारणी करुन प्रत्येकी ३'x३' अंतरावर खालील बाजूस सपोर्ट देऊन त्यावर भक्कम प्लायवूड एकाच लेव्हलमध्ये बांधणेत यावेत. स्टेजचे पाठीमागील भागात निळया रंगाचा प्लेन पडदा लावून साईडणे सफेद (पांढरे) कापड तसेच स्टेजचे प्लॅटफॉर्मला पुढील बाजूने तसेच साईडणे चॉकलेटी / सफेद रंगाचे कापड लावण्यात यावेत. स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअप करीता १०'x१०' साईजचे दोन (०२) ग्रीन | १६'x२४' | ३८४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | रुम, जाड कापडी पार्टीशनमध्ये तयार करणे, स्टेजवर मॅटीन टाकून स्टेज सुमारे ३०० नग फायबर खुर्च्या टाकणे.<br>तसेच स्टेजचे बाजूने स्पीकर ठेवणेकरीता ३'x३' साईजचे व ३ फुट उंचीचे प्लॅटफॉर्म तयार करुन देणे व स्टेज करीता दोन बाजुने अंदाजे ३ फुट ते ४ फुट रुंदीच्या पाय-या (जिने) तयार करुन बसविणे. इ. सह स्टेज व्यवस्था करणे. | | |
| | | ..एकूण चौ. फुट | ३८४.०० |
| | | **अंदाजे रु.२५.३० प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | ३८,८६१/- |
| | | **एकूण (अ १ + २)** | १,०४,८६१/- |

**क) दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणे:-**

| अ.नं. | ठिकाण | साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलींग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४'' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेडींग करणे. | १००० रनिंग फुट | १०००.०० |
| | | एकूण चौ. फुट | १०००.०० |
| | | **अंदाजे रु.३.३० प्रती चौ. फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | १३,२००/- |
| | | **एकूण (अ+ब+क)** | ६,२१,०८७/- |

पुण्यतिथी उत्सव २०१६ निमित्त करावयाच्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकरीता वरीलप्रमाणे एकूण रु.६,२१,०८७/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव:-** श्री पुण्यतीथी उत्सव (दसरा) २०१६ करिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.६,२१,०८७/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. तसेच समाधी मंदिर व परिसरात रंगकाम करणेकामी रु.१५,०००/-, विद्युत रोषणाई करीता बांबु गोल्टे भाडोत्री व विकत घेणेकरीता रु.२०,०००/- व माहीतीचे बोर्ड तयार करणेकामी रु.१०,०००/- असा एकूण रु.६,६६,०८७/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरहू कामी येणारा खर्च हा रु.१० लक्ष पेक्षा कमी रकमेचा असलेने, त्यास मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीची आवश्यकता नाही असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव २०१६ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.६,६६,०८७/- मात्रचे खर्चास तसेच मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन- २०१६ मध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६,६६,०८७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं. ३१ **सन २०१६ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतुद-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट- कलम (१) अन्वये *"...भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे..."* अशी तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सोमवार दि.१८ जुलै २०१६ ते दि.२० जुलै २०१६ अखेर श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. साईभक्तांचे पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून दि.०१/०७/२०१६ ते ३०/०९/२०१६ अखेर ९२ दिवस मंदिर परिसरात विविध ठिकाणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेत येतात. सदर मंडपाचा वापर गुरुपौर्णिमा उत्सवात साईभक्तांसाठी होतो. पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे पावसापासून संरक्षण होणेकामी मंदिर परिसरात मंडप उभारणीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**पावसाळयाचे कालावधीत ताडपत्रीचेछतअसलेले (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) कापडी मंडप व्यवस्था:– कालावधीदि.०१/०७/२०१६दि.३०/०९/२०१५अखेर एकूण ९२ दिवस .**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिरबाहेर पडण्याचा मार्ग ते श्री गुरुस्थान मंदिराचे समोरील बेसमेंटचे पश्चीम बाजू पर्यंत (पुर्व - पश्चिम) | १४०'x१०' | १४००.०० |
| २ | बेसमेंटचे पश्चिम बाजूस (दक्षिण – उत्तर) | ३०'x१९' | ५७०.०० |
| ३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजूस, दक्षिणोत्तर असा | ४५'x३६' | १६२०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | व्हि.आय.पी. दर्शन रांगेसाठी (शनि गेट) | ६५'x०८' | ५२०.०० |
| ५ | गेट नं.०३ समोर | ४५'x१८' | ८१०.०० |
| ६ | जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम प्रवेशद्वारासमोर | ३०'x७०'<br>४५'x१५' | २१००.००<br>६७५.०० |
| | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ नंदादिप समोर | १०५'x३५' | ३६७५.०० |
| ८ | साईप्रसाद नं.०२/ चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत. | १५'x६०'<br>१५'x२०' | ९००.००<br>३००.०० |
| ९ | लाडू विक्री काऊंटर समोर | ६०'x३०' | १८००.०० |
| १० | नगर मनमाड रस्ता पुर्व बाजू फुटपाथवर | ४००'x८' | ३२००.०० |
| ११ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू फुटपाथवर | ३८०'x७' | २६६०.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **२०२३०.००** |
| | **अंदाजे रु.०.३३ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (अ साठी)रुपये-** | | **६,१४,१८३.००** |

**ब) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले)–**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | **मंडपाची साईज** | **चौरस फुट** |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिरासमोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह ) | ६१'x६१' | ३७२१.०० |
| २ | उदी वाटप काऊंटर समोर | ४५'x२०' | ९००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **४६२१.००** |
| | **अंदाजे रु.०.३९ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- ( ब साठी) रुपये-** | | **१,६५,८०१.००** |
| | **पावसाळयासाठी करावयाच्या मंडप व्यवस्थेसाठी अपेक्षीत खर्च (अ+ब ) एकूण रु.** | | **७,७९,९८४.००** |

वरील तक्यांत नमूद केलेप्रमाणे पावसाळयाचे कालावधीत श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.७,७९,९८४/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. सदरहू कामी येणारा खर्च हा रु.१० लक्ष पेक्षा कमी रकमेचा असलेने, त्यास मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीची आवश्यकता नाही असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे पावसाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.७,७९,९८४/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई– निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.७,७९,९८४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं. ३२ **श्री गुरुपोर्णिमा उत्सव २०१६ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद**:- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना**:- संस्थानतर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सोमवार दि.१८ जुलै, २०१६ ते बुधवार दि.२० जुलै, २०१६ अखेर श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेडींग,स्टेज,कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१६ निमित्त करावयची व्यवस्था:

(कालावधी दि.१८.०७.२०१६ ते दि२०.०७.२०१६ अखेर ०३ दिवस)

०१. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | **मंडपाची साईज** | **चौरस फुट** |
|---|---|---|---|
| १ | श्रींचे चावडीसमोरील जागेत १८' उंचीचा | ५०'x३०' | १५००.०० |
| २ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरासमोर | ६०'x४०' | २४००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | द्वारकामाई ते रथ पालखी गेट पर्यंत | १६०'x१७' | २७२०.०० |
| ४ | समाधी मंदिर गेट नं.३ ते मारुती मंदिरापर्यंत १५' उंचीचा | ५०'x२०' | १०००.०० |
| ५ | श्री मारुती मंदिर ते शामसुंदर हॉलपर्यंत दक्षिणोत्तर १५ उंचीचा | ६०'x२५' | १५००.०० |
| ६ | गेट नं.४ करीता बाहेरील बाजूस | ४५'x२५' | ११२५.०० |
| ७ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता कनात व बिछायतीसह | १५'x१५' | २२५.०० |
| ८ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह. | १५'x१५' | २२५.०० |
| ९ | पालखी स्वागता करीता तसेच माहिती केंद्रासाठी स्वागत कक्ष येथे माहिती केंद्रासाठी कनात व बिछायतीसह. | १५'x१५' | २२५.०० |
| १० | जुने प्रसादालय प्रवेशद्वार (नगर – मनमाड फुटपाथ व आतील बाजूने मोबाईल लॉकर पर्यंत) | ४५'x२५' | ११२५.०० |
| ११ | साई धर्मशाळा येथे पालखी ठेवण्यासाठी | ९०'x६०'<br>९०'x४०' | ५४००.००<br>३६००.०० |
| **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | | **२१०४५.००** |
| **अंदाजे रु.३.६६प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (०१ साठी)रुपये-** | | | **२,३१,०७४** |

**०२. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिर उत्तर बाजूस,चावडी गेट ते नगरद्वार गेटपर्यंत १८' उंचीचा. | २८४'x१९'.०'' | ५३९६.०० |
| २ | गेट नं.३ समोरील मोकळया जागेत (१६ आर जागेत) | २००'x७८' | १५६००.०० |
| ३ | साई कॉम्प्लेक्स समोर पिंपळवाडी रस्त्यांवर दर्शन रांगेसाठी. | २९२'x१८' | ५२५६.०० |
| मंडपाचे एकूण क्षेत्रफळ | | | २६२५२.०० |
| **अंदाजे रु.३.६६प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (०२ साठी)रुपये-** | | | **९,८८,२४७.००** |

**०३. पालखीतील पदयात्री साईभक्तांचे निवासासाठी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कनात व बिछायतीसह (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)**

**कालावधी: – दि.१८.०७.२०१६ते दि २०.०७.२०१६ अखेर ०३ दिवस.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | शिंगवे नाईक येथे | ४०'x६०' | २४००.०० |
| २ | गुहा, ता. राहुरी येथे | ४०'x६०' | २४००.०० |
| ३ | निर्मळपिंप्री, ता. राहाता येथे. | ४०'x६०' | २४००.०० |
| **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | | **७२००.००** |
| **अंदाजे रु.३.६६प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (०३ साठी) रुपये-** | | | **७९,०५६.००** |

**०४. मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था: –**

(कालावधी दि.१८.०७.२०१६ ते दि२०.०७.२०१६ अखेर ०३ दिवस)

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर रु. प्रति चौ.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था: –<br>३ उंचीचे स्टेज, स्टेजवर सिंथेटीक मॅटींग, स्टेजचे मागील बाजूस आकर्षक रंगाचा पडदा, व कलाकारांचे मेकअपसाठी १६'x१०' साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे तसेच सदरहू कार्यक्रमासाठी फायबर खुर्च्या ३०० नग इ. सह स्टेज व्यवस्था साईज – १६'x२४' | ३८४ चौ.फुट | १८.३४ | २१,१२८/- |
| **एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च (०४ साठी)** | | | | **२१,१२८/-** |

बॅरीकेडींग: – कालावधी दि.१८.०७.२०१६ ते दि २०.०७.२०१६ अखेर ०३ दिवस.

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर रु. प्रति चौ.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेटींग करणे. | ९०० रनिंग फुट | १२.८३ | ३४,६४१/- |
| **एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च (०५ साठी )** | | | | **३४,६४१/-** |
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१६ साठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षीत एकूण अंदाजे खर्च -** | | | | **६,५४,१४६/-** |

वरील तक्त्यांत नमूद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१६ निमित्त श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.६,५४,१४६/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. सदरहू कामी येणारा खर्च हा रु.१० लक्ष पेक्षा कमी असलेने त्यास मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगी घेणेची आवश्यकता नाही असे मत आहे..

तरी वरीलप्रमाणे गुरुपौर्णिमा उत्सव २०१६ निमित्त मंडप व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.६,५४,१४६/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णिमा उत्सव २०१६ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६,५४,१४६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं. ३३ **सर्व्हे नं.१२४ (पै.) मधील संस्थानचे जागेत गोवरी शेड उभारणे कामाचे ठेकेदार श्री.बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे पढेगाव यांचे विलंबापोटी केलेली दंड आकारणी माफ करणेसंबधी दि.१३/१/२०१६ रोजीचे पत्राबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद:- अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०८/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६९ खालील प्रमाणे झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, स. नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारत परिसराचे नियोजित भांडार इमारतीलगत द्वारकामाई धुनीसाठी लागणा-या गोवरी-सरपण साठ्याकरीता शेड तयार करणेसाठी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१४,३५,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली."

२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/१२/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९६५ खालील प्रमाणे झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री द्वारकामाई धुनीसाठी लाणा-या गोवरी- सरपण साठ्याकरीता स. नं.१२४ मध्ये शेड तयार करणेकामी श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांचे निविदा दरावर ३% अधिक हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले."

३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. १५१ (१) (मा. विश्वस्तांच्या सुचनांबाबत) खालील प्रमाणे झालेला आहे.

".. श्री द्वारकामाई धुनीसाठी गोवरी-सरपण साठ्याकरीता सर्व्हे नं. १०७ मधील जागेत उभारणेत आलेले शेड अपुरे पडत असल्यामुळे मा. त्रिसदस्य समितीच्या दिनांक ०८ डिसेंबर, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६५ अन्वये सर्व्हे नं. १२४ पैकी मधील जागेत नव्याने सदरहू शेडचे काम, ठेकेदार बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांचेकडून निविदा दरावर ३% अधिक (रुपये १४,७५,६६८/- मात्र) या दराने करुन घेणेस मान्यता देणेत आली आहे. परंतू त्यावेळेस शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी प्राप्त झालेली नसल्यामुळे ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आलेला नव्हता. दि.०६/०८/२०१३ रोजी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी उपरोक्त शेडचे बांधकामास परवानगी दिलेली आहे व ठेकेदार बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव हे दि.०८.१२.२०१२ रोजीचे सभेमधील मान्य दराने काम करणेस तयार आहेत. तसेच पावसाळयाचे दिवस जवळ येत असल्यामुळे श्री द्वारकामाई धुनीसाठी गोवरी-सरपण साठविण्यासाठीचा बांधण्यात येणा-या शेडचा कार्यादेश ठेकेदार बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांना देण्यात यावा."

४. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०२/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३५ खालील प्रमाणे झालेला आहे.

".. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सर्व्हे नं. १२४ (पै.) मधील जागेत गोवरी शेडचे बांधकाम करणारे ठेकेदार श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव यांना सदरहू काम पूर्ण करणेसाठी मार्च-२०१५ अखेर मुदतवाढ देण्यात येऊन, त्यांच्या बीलामधून निविदेतील अटी / शर्तीनुसार दंड आकारणी करणेत यावी.

तसेच संस्थानचे सर्व्हे नं. १२४ (पै.) मधील जागेत गोवरी शेडचे बांधकामाचा सध्याचे स्थितीचा प्रगती अहवाल समिती सदस्यांना सादर करणेत यावा, असे ठरले."

प्रस्तावना: उपरोक्त निर्णय क्र. ०२ व ०३ चे नुसार संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ पैकी मधील जागेत श्री व्दारकामाई धुनीचे गोवरी सरपण साठ्यासाठी शेड तयार करणेसाठी ठेकेदार श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांना जा. क्र. ६०६१/२०१४ दि.२६/०३/२०१४ अन्वये कार्यादेश देणेत आला आहे. या कामासाठी ठेकेदार यांचे समवेत झालेले करारनाम्यानुसार सदर कामाची मुदत दि.०२/०४/२०१४ ते दि.०१/०७/२०१४ अशी तिन महिने होती. ठेकेदार यांनी सदरचे काम दि.३०/०४/२०१५ रोजी पूर्ण केले आहे. सदरचे काम विहीत मुदतीत पूर्ण करणेबाबत ठेकेदार यांना वेळोवेळी आढावा बैठकीत तसेच खालीलप्रमाणे लेखी पत्रान्वये कळविणेत आले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जा. क्र. ७४४/२०१४ दि.१३/०५/२०१४ | ४. | जा. क्र. ३०८७/२०१४ दि.२५/०९/२०१४ |
| २. | जा. क्र. १६०६/२०१४ दि.०५/०७/२०१४ | ५. | जा. क्र. ३५०४/२०१४ दि.२२/१०/२०१४ |
| ३. | जा. क्र. २७४६/२०१४ दि.०४/०९/२०१४ | ६. | जा. क्र.४२९७/२०१४ दि.१०/१२/२०१४ |

परंतू ठेकेदार यांनी विहीत मुदतीत काम पूर्ण केले नाही. करिता त्यांना निविदेतील पान नं.४२ अटी क्र.७ नुसार ३९३ दिवस या विलंबाचे कालावधीत प्रतिदिन रु.५००/- दराने रु.१,९६,५००/- इतकी दंडआकारणी होते. तथापि निविदेतील दंडआकारणीची कमाल मर्यादा झालेल्या कामाचे रकमेवर (रु.१५,४०,४५७/- मात्र) ७.५% आहे. त्याप्रमाणे रु.१,१५,५३४/- मात्र कमाल दंड आकारणी होते. ठेकेदार यांनी दि.१०/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये काम पूर्ण करणेसाठी जानेवारी, २०१५ मुदतवाढ मिळावी तसेच सदरहू कामापोटी होणारी दंड आकारणी करु नयेत अशी विनंती केली होती.

याबाबतचे प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०२/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३५ नुसार निविदेतील अटी / शर्तीनुसार दंड आकारणी करून मुदतवाढ देणेत आली. करिता ठेकेदार यांचे बिलांमधून मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व निविदेतील पान नं.४२ अटी क्र.७ नुसार झालेल्या कामाचे रकमेवर (रु.१५,४०,४५७/- मात्र) ७.५% प्रमाणे रु.१,१५,५३४/- मात्र दंड आकारणी करुन अंतिम बिल अदा करणेत आले आहे.

मागणीः ठेकेदार श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांनी त्यांचेकडील दि.१३/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविलेल्या मुद्यांबाबत सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदार यांचे पत्रातील मुद्दे | तपशिल वजा अहवाल |
|---|---|---|
| ०१. | "... मला संस्थानकडे स्पर्धात्मक पध्दतीने दि.३०/१०/२०१२ रोजी संस्थानचे सर्व्हे नं. १२४/१ मध्ये गोवरी शेड बांधकाम करणे हे काम भरले होते. सदर काम संस्थानचे टेंडर मिटींग दि.०८/१२/२०१२ मध्ये ३%जादा दराने देणेत आले. तथापि, सदर कामाचा कार्यारंभ आदेश मला दि.२६/०३/२०१४ तारखेला देण्यात आला. मला संस्थानने काम दिलेनंतर त्याचा कार्यारंभ आदेश मला तब्बल १ वर्षे ०३ महिन्यांनी प्राप्त झाला. सदरचे काळात सिमेंट, स्टील, मजूरी व इतर बाबींच्या १५ महिन्यांनी वाढलेल्या किमतीचा विचार करता आहे त्या दरातच काम करणे व्यावहारीक दृष्ट्या परवडणारे नव्हते. परंतू बऱ्याच वेळा संस्थानकडे काम भरल्यानंतर प्रथमतः मला संस्थानचे काम मिळाले होते. त्यामुळे सदर काम मी साईबाबांची सेवा म्हणून स्विकारले होते. सदर काम आपण नाकारले तर बाबा नाराज होतील या भावनेने मी चिंतीत झालो त्यामुळे संस्थानने इतक्या उशिरा काम करताना आहे त्याच दरात काम करणार किंवा कसे असे वारंवार विचारुनही मी सदर काम आहे त्याच दरात स्विकारले. कुठल्याही वाढीव दराची मागणी केली नाही. | मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९६५ अन्वये, ठरल्यानुसार निम्नतम दराचे ठेकेदार श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांना कार्यादेश देणेसाठी दि.०५/०३/२०१३ व दि.०५/०६/२०१३ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला असता, सदरहू कामास शिर्डी नगरपंचायत यांचेकडून बांधकाम परवानगी प्राप्त झालेनंतर काम सुरु करणेबाबत ठेकेदार यांना समक्ष चर्चेसाठी बोलवून कार्यादेश देणेबाबत ठरले. त्यानंतर दि.०६/०८/२०१३ रोजी सदर कामास नगरपंचायतीने बांधकाम परवानगी दिली. ठेकेदार यांना सदरचे काम निविदा दराने करणेबाबत विचारणा केली असता, त्यांनी दि.३०/१०/२०१३ रोजीचे पत्रान्वये, काम करणेस तयार असल्याचे कळवून कार्यादेश मिळणेबाबत विनंती केली. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५१(०१) अन्वये ठरल्यानुसार, ठेकेदार यांना दि. २६/०३/२०१४ रोजी कार्यादेश देणेत आला. |
| ०२. | तथापी, सदर काम चालू केलेनंतर प्रथमतः वाळू मिळणेस एक महिना अडचण आली. मी पढेगांव ता. कोपरगांव येथील रहिवासी असून, शेती व बांधकाम व्यवसाय करतो. मौजे तिळवणी ता. कोपरगांव येथे मला १ हेक्टर ०१ आर. जिरायत शेती आहे. त्यावर व बांधकाम व्यवसायावर माझा उदरनिर्वाह चालू आहे. | सदर बाब ठेकेदार यांचे वैयक्तीक आहे. |
| ०३. | सदरची साईट मला ४० कि. मी. अंतरावर असल्यामुळे नवीन ठिकाणी सप्लायर लोकांचे तसेच कामगारांशी ओळख करुन घेण्यास व जुळून घेण्यास बराच वेळ गेला. सदर काम प्लींथ लेव्हलच्यावर Heavy Duty Structural Steel (११.९२ Kg. Per Mtr. Length असल्यामुळे सदर कामाचे Vertical Column and Per line Member स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊ शकले नाही. तसेच सदर कामाचे कॉलम व पर्लीन मेंबर विशिष्ट परिमाणाचे असल्याने, (उदा. जसे की, १ मीटर लाबीला ११.९२ किलो इतकेच वजण भरले पाहीजे.) त्यामुळे सदर मटेरिअलचे बाहेरच्या राज्यात कंपनीत ऑर्डर द्यावी लागली. सदर मटेरिअल विशिष्ट | निविदा भरणेपूर्वी ठेकेदार यांनी याबाबींचा अभ्यास करुन निविदा भरणे अपेक्षीत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | परिमाणाचे असल्यामुळे कंपनीकडून मला दिड महिन्यांनी प्राप्त झाले. सदर काम उंचीवर असल्यामुळे तसेच वजनी Truss व इतर मटेरिअल वरच्या हाईटला देणेकामी क्रेनचा वापर करावा लागला. तसेच काम रिस्की असल्यामुळे कुशल कामगार स्थानिक पातळीवर उपलब्ध न झाल्यामुळे बाहेरुन बोलवावे लागले. त्यामुळे कामास खुपच उशिर झाला. | |
| ०४. | सदर कामाचे भांडवलासाठी मी मौजे तिळवणी ता. कोपरगांव येथील १ हेक्टर ०१ आर. जिरायत जमिन दि कोपरगांव पिपल्स को. ऑप. बँक यांचेकडे तारण दिलेली आहे. (बँकेचा बोजा असलेला उतारा सोबत जोडला आहे) सदर कामाच्या बिलास विलंब झाल्या कारणाने तसेच विलंब दंड आकारल्याने सदर काम तोट्यात गेले. त्यामुळे बँकेने कोपरगांव येथील मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी कोर्ट नं. ०१ यांचेसमोर दि.१६/१२/२०१५ रोजी समस बजावले असून, कर्ज भरणेस मे. कोर्टामार्फत बजावणी केली आहे. तसेच बँकेने कोपरगांव पोलीस स्टेशनकडून एसटीसी नं.४१३६/२०१५ द्वारे वॉरंट बजावले आहे. त्यामुळे मी खुप विचीत्र परिस्थीतीत सापडलो आहे.<br>सद्यपरिस्थीतीत माझे दोन मुले ओम गुरुदेव इंग्लिशमेडीअम स्कुल कोकमठाण येथे इयत्ता ५ वी व ७ वी अनुक्रमे वर्गात शिकत आहे. त्यांची शैक्षणिक फी वेळेत न भरल्यामुळे माझी मुले शिक्षणापासून वंचीत होण्याची वेळ आली आहे. (शाळेचा फोन नं.०२४२३-२१९९१६ देत आहे) या सर्व बाबींमुळे माझेवर कौटुंबीक संकटग्रस्थ झालो आहे. तसेच सदर कामासाठी राहाता येथील गणेश ट्रेडींग कंपनी स्टीलचे पेमेंट थकेलेले आहे. त्यांनी मे. कोर्टात वुसलीसाठी जाणेचा इशारा दिला आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेती व्यवसायात तोटा आला असून, उत्पन्नाचे सर्व मार्ग स्थगीत झाले आहे. चालू वर्षी जुन, २०१६ मध्ये व्यवस्थीत पाऊस झाला तरच शेतीची पुढील यशस्वी वाटचाल होऊ शकते. | सदर बाब ठेकेदार यांचे वैयक्तीक आहे. |
| ०५. | महोदय वरील काम मी फक्त साईबाबांचा निस्सीम भक्त म्हणून हाती घेतले होते. कुठलाही स्वार्थाचा लोभाचा विचार न करता सदरचे काम व्यवस्थीत रित्या पूर्ण केले आहे. सदर कामाची वर्क ऑर्डर ०१ वर्षे ०३ महिने उशिरा मिळूनही कुठलेही वाढीव दराची अपेक्षा संस्थानकडून केली नाही. फक्त माझेकडून नैसर्गिक आपत्तीमुळे उशीरा काम झालेमुळे संस्थानने मला दंडात्मक रु.१,२५,०००/- आकारणी केली आहे.<br>तरी संस्थानने माझ्या वरील सर्व अडी-अडचणींचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन माझा दंड माफ करावा ही श्री साईचरणी विनम्र पार्थना." | या कामाचे अंदाजपत्रक जिल्हा दरसुची २०११-१२ नुसार तयार करणेत आले होते.ठेकेदार यांना दि.२६/०३/२०१४ रोजी कार्यादेश देणेत आला. त्यावेळी सन जिल्हा दरसुची २०१३-१४चे दर प्रचलित होते. त्यानुसार अंदाजपत्रकाची रकमेत सुमारे रु.२,५७,६७१/- इतकी वाढ होत होती. तथापि ठेकेदार यांनी दि.३०/१०/२०१३ रोजीचे पत्रान्वये, निविदा दराने काम करणेस तयार असल्याचे कळवून कार्यादेश मिळणेबाबत विनंती केली. त्यांचे विनंतीनुसार त्यांना कार्यादेश देणेत आला असल्यामुळे कुठलेही वाढीव दराचा प्रश्न उद्भवत नाही. सदरचे काम विहीत मुदतीत पूर्ण करणेबाबत ठेकेदार यांना वेळोवेळी वर नमूद पत्रान्वये कळवून देखील काम पूर्ण केलेले नसल्याने, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५ अन्वये निविदा शर्तीनुसार झालेल्या कामाचे रकमेवर (रु.१५,४०,४५७/- मात्र) ७.५% प्रमाणे रु.१,१५,५३४/- मात्र दंड आकारणी करणेत आलेली आहे. |

विभागाचा अभिप्राय: सदरहु प्रस्तावाबाबत ठेकेदार यांचे विनंतीवर यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०२/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५ नुसार दंड आकारणी करून मार्च २०१५ पर्यंत मुदतवाढ देणेत आली. परंतु सदरचे काम ठेकेदार यांनी करारानुसार काम पुर्ण करायची दि.०१/०७/२०१४ ऐवजी दि.३०/०४/२०१५ रोजी पूर्ण केले आहे. त्यामुळे त्यांचे अंतिम बिलांतून मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.३५ व निविदेतील पान नं.४२ अट क्र.७ नुसार झालेल्या कामाचे रकमेवर (रु.१५,४०,४५७/- मात्र) ७.५% प्रमाणे रु.१,१५,५३४/- मात्र दंड आकारणी करुन अंतिम बिल अदा करणेत आले आहे.

ठेकेदार यांची विनंती व वरील परिच्छेद क्र.०५ मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेता तसेच ठेकेदार यांनी सदरचे काम पूर्ण केलेले असल्याने ठेकेदार यांना दंडआकारणीबाबतचा निर्णय फेरविचारार्थ मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेस हरकत नाही असे मत आहे. ठेकेदार यांचे विषयांकीत पत्रावर मा. अध्यक्ष सो. यांनी व्यवस्थापन समिती समोर प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी ठेकेदार श्री.बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांचे दंड आकारणी माफ करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व्हे नं.१२४ (पै.) मधील संस्थानचे जागेत गोवरी शेड उभारणे कामाचे ठेकेदार श्री.बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगाव यांचे विलंबापोटी केलेली दंड आकारणी माफ करणेसंबधीचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. ३४** **संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८२ पै. मध्ये घनकचरा डेपोकरीता खड्डा खोदणे, चैनलींक कंपाऊंड व गेटचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना-** संस्थान इमारती व परिसरात दररोज अंदाजे ३ टन घनकचरा निघत असून दैनंदिन निघणारा घनकचरा संस्थान मालकीच्या मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर १८२ या जागेत वेळोवेळी खड्डे घेवून टाकण्यात येत आहे. दि.२५/११/२०१५ रोजी सदर ठिकाणी कचरा टाकण्यास लगतचे शेतक-यांनी विरोध केला. सदरचे शेतक-यांबरोबर मा. कार्यकारी अधिकारी यांनी बैठक घेतली असता सदरहु कचरा डेपोला चेनिलिंक जाळीचे कम्पाऊंड केलेनंतर तेथे कचरा टाकावा तोपर्यंत तेथे कचारा टाकू नये असे सांगितले. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेतील नि.क्र. ५०८ अन्वये घनकच-याचे खड्ड्याभोवती चेनलींक जाळी बसविणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.१,५९,२३९/- मात्रचे खर्चास व विहित पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. परंतू सदरचे काम तातडीने पूर्ण करावयाचे असल्याने याकामी फक्त चेनलींक जाळी मगिल मंजूर दराने खरेदी करुन सिमेंट पोल व इतर सर्व आवश्यक मटेरीअल विभागाकडे उपलब्ध असलेल्या साठ्यातून वापरणेत आले व इकडील विभागाच्या कर्मचा-यांमार्फत चेनलींक जाळी बसवून घेण्यात आली आहे. याकामी चेनलींक जाळी खरेदीसाठी रु. २७,५६२/- मात्र खर्च आलेला आहे. दि. ०४/०३/२०१६ रोजीचे आरोग्य विभाग यांचे पत्रान्वये सदरचा खड्डा आज मितीस ७० ते ८० टक्के भरलेला असल्याने त्यांनी सध्याचे खड्डयाचे जवळ १०० फुट लांब, ६० फुट रुंद व १५ फुट खोल खड्डा घेवून त्यास जाळीचे कंपाऊंड करण्यात यावे, जेणे करुन घनकचरा टाकणे सोईचे होईल व कचरा इतरत्र उडणार नाही असे त्यांनी इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव:-** सदरहु क्षेत्रात १०० फुट लांब , ६० फुट रुंद व १५ फुट खोलीचा खड्डा तयार करणेस जिल्हा दर सुची २०१५-२०१६ नुसार रुपये ९२,१७८ मात्र इतक्या खर्च अपेक्षीत आहे. तसेच खड्याचे भोवती ५ फुट उंचीचे चेनलिंक जाळीचे कंपाऊंड करता येईल. याकामी चेनलिंक जाळी व कॉक्रीट पोल खरेदी करणेस रुपये ४४,२९०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. कॉक्रीट पोल कॉक्रीट मध्ये बसवून त्यास चेनलिंक जाळी फिटींगचे काम खात्यामार्फत करता येईल.

तरी संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे हद्दीत गट नं.१८२ मध्ये घनकचरा टाकणेसाठी खड्डा खोदणे , चेनलींक जाळीचे कंपाउंड करणेकामी अपेक्षीत रक्कम रुपये १,३६,४६८/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता मा. सदस्य समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८२ पै. मध्ये घनकचरा टाकणेसाठी खड्डा खोदणे, चैनलींक जाळीचे कंपाऊंड व गेटचे काम विहीत पध्दतीने करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,३६,४६८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. ३५** **फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे आकृतीबंधाबाबत.**

**प्रस्ताव-** अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील कर्मचारी आकृतीबंधास शासनाने दि.०७ ऑगस्ट, २००९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर आकृतीबंधात फायर ॲण्ड सेफ्टी विभागासाठी खालीलप्रमाणे पदे मंजूर आहेत.

**फायर ॲण्ड सेफ्टी विभाग**

| अ.नं. | पदनाम | सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅण्ड + ग्रेड पे | पदसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | कंत्राटी | एकूण |
| ०१ | फायर ॲण्ड सेफ्टी ऑफीसर | ९३००-३४८०० + ४४०० | -- | ०१ | ०१ |
| ०२ | फायर ऑफिसर | ९३००-३४८०० + ४३०० | ०१ | -- | ०१ |
| ०३ | लिपीक-टंकलेखक | ५२००-२०२०० + १९०० | ०१ | -- | ०१ |
| ०४ | फायर मदतनीस | ४४४०-७४४० + १३०० | -- | ०३ | ०३ |
| | | एकूण - | ०२ | ०४ | ०६ |

आकृतीबंधास मान्यता मिळणेचे अगोदर फायर संबंधित कामकाज हे संरक्षण विभागामार्फत करण्यात येत होते. आता फायर ॲण्ड सेफ्टी विभाग दि.२३/०७/२०१५ पासून स्वतंत्रपणे कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. तसेच मे.हेट्रो केमिस्ट कंपनी, हैद्राबाद यांनी १२ लाख किमतीचे मिनी टेंडर (छोटे अग्निशमन वाहन) संस्थानला देणगी दिलेले असून ते दि.१९/१०/२०१५ पासून संस्थानच्या प्रत्यक्ष वापरासाठी सुरु करण्यात आले आहे.

तसेच मे.लक्ष्मी इंटरनॅशनल, मुंबई यांनी फोम टेंडर या गाडीची १३ लाख किमतीची चेसी व मे.देवी फायर, सोलापूर यांनी रुपये १९ लाख ६० हजार किंमतीची बॉडी याप्रमाणे संस्थानला देणगी दिलेली आहे. सदरचे फोम टेंडर (मोठे अग्निशमन वाहन) संस्थानसाठी दि.२२/१०/२०१५ पासून प्रत्यक्ष वापरासाठी सुरु करण्यात आले आहे.
उपरोक्त दोन्ही वाहनांचा वापर संस्थान व शिर्डी परिसरासाठी सुरु केल्यामुळे संस्थानमधील वर्ग-४ व वर्ग-३ मधील काही कर्मचा-यांना संस्थानचे खर्चाने महाराष्ट्र शासनाचे अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय, सांताक्रुझ, मुंबई यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे. परंतु संस्थानने कार्यान्वीत केलेले फोम टेंडर व मिनी टेंडर या दोन वाहनांच्या वापरासाठी लागणारा अधिकारी व कर्मचारी वर्ग अगदीच त्रोटक स्वरुपाचा आहे.

ब) याकामी मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-फायर ॲण्ड सेफ्टी/४७८८/२०१५ दि.२६ नोव्हेंबर, २०१५ पत्रान्वये यापुर्वीची मंजूर पदे व सुधारीत पदांबाबतची माहिती व मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यांनी फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे संबंधित पदनिहाय माहिती जा.क्र.मअसे/ २०१५/३२-एफ/१९७९ दि.३१/१२/२०१५ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेली आहे.

| अ.नं. | पदाचे नाव | गट | पदसंख्या | वेतनश्रेणी अधिक ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| ०१ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ब | ०१ | रु.९३००-३४८०० + ४४०० |
| ०२ | उप – अग्निशमन अधिकारी | क | ०१ | रु.९३००-३४८०० + ४२०० |
| ०३ | प्रमुख अग्निशामक – विमोचक | क | ०३ | रु.५२००-२०२०० + २४०० |
| ०४ | चालक – यंत्रचालक | क | ०९ | रु.५२००-२०२०० + २००० |
| ०५ | अग्निशामक विमोचक | क | २४ | रु.५२००-२०२०० + १९०० |

सेफ्टी ऑफिसर या पदाऐवजी वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड पे रु.५४०० मध्ये फायर ॲण्ड सेफ्टी ऑफिसर या नावाचे गट– अ मधील पद निर्माण करावे. या पदासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा बी.ई.(फायर) किंवा डिव्हीजनल फायर ऑफिसर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील तसेच या पदासाठी किमान ७ वर्षे उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचा अनुभव किंवा १० वर्षे विभागीय अग्निशमन अधिकारी या पदाचा अनुभव असावा. या पदधारकाकडे अग्निशमन व सुरक्षा विभागाचे प्रमुख या नात्याने कामकाज सोपविल्यास अग्निशमन व सुरक्षा विभागामध्ये उत्तम समन्वय राहील, असे कळविलेले आहे.

परंतु संरक्षण विभागासाठी स्वतंत्र आकृतीबंध मंजूर आहे. तसेच संरक्षण विभागासाठी संरक्षण अधिकारी वेतनश्रेणी ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४३०० हे पद मंजूर असून सदरच्या पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने अधिका-याची नेमणूक केली जाते. त्यामुळे अग्निशमन व सुरक्षा विभागाचे प्रमुख म्हणून फायर ॲण्ड सेफ्टी ऑफिसर हे पद यापुर्वीचे मंजूर आकृतीबंधातून वगळणे उचित होईल, असे मत आहे.

तसेच मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी चालक – यंत्रचालक या पदासाठी वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २००० असा दर्शविला आहे. परंतु मंजूर आकृतीबंधात संस्थानचे वाहन विभागाकडील वाहन चालक या पदासाठी वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे १९०० मंजूर आहे. वाहन विभागाकडील वाहन चालक व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडील चालक-यंत्रचालक या दोन्ही पदाचे कर्तव्ये व जबाबदारी सारखीच असल्याने चालक – यंत्रचालक या पदाचा ग्रेड पे रु.१९००/- ठेवणे उचित होईल, असे मत आहे.

**क)** वरीलप्रमाणे "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे मंजूर आकृतीबंधातील स्थायी ०२ व कंत्राटी ०४ असे एकूण ०६ पदे रद्द करुन मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी उपरोक्त "ब" नुसार कळविलेली पदे तसेच फायर ॲण्ड सेफ्टी विभागाची प्रत्यक्ष कामाची गरज विचारात घेता सोबतच्या परिशिष्टात नमुद केल्याप्रमाणे सुधारीत आकृतीबंध तयार करण्यात आला असून सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचा सुधारीत आकृतीबंध मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं. ३६ **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील नियुक्त असलेल्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देणेबाबत.**

प्रस्ताव- ऑगस्ट २००८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीने मुलाखती घेऊन प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन, त्यानुसार मुलाखतीमध्ये निवड झालेल्या खालील संबंधीत कर्मचा-यांना संन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून इ.११वी विज्ञान शाखेची तिसरी तुकडी आणि सन २०१४-१५ पासून इ.११वी कला व वाणिज्य या शाखेची तिसरी तुकडी सुरु करण्यात आलेली आहे. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून इ.११वी विज्ञान शाखेची तिसरी तुकडी सुरु करणेस शासन मान्यता प्राप्त झाली असून सन

२०१४-१५ पासून इ. ११वी कला व वाणिज्य या शाखेची तिसरी तुकडी सुरु करण्यासाठी शासनाची मान्यता घेणेकामी शिक्षण विभागाकडे प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे.

अ) सन २०१३ - १४ मध्ये इ.११ वीच्या विज्ञान शाखेंच्या नवीन तुकडी वाढीने व सन २०१४ -१५ मध्ये १२ वी विज्ञान शाखेस नैसर्गिक वाढीने मान्यता मिळालेली आहे. सध्याच्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत आहे. मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ नुसार उपलब्ध अर्धवेळ शिक्षकांना पुर्ण वेळ कार्यभार देण्याचे प्रस्तावीत केले आहे. खालील तक्यात दर्शविले प्रमाणे नियुक्त असलेल्या अर्धवेळ संबंधीत शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देता येईल.

| अ. नं. | नाव, पदनाम, शैक्षणिक पात्रता, विषय, प्रवर्ग | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ०१ | श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे अर्धवेळ सहा.शिक्षिका एम.एस.सी., बी.एड. (जीवशास्त्र) (SC) १ | श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे यांना सन २००८-०९,सन-२००९-१० मध्ये दोन वर्ष एप्रिल २०१०अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक (जीवशास्त्र) म्हणून आणि सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाअखेर अर्धवेळ शिक्षण सेवक (जीवशास्त्र) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी ३ वर्षेअर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे. दि.०१ मे २०१३ पासून पुर्ण वेळ उच्च माध्यमिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबँड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे(वेतनबँड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ग्रेड वेतन २३०० नुसार )वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. सन २०१३-१४ पासून इ.११वी विज्ञान शाखेचे तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे. श्रीमती बनसोडे यांनी सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या तीन शैक्षणिक वर्षांचे ( अर्धवेळ ३६ महीने ) पूर्णवेळ १८ महीने अधिक सन २०१३-१४ चे रु. ९०००/- मानधनावर १२ महीने असे एकूण ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे. सन २०१३-१४ मध्ये रु. ९०००- प्रमाणे नेमणूक दिल्यास त्यांना सध्या अर्धवेळ वेतनश्रेणीत वेतन अदा होत असल्याने, सध्याचे वेतन रु. ९०००/- पेक्षा जास्त आहे. सदरचे वेतन समान हप्त्यात /वेतन फरकातून वसूल करता येईल.<br>**<u>शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने त्यांना १ मे २०१४ पासून पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल.</u>** |
| ०२ | श्रीमती उषा कोंडाजी गायके अर्धवेळ शिक्षिका एम.सी.एम. बी.एड. **(माहिती तंत्रज्ञान)** (OPEN) | श्रीमती उषा कोंडाजी गायके यांना यांना सन २००८-०९,सन-२००९-१० मध्ये दोन वर्ष एप्रिल २०१०अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक ( माहिती तंत्रज्ञान ) म्हणून आणि सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाअखेर अर्धवेळ शिक्षण सेवक ( माहिती तंत्रज्ञान ) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी ३ वर्षेअर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे. दि. ०१ मे २०१३ पासून पुर्णवेळ पुर्ण वेळ उच्च माध्यामिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबँड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबँड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ग्रेड वेतन २३०० नुसार ) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. सन २०१३-१४ पासून इ.११वी विज्ञान शाखेचे तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे. श्रीमती उषा गायके यांनी सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या तीन शैक्षणिक वर्षाचे ( अर्धवेळ ३६ महीने ) पूर्णवेळ १८ महीने अधिक सन २०१३-१४ चे रु. ९०००/- मानधनावर १२ महीने असे एकूण ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे. सन २०१३-१४ मध्ये रु. ९०००- प्रमाणे नेमणूक दिल्यास त्यांना सध्या अर्धवेळ वेतनश्रेणीत वेतन अदा होत असल्याने, सध्याचे वेतन रु. ९०००/- पेक्षा जास्त आहे. सदरचे वेतन समान हप्त्यात /वेतन फरकातून वसूल करता येईल.<br>**<u>शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने त्यांना १ मे २०१४ पासून पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल.</u>** |
| ०३ | श्री प्रमोद भिवसेन चौधरी अर्धवेळ सहा.शिक्षक एम.एस्सी.बी.एड (भौतिकशास्त्र) (OBC) | श्री प्रमोद भिवसेन चौधरी यांना सन २००९-१० मध्ये एक वर्ष एप्रिल २०१०अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक (भौतिकशास्त्र) म्हणून आणि सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाअखेर अर्धवेळ शिक्षण सेवक (भौतिकशास्त्र) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी ३ वर्षेअर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे. दि.०१ मे २०१३ पासून पुर्णवेळ पुर्ण वेळ उच्च माध्यामिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबँड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबँड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ग्रेड वेतन २३०० नुसार ) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. सन २०१३-१४ |

| | | |
|---|---|---|
| | | पासून इ.११वी विज्ञान शाखेचे तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे. श्री चौधरी यांनी सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या तीन शैक्षणिक वर्षाचे ( अर्धवेळ ३६ महीने ) पूर्णवेळ १८ महीने अधिक सन २०१३-१४ चे रु. ९०००/- मानधनावर १२ महीने असे एकूण ३० **महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे. शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने त्यांना १ मे २०१४ पासून पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल.** |
| ०४ | श्री गणेश शिवाजी धाकतोडे एम.एस्सी. बी.एड. (गणित) (SC) | श्री गणेश शिवाजी धाकतोडे यांना दि. २८ जुलै २०१२ पासून ( सन २०१२-१३ ) पासून ३० एप्रिल २०१५ अखेर रू.४५००/- प्रती महा प्रमाणे अर्धवेळ शिक्षक (गणित) म्हणून या मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी ३ वर्षेअर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून कार्यभार पुर्ण केला आहे. सन २०१३-१४ पासून इ.११वी विज्ञान शाखेची तीसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांना मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार दि.०१ जुलै २०१३ पासून ३० जून २०१५ अखेर रु.९०००/-प्रती महा प्रमाणे पुर्णवेळ शिक्षक (गणित) मानधनावर नेमणूक देता येईल.<br>श्री धाकतोडे यांनी दि. २८ जुलै २०१२ पासून ( सन २०१२-१३ ) अर्धवेळ काम केलेले आहे. त्यांचे सन २०१२-१३ मधील अर्धवेळ शिक्षण सेवक पदाचा कार्यकाळ १२ महीने म्हणजेच पूर्णवेळ पदाचे ६ महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे. सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील पूर्णवेळ कार्यभाराचे २४ महिने त्यांनी पूर्णवेळ काम केले. याकालावधीत त्यांना सन २०१३-१४ व २०१४-१५चे रु. ९०००/- मानधन देता येईल. त्यांचा ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे.<br>**शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने त्यांना २८ जुलै २०१५ पासून पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल.** |

ब) सन २०१४ - १५ मध्ये इ.११वी च्या कला व वाणिज्य या शाखेंची नवीन तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे सध्याच्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत आहे. खालील तक्यात दर्शविले प्रमाणे नियुक्त असलेल्या अर्धवेळ संबंधीत शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देता येईल.

| अ. नं. | नाव ,पदनाम, शैक्षणिक पात्रता, विषय, प्रवर्ग | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ०१ | श्री दत्तु अशोक लांडे अर्धवेळ सहा.शिक्षक एम.ए. बी.एड. (अर्थशास्त्र) (NT) | श्री दत्तु अशोक लांडे यांना सन २००८-०९,सन २००९-१०,सन-२०१०-११ शैक्षणिक वर्षाकरीता दरवर्षी एप्रिल अखेर अर्धवेळ शिक्षणसेवक (अर्थशास्त्र) म्हणून रु.२५०० या मानधनावर नेमणूक देण्यात आली. त्यांनी सलग तीन वर्ष काम केल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून पुर्ण वेळ उच्च माध्यामिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबँड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबँड ४६५०-१७४००+ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ग्रेड वेतन २३००नुसार ) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. त्यांनी अर्धवेळ शिक्षक म्हणून सन २००८-०९ ते सन २०१३-१४ अखेर ६ वर्षे अर्धवेळ म्हणजेच ३ वर्षे पूर्णवेळ काम केले आहे. पैकी ३ वर्षे मानधनानुसार व ३ वर्षे अर्धवेळ शिक्षकाचे वेतनश्रेणीवर काम केलेले आहे. मानधनापेक्षा जादाचे वेतन समान हप्त्यात /वेतन फरकातून वसूल करता येईल.सन २०१४-१५ मध्ये इ. ११ वी कला व वाणिज्य शाखेची नवीन तिसरी तुकडी सुरु करण्यात आली. या नवीन तुकडीमुळे श्री लांडे यांना अर्थशास्त्र विषयाचा पूर्णवेळ पदाचा कार्यभार उपलब्ध झाला.<br>**शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने त्यांना १६ जून २०१४ पासून पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल** |
| ०२ | श्री रंगनाथ चांगदेव रहाणे अर्धवेळ सहा.शिक्षक एम.ए. बी.एड. (भूगोल) (OPEN) | श्री रंगनाथ चांगदेव रहाणे यांना सन-२००९-१० मध्ये एक वर्ष एप्रिल २०१० अखेर रु.७२ प्रती घडयाळी तासाप्रमाणे तासिका तत्वावर शिक्षण सेवक (भूगोल ) म्हणून आणि सन २०१०-११, सन २०११-१२, व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षा अखेर अर्धवेळ शिक्षण सेवक (भूगोल ) म्हणून मानधनावर नेमणूक देण्यात आली.तसेच सन २०१३-१४ मध्ये अर्धवेळ वेतनश्रेणी पदावर काम केले आहे. दि.०१ मे २०१४ पासून पुर्णवेळ उच्च माध्यमिक शिक्षकासाठी लागू असलेल्या (वेतनबँड ९३००-३४८००+ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबँड ४६५०-१७४००+ ग्रेड वेतन २३०० मध्ये मुळवेतन ६२७०+ ग्रेड वेतन २३०० नुसार ) वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. सन २०१४ - १५ पासून इ.११वी कला शाखेची तिसरी तुकडी सुरु करण्यात आली त्यामुळे त्यांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.०५/०६/२०१४ चे सभेतील |

| | | |
|---|---|---|
| | | निर्णय क्र.४२८ नुसार पूर्ण वेळ पदाचे काम केले आहे. श्री रहाणे यांनी सन २०१०-११, सन २०११-१२,सन २०१२-१३ व २०१३-१४ या चार शैक्षणिक वर्षाचे ( अर्धवेळ ४८ महीने ) पूर्णवेळ २४ महीने अधिक सन २०१४ -१५ चे रु. ९०००/- मानधनावर ६ महीने असे एकूण ३० महीने शिक्षणसेवक कालावधी पूर्ण होत आहे. सन २०१३-१४ मध्ये रु. ९०००- प्रमाणे नेमणूक दिल्यास त्यांना सध्या अर्धवेळ वेतनश्रेणीत वेतन अदा होत असल्याने, सध्याचे वेतन रु. ९०००/- पेक्षा जास्त आहे. सदरचे वेतन समान हप्त्यात /वेतन फरकातून वसूल करता येईल.<br>**शासन निर्णय क्र. एसएसएन/१०९९/ ( ३४०/९९ ) माशि - २,मंत्रालय, मुंबई दि. १० जून २००५ नुसार त्या पात्र असल्याने त्यांना १ जानेवारी २०१५ पासून पूर्णवेळ वेतनश्रेणी ९३००- ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० नुसार उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल.** |

इ.११ वी व १२ वी वर्गांच्या नवीन तुकडी वाढीने सध्याच्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ कार्यभार उपलब्ध होत आहे. वरील "अ" व "ब " तक्यात नमुद केलेल्या शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूक देता येईल.

१) अर्धवेळ शिक्षणसेवक (सध्याचे पदनाम अर्धवेळ सहा.शिक्षक परिवीक्षाधीन ) पदाकरीता पूर्णवेळ पदाचे अर्धे मानधन देऊन नेमणुक देण्यात येते . अर्धवेळ शिक्षक म्हणजे पूर्णवेळ पदाचे वेतनश्रेणीच्या निम्मी अर्धी वेतनश्रेणी देऊन नेमणुक देण्यात येते.

२) प्रस्तावातील नमूद केलेल्या सर्वांची नेमणुक शिक्षणसेवक नेमणुक ३ वर्षे अथवा ३० महीने होत आहे. संबंधीतांचे समोर स्पष्टीकरणात स्पष्ट उल्लेख आहे.

३) प्रस्तावात नमुद केलेले सर्व शिक्षकांच्या ३० महिन्यांचा कालावधी कधी पुर्ण होतो हे त्यांचे समोरील रकान्यात स्पष्टपणे नोंदविलेले आहे.

४) प्रस्तावात नमुद केलेल्या शिक्षकांच्या अर्धवेळ (६० महीने)/ पुर्णवेळ ३० महीने ज्या दिवशी पुर्ण होतो आणि त्यासंबंधीत शिक्षकाला पूर्णवेळ पदाचा कार्यभार उपलब्ध होतो तेथपासून पुढे त्यांना वेतनश्रेणी देय होते. तसे प्रस्तावात स्पष्टपणे नोंदविले आहे.

**आकृतीबंधात श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयास ३० शिक्षक पदाची मंजूरी आहे यापैकी स्थायी पदसंख्या २६ व ४ कंत्राटी शिक्षक पदांची मान्यता आहे. २६ पैकी २२ पुर्णवेळ शिक्षकांची नियूक्ती करण्यात आलेली आहे. ०४ स्थायी शिक्षकांचे पदे रिक्त आहेत.**

क) आकृतीबंधातील ०४ कंत्राटी शिक्षक पदांना, स्थायी पदामध्ये रुपातरीत ( समाविष्ट ) करण्याचा प्रस्ताव तसेच सन २०१५-१६ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या नवीन वाढीव तुकडया सुरु करण्यात आलेल्या आहे. यासाठी आवश्यक १० शिक्षक पदाचा व ०१ टंकलेखक लिपिक पदाचा समावेश सुधारीत आकृतीबंधात करुन विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी सादर करता येईल, असा प्र.उप प्राचार्य यांनी अभिप्राय दिलेला आहे.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील सन २०१४-१५ चे संच मान्यतेमध्ये शिक्षण संचालक यांनी २७ पुर्णवेळ, ३ अर्धवेळ व ३ तासिक तत्वावरील असे एकुण ३३ शिक्षकांच्या संचास मान्यता दिलेली आहे. तसेच सन २०१५-१६ ची संच मान्यता येणे अद्याप बाकी आहे. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे सद्यस्थितीमध्ये २२ पुर्णवेळ व ६ अर्धवेळ शिक्षक कार्यरत आहे. तसेच उर्वरीत जागेंवर कंत्राटदारामार्फत कंत्राटी कर्मचा-यांची पात्रतेनुसार कंत्राटी शिक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

वरीलप्रमाणे प्र.उप प्राचार्य श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून प्रस्ताव/अभिप्राय सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील मंजुर आकृतीबंधानुसार ०४ स्थायी शिक्षकांचे पदे रिक्त आहेत. कनिष्ठ महाविद्यालयाकडील नैसर्गिक तुकडीवाढ, मा.शिक्षण संचालक यांचेकडील संच मान्यता व त्यानुसार आवश्यक शिक्षक संख्या विचारात घेता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता उपरोक्त "अ" मध्ये नमुद ४ अर्धवेळ शिक्षक, "ब " मध्ये नमुद ०२ अर्धवेळ शिक्षक असे एकुण ०६ अर्धवेळ शिक्षकांना वरील तक्त्यात त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या कालावधी पासून पुर्णवेळ शिक्षक म्हणून नेमणूक देता येईल, मात्र तत्पुर्वी परिच्छेद "क" मध्ये नमुद केलेप्रमाणे आकृतीबंधामध्ये मंजुर ०४ कंत्राटी शिक्षक पदांना स्थायीपदांमध्ये रुपांतरीत करणे व वाढीव १० शिक्षक पदांना मंजुरी मिळणेकामी मा.विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल. मा.विधी व न्याय विभागांकडून सदर प्रंस्तावास मान्यता मिळालेनंतर उचित कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेकामी सादर.

निर्णय क्र.३०० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील नियुक्त असलेल्या अर्धवेळ शिक्षकांना पुर्णवेळ नेमणूका देणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावामध्ये सदरहू शिक्षकांचे गोपनीय अहवाल कसे आहेत, तसेच त्यांचे काम समाधानकारक आहे का, याचा उल्लेख दिसून येत नाही. सबब त्यांच्या कामाच्या मुल्यमापनासह सविस्तर प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं. ३७ संस्थान कर्मचा-यांना देण्यात येणा-या निवासस्थानांचे सेवाआकार शुल्क नव्याने निश्चीत करुन त्याप्रमाणे वसुली करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या निवासासाठी एकूण ३४० निवासस्थाने आहेत. सदरची निवासस्थाने सेवेत असणाऱ्या कायम कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठता व वेतनश्रेणीनुसार तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांना प्राधान्याने उपलब्ध करुन देणेत येतात. काही अपरिहार्य कारणास्तव स्थानिक पातळीवरील महसूल, पोलीस विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांना शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार व सेवाआकार संस्थानकडे जमा करेणेचे अटीवर उपलब्ध करुन देण्यात येतात.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२०० रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.३६९ अन्वये कर्मचारी निवासस्थाने नियमावलीस मान्यता देण्यात आलेली असून, त्यानुसार सदर निवासस्थाने खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांना वर्गवारीनुसार वाटप करण्यात येतात. संस्थानकडे कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी अंदाजे सन १९७६/७७ मध्ये प्रथम साईनगर व समर्पण या दोन इमारती बांधण्यात आल्या, त्यानंतर टप्पा-टप्याने नविन निवासस्थाने बांधण्यात येऊन आज रोजी संस्थानकडे खालील प्रमाणे 340 निवासस्थाने आहेत. निवासस्थानांच्या वापरापोटी कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून खाली नमूद केलेप्रमाणे सेवाआकार रक्कम कपात (वसुल) करण्यात येत आहे.

(तक्ता क्र.०१)

| अ.नं. | इमारतीचे नांव | वर्गवारी (देण्याचे निकष) | संख्या | सध्या आकारण्यात येणार प्रतिमहा सेवाआकार |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईसहवास ०१,०२,०३,०४, (०२ बीएचके) ५०० रुमचे पाठीमागे | प्रशासकीय अधिकारी/वैद्यकिय अधिकारी | २४ | रु.१५०/- |
| ०२ | साईस्मरण ०१,०२,०३, (०२ बीएचके) साईनगर परिसर | प्रशासकीय अधिकारी/वैद्यकिय अधिकारी | १८ | रु.१५०/- |
| ०३ | साईचिंतन ०१,०२,०३,०४, (०१ बीएचके) साईनगर परिसर | अधीक्षक,विभाग प्रमुख कनिष्ठ अभियंते,सिस्टर इन्चार्ज इ. | ४८ | रु.१५०/- |
| ०४ | साईध्यान ०१,०२, (०२ रुम किचन) साईनगर परिसर | वर्ग ०३ कर्मचारी | ८८ | **४ थ्या वेतनआयोगानुसार**<br>०१.रु.१४०० ते रु २३०० वेतनश्रेणी असणारे कर्मचारी रु.११५/-<br>०२.रु.९५० ते रु.१५०० व त्याखालील वेतनश्रेणीतील कर्मचारी रु.६०/- |
| ०५ | साईनगर (०१ रुम किचन) साईनगर परिसर | वर्ग ०४ कर्मचारी | ३० | रु.१२/- |
| ०६ | समर्पन (०१ रुम किचन) | वर्ग ०४ कर्मचारी | ३६ | रु.१२/- |
| ०७ | निमगांव को-हाळे ए.बी.सी.डी.ई.एफ.जी.एच. (०१ बी एच के) (साईआश्रम ०२ चे पाठीमागे) | सदर निवासस्थाने इमारतीनुसार सर्व संवर्गातील कर्मचा-यांना उपलब्ध करुन देण्यात येतात | ९६ | ०१.वर्ग ०४ कर्मचारी (रु.२५५०-३२००)- रु.१००/-<br>०२.वर्ग ०३ कर्मचारी (रु.३०५०-४५९०/ ४०००-६०००/ ४५००-७०००)-रु.१२५/-<br>०३.स्टाफ नर्स/ इतर (५०००-८०००/ ५५००-९०००) रु.१५०/-<br>०४.मॅनेजर व इतर (६५००-१०५००) रु.२००/- |
| | | एकुण | ३४० | |

(ब) दि.२२/०५/१९७८ रोजीचे आदेशाने साईनगर व समर्पण इमारतीचा सेवाआकार निश्चित करणेत आलेला आहे व त्यानंतर बांधण्यात आलेल्या साईध्यान ०१ व ०२ इमारतीचा सेवाआकार दि.२५ ऑक्टोबर 1990 चे आदेशाने निश्चित करणेत आलेला आहे. सदर दराने आजतागायत सदरहू निवासस्थानाचे वापरापोटी कर्मचाऱ्यांच्या दरमहा वेतनातून सेवाआकार रक्कम वसुल करण्यात येत आहे. सदर दरांमध्ये बऱ्याच वर्षापासून बदल / वाढ करण्यात आलेली नाही. वास्तविक पहाता, संस्थान कर्मचाऱ्यांना मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार वेळोवेळी मा.शासनाने लागू केलेल्या वेतनआयोगानुसार वेतन अदा करण्यात येत आहे. मा.शासनाने ०४ था, ०५ वा आणि ०६ वा वेतनआयोग जाहिर करुन वेतनात वाढ केलेली आहे सदरची वेतनवाढ संस्थान कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात आलेली आहे. तथापी, वाढीव वेतनानुसार निवासस्थानांच्या सेवाआकार दरामध्ये वेळोवेळी वाढ अथवा बदल करणे अपेक्षित होते, परंतु अशी वाढ वर्षानुवर्षे करण्यात आलेली नाही. सध्या तक्ता क्र.०१ मध्ये नमूद केलेल्या दरानुसारच निवासस्थानाचा सेवाआकार वसुल करण्यात येत आहे.

तसेच संस्थान निवासस्थानांमध्ये रहिवाशी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना २४ तास वीजपुरवठा व पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये फक्त वीज वापरापोटी वेळोवेळी बदल होणाऱ्या दरानुसार वीजबीलाची आकारणी करण्यात येते. पाणीपुरवठ्याबाबत असे कोणतेही शुल्क अथवा पाणीपट्टी आकारली जात नाही.

(क) आता, मा.शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दि.२७ जानेवारी, २०१६ रोजीचे शासन निर्णयानुसार, **कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानाच्या सेवाशुल्क वसुलीचे नविन दर निश्चित करण्यात आलेले आहेत.** सदर शासन निर्णयामध्ये खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थाने पुरविणे हा शासनाने राबविलेला कल्याणकारी कार्यक्रमाचा भाग असल्यामुळे शासनाला प्रत्यक्षात सेवा पुरविण्यासाठी जास्त खर्च येत असला तरी सेवाशुल्काची आकारणी आतापर्यंत मर्यादीत ठेवण्यात आली आहे. तथापि, दैनंदिन उपयोगाच्या वस्तुच्या किंमती व देखभाल दुरुस्तीच्या खर्चामध्ये, तसेच वीज दर, जल दर, नगरपालिका कर/ पालिका कर/ महानगर पालिका कर व कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सहाव्या वेतन आयोगानुसार झालेली लक्षणीय वाढ विचारात घेवून सेवाशुल्काच्या दरात वाढ करण्यात येत आहे.

शासकीय अधिकारी/ कर्मचारी याला त्याच्या पदानुसार अनुज्ञेय ग्रेडवेतन व त्यानुसार त्याला अनुज्ञेय असलेले शासकीय निवासस्थानाचे क्षेत्रफळ याकरीता आकारणी करण्यात येणारी सेवाशुल्काची रक्कम खालील प्रमाणे निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

| अ.नं. | अनुज्ञेय ग्रेड वेतन (रुपये) | अनुज्ञेय चटई क्षेत्र (चौरस फुट) | सेवाशुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०१ | १८०० पेक्षा कमी | २२० | ११० |
| ०२ | १८०१ ते २८०० | २२१ ते ३२० | १३५ |
| ०३ | २८०१ ते ४२०० | ३२१ ते ४२० | १८५ |
| ०४ | ४२०१ ते ५४०० | ४२१ ते ५५० | २४५ |
| ०५ | ५४०१ ते ७६०० | ५५१ ते ७५० | ३२५ |
| ०६ | ७६०० व त्याहून अधिक | ७५१ ते १११० | ४६५ |

शासकीय अधिकारी / कर्मचारी त्याला अनुज्ञेय असलेल्या शासकीय निवासस्थानाच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या निवासस्थानात वास्तव्य करीत असेत तर त्याला त्याच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या एकूण निवासस्थानाच्या क्षेत्रफळाच्या रु.०.५०/- प्रती चौरस फूट या दराने सेवाशुल्काची आकारणी करण्यात यावी.

सर्व शासकीय निवासस्थानाचे वरीलप्रमाणे सेवाशुल्क दि.०१/०४/२०१५ पासून वसूल करण्यात यावे. सेवाशुल्काचे दर वाढविल्यामुळे देय होणारी दि.०१/०४/२०१५ पासूनच्या कालावधीची अतिरिक्त वसुली मासिक वेतन देयकामधून २ हप्त्यात वसुल करण्यात यावी.

(ड) मा.शासनाचे उपरोक्त निर्णयामध्ये वेगवेगळ्या वेतनश्रेणीधारक कर्मचाऱ्यांस अनुज्ञेय असलेल्या चटई क्षेत्राच्या निवासस्थानांचे सेवाशुल्क दर सुधारित करण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे संस्थानकडील निवासस्थानकडील निवासस्थानाचे वाटप वेतनश्रेणीनुसारच करण्यात येते. तथापी, निमगाव कोऱ्हाळे येथील निवासस्थाने निश्चित अशा एका वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येत नाहीत. सदर निवासस्थाने संस्थान व्यवस्थापनाच्या सोईच्या दृष्टीने इमारतीनुसार सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यामुळे दि.२७ जानेवारी, २०१६ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला निवासस्थानाचा सेवाआकार शुल्क सुधारीत करावयाचे झाल्यास, **सेवाआकार शुल्क कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीनुसार न आकारता कर्मचाऱ्यांला प्रत्यक्ष देण्यात आलेल्या निवासस्थानाचे उपरोक्त शासन निर्णयामध्ये दर्शविलेल्या चटई क्षेत्रानुसार आकारणे उचीत होईल, असे मत आहे.**

संस्थानचे बांधकाम विभागाकडून दि.१६/०२/२०१६ रोजीचेपत्राने संस्थान निवासस्थानांचे चटई क्षेत्रानुसार चौरस फुटातील मोजमापे (तक्ता क्र.०२ प्रमाणे) प्राप्त झालेले आहेत. सदर मोजमापानुसार मा.शासनाचे दि.२७ जानेवारी,२०१६ रोजीचे शासन निर्णयानुसार, सेवाआकार शुल्क सुधारीत करणेकामी खालील प्रमाणे प्रस्तावित करणेत येत आहे.

(तक्ता क्र.०२)

| अं. क्र | इमारतीचे नाव | प्रत्येकी एक निवासस्थान चटई क्षेत्र (चौरस फुट) | सध्या आकारण्यात येणारे सेवाआकार शुल्क दर (रु.) | सुधारीत सेवाआकार शुल्क दर (रु) |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईनगर | २१७.०५ | १२.०० | ११०.०० |
| ०२ | समर्पन | १८५.०८ | १२.०० | ९५.०० |
| ०३ | साईध्यान | २८७.३१ | **४ थ्या आयोगानुसार** | १३५.०० |
| | | | (१४००-२३००) रु.११५.०० | |
| | | | (१३५०-२२००,१२००-२०४०) **रु.७५.००** | |
| | | | (९५०- १५०० वं त्याखालील वेतनश्रेणीतील कर्मचारी ) **रु.६०.००** | |
| ०४ | साईचिंतन०१,०२,०३,०४, | ४२८.१३५ | १५०.०० | २४५.०० |
| ०५ | साईस्मरण ०१,०२,०३, | ६५०.०० | १५०.०० | ३२५.०० |
| ०६ | साईसहवास०१,०२,०३,०४, | ६२७.५८ | १५०.०० | ३२५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७ | निमगांव कोहाळे, A,B,C,D, E,F,G,H, | २८१.३२ | वर्ग ०४ कर्मचारी (रु.२२५०-३२००) रु.१००.०० | १३५.०० |
| | | | वर्ग ०३ कर्मचारी (रु.३०५०-४५९०, ४०००-६०००, ४५००-७०००) रु.१२५.०० | |
| | | | स्टाफ नर्स/इतर (५०००-८०००,५५००-९०००) रु.१५० | |
| | | | मॅनेजर व इतर (६५००-१०५००) रु.२००.०० | |

तरी उपरोक्त प्रस्तावित केलेनुसार निवासस्थानांचा सेवाआकार शुल्क सुधारित करणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचा-यांना देण्यात येणा-या निवासस्थानांचे सेवाआकार शुल्क शासन निर्णयानुसार नव्याने निश्चीत करुन लागू करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं. ३८ डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेतंर्गत संस्थानमधील सफाई कर्मचा-यांना मालकी तत्वावर मोफत सदनिका देणेबाबत.**

प्रस्ताव- (अ) मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली शिर्डी स्थित संस्थान कार्यालयात आरोग्य विभागाकडे (पुर्वीचे स्वच्छता विभागाकडे)कार्यरत असणा-या स्थायी (कायम) व कंत्राटी स्वच्छता कर्मचा-यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोई-सुविधा व इतर अनुषंगिक बाबींसाठी दिनांक १६/०९/२०१५ रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीस संस्थान व्यवस्थापनामार्फत मा.कार्यकारी अधिकारी महोदय व इतर वरिष्ठ अधिकारी तसेच संस्थान आस्थापनेवर काम करणारे स्वच्छता कर्मचारी (वर्ग ०४) उपस्थित होते.

या बैठकीचे इतिवृत्तामध्ये, "All the Sanitary employees should be given their own houses under Central Govt.Dr.B.R.Ambedkar Housing Scheme. Report should be provided to Sanitary Commission" असे नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानंतर पुन्हा दिनांक १३/०१/२०१६ रोजी मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची श्री साईबाबा संस्थानचे स्वच्छतेबाबत व सफाई कर्मचा-यांबाबत सभा संपन्न झाली. या सभेस संस्थान व्यवस्थापनामार्फत मा.कार्यकारी अधिकारी महोदय व इतर वरिष्ठ अधिकारी तसेच संस्थान आस्थापनेवर काम करणारे स्वच्छता कर्मचारी (वर्ग ०४) उपस्थित होते. सदर सभेत दि.१६/०९/२०१५ रोजी झालेल्या बैठकीतील उपरोक्त विषयावर चर्चा झाली व सदर चर्चेत सर्व सफाई कर्मचा-यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर योजनेअंतर्गत मालकी हक्काचे निवासस्थान बांधून देणेबाबत त्वरीत कार्यवाही करुन कार्यवाहीची प्रत आयोगास पाठविणेबाबत ठरले.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-आरोग्य/५७८९/२०१६, दिनांक १९ जानेवारी, २०१६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र पाठवून संस्थानचे पात्र सफाई कर्मचा-यांना सदरची योजना लागू करणेबाबत उचित मार्गदर्शन करणेबाबत विनंती करण्यात आली असता मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्र.सासंवि-१०१६/१९८/प्र.क्र.३२/का.१६, दि.२२/०२/२०१६ अन्वये, "श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून संस्थानच्या सफाई कर्मचा-यांना मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याच्या निर्देशाबाबत नगरविकास विभागाच्या दि.२२/१०/२००८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार काटेकोरपणे पडताळणी करुन, याबाबत त्रिसदस्यीय व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये निर्णय घेऊन उचित प्रस्ताव शासनास सादर करावा," असे कळविलेले आहे.

(ब) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:सकानि-२००७/प्र.क्र.१७६/२००७/नवि-६, दि.२२ ऑक्टोबर, २००८ चे शासन निर्णयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना राबविण्याचा निर्णय झालेला आहे.

या निर्णयात, "राज्यातील नगरपालिकेतील/ महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ठ स्वरुपाचे काम विचारात घेऊन ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीच्या वेळी किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यु झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्यांच्या पात्र वारसास महानगरपालिकेकडून/ नगरपालिकेकडून मालकी हक्काने २६९ चौ.फुट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत वाटप करण्यात याव्यात. सफाई कामगारांना याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येणा-या मोफत सदनिका अहस्तांतरणीय स्वरुपाच्या राहतील," अशी तरतुद आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: सकाक-२०१५/ सं.क्र.४२/नवि-३४, दि.१२ जून, २०१५ रोजीचे शासन निर्णयान्वये, महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायती यांच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या सद्याच्या सेवानिवासस्थानांच्या ठिकाणी सफाई कर्मचा-यांची निवासस्थाने तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेच्या निकषानुसार मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी ४.०० या कमाल चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणा-या सदनिकांपैकी ५०% सदनिका

सेवानिवासस्थाने म्हणून व उर्वरित ५०% सदनिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांना अथवा सेवेत मृत्यु झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यांनतर महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:सकाक-२०१५/सं.क्र.४२/नवि-३४, दि.२१ नोव्हेंबर, २०१५ पारीत झालेला असून त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना संदर्भातील शासन आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग दिनांक २२/१०/२००८ अन्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना लागू करण्यात असल्याने या आदेशाच्या दिनांकानंतर ज्या सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार व दिनांक २२/१०/२००८ नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले आहेत अशा मृत सफाई कामगारांचे पात्र वारस या योजनेअंतर्गत पात्र असतील.

(२) दिनांक २२/१०/२००८ नंतर सेवेत असताना ज्या सफाई कामगारांना वैद्यकीय अधिका-यांनी पुढील सेवेसाठी वैद्यकीय कारणास्तव असमर्थ ठरवून रुग्णता सेवानिवृत्त केले आहे, अशा सफाई कामगाराचा पात्र वारस सेवेत असेल व त्या पात्र वारसाच्या सेवानिवृत्तीच्या वेळेस त्यांची पात्र सेवा २५ वर्षे होत नसेल तर रुग्णता सेवानिवृत्त केलेल्या सफाई कर्मचा-यांनी केलेल्या पात्र सेवेचा कालावधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत लाभ देण्यासाठी २५ वर्षाची पात्रता ठरविण्याकरीता विचारात घेता येईल.

**(क)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मादाय संस्था असून महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे नियंत्रणाखाली संस्थानचे कामकाज चालते. उपरोक्त 'ब' मध्ये नमुद डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना संदर्भातील महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाच्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता सदरची योजना ही फक्त राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी लागू असल्याचे दिसून येते.

तसेच संस्थानमध्ये कार्यरत असणा-या सर्व वर्ग-०४ कर्मचा-यांचा एकच संवर्ग आहे. त्यात मदतनीस, शिपाई, सफाई कर्मचारी, वॉर्डबॉय, आया, सुरक्षारक्षक व इतर पदांचा समावेश आहे. सदर कर्मचा-यांच्या एका विभागातून दुस-या विभागात बदल्या केल्या जातात, अशी कार्यपध्दती आहे. मंजुर आकृतीबंधानुसार पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आलेले असून ते मा.व्यवस्थापन समितीची मंजूरी घेऊन शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहेत. त्यानंतर पदांचे संवर्ग तयार करावयाचे आहेत. त्यावेळी सफाई कामगार हा स्वतंत्र संवर्ग तयार करणेचे प्रयोजन आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास संस्थानचे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झालेले ०४ कर्मचारी असून ते सध्या सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच आरोग्य विभागात सेवेत असताना ०२ सफाई कामगार उपरोक्त शासन निर्णयाच्या दिनांकानंतर (दिनांक २२/१०/२००८) मयत झालेले आहेत.

उपरोक्त सेवानिवृत्त झालेले ०४ सफाई कर्मचारी व संस्थान सेवेत असताना मयत झालेले ०२ सफाई कर्मचारी यांचे पात्र वारसास डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत मोफत सदनिका उपलब्ध करुन द्याव्या लागतील. याकामी बांधकाम विभाग व मालमत्ता विभाग यांचेमार्फत जागा, बांधकाम व त्यासाठी येणा-या खर्चाच्या रकमेची तरतुद करावी लागेल.

तरी उपरोक्त शासन निर्णयानुसार राज्यातील नगरपालिका/ महानगरपालिकातील सफाई कर्मचा-यांना लागू असलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना संस्थानमधील सफाई कर्मचा-यांना लागू करुन पात्र सफाई कर्मचा-यांना मोफत सदनिका उपलब्ध करुन द्याव्यात किंवा कसे? याबाबतचा निर्णय होणेस विनंती.

मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार उचित प्रस्ताव महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागास सादर करता येईल.

निर्णय क्र.३०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना संदर्भातील महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाच्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता सदरची योजना ही फक्त राज्यातील महानगरपालीका/नगरपालीका या स्थानिक स्वराज्य संस्थासाठी असून संस्थानला लागू होत नाही, असे दिसून येते. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं. ३९ **अत्यावश्यक प्रसंगी आय.टी.आय.चे विद्यार्थ्यांना सेवेचे मानधन देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना आवश्यक त्या पायाभूत सेवा सुविधा पुरविण्याचे कार्य केले जाते. वर्षभरात श्री साईबाबांचे हयातीपासून रामनवमी, गुरूपौर्णिमा, पुण्यतिथी असे उत्सव साजरे करण्यात येतात. तसेच साई सत्चरित्र पारायण, दिपावली, नाताळ सुट्टी, ३१ डिसेंबर या दिवशी शिर्डीमध्ये लाखोंच्या संख्येने भाविक येत असतात. अशा वेळी साईभक्तांना सेवा पुरविणारे वर्ग-४ संवर्गातील कर्मचारी अपुरे पडतात. तसेच ऐनवेळी लेबर कॉन्ट्रॅक्टरकडे मागणी करुनही पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होत नाही. याकामी आवश्यकतेनुसार संस्थानचे आय.टी.आय. कडील विद्यार्थ्यांकडून तात्पुरत्या स्वरुपात काम करून घेतले जाते.

यापुर्वी अशा स्वरुपात आय.टी.आय.कडील विद्यार्थ्यांकडून कमवा व शिका योजनेअंतर्गत वेळोवेळी काम करुन घेण्यात आलेले आहे. तसेच या कामापोटी विद्यार्थ्यांना संस्थानचे कायदेशीर सल्लागार, श्री.अशोक पाटील, अहमदनगर यांचे अभिप्रायानुसार व मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०५/२००७ मधील निर्णय क्र.४०४ नुसार प्रति दिनी रु.१००/- प्रमाणे मानधन अदा करण्यात येत आहे.

परंतु सदरचे मानधन हे अगदीच त्रोटक स्वरुपाचे असल्याने तसेच सध्याचा महागाईचा काळ विचारात घेता अल्पशा मानधनावर विद्यार्थ्यांकडून काम करुन घेणे उचित नाही. सद्यस्थितीत संस्थानला लेबर कॉन्टॅक्टर मार्फत पुरविणेत येणा-या अकुशल कर्मचा-यांना किमान वेतन दर रु.२८२.८४ अदा करणेत येत आहे. त्याधर्तीवरच संस्थान मार्फत साजरे होणारे विविध उत्सवात तसेच शिर्डीमध्ये होणा-या गर्दीचे काळात ज्या ज्या वेळी आय.टी.आय.कडील विद्यार्थ्यांच्या सेवा घेण्यात येतील, त्या त्या वेळी त्यांना प्रतिदिनी रु.२८२.८४ इतके मानधन संस्थानमार्फत अदा करता येईल. तसेच यापुढे वेळोवेळी अकुशल कर्मचा-यांच्या किमान वेतन दरात होणा-या बदलानुसार आय.टी.आय.कडील विद्यार्थ्यांना मानधन अदा करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मार्फत साजरे होणारे विविध उत्सव व गर्दीचे कालावधीमध्ये ज्या-ज्या वेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील विद्यार्थ्यांच्या सेवा घेणेत येतील त्या-त्या वेळी त्या विद्यार्थ्यांना प्रति दिनी रु.२००/- मात्र सेवेचे मानधन देणेत यावे. तसेच विनम्र व गरजु विद्यार्थ्यांनाच सेवेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी/ प्राचार्य, आय.टी.आय.)

---

| | |
|---|---|
| **विषय नं. ४०** | **गोदरेज टेबल खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.** |
| **विषय नं. ४१** | **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Cell Counter Machine (Cell 210) खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं. ४२** | **इलेक्ट्रोलाईट एनालॉइझरचे K Electrode व ISE Printer Model खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं. ४३** | **श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्ड या विभागाकरीता Portable LED Dome खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं. ४४** | **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयातील फर्निचर खरेदी करणे बाबत.** |
| **विषय नं. ४५** | **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डायलेसीस विभागाकरीता डायलेसीस चेअर खरेदीबाबत.** |
| **विषय नं. ४६** | **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.1 या विभागाकरीता Instrument खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं. ४७** | **श्री साईबाबा रुग्णालयातील Dental O.P.D. या विभागाकरीता Equipment खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं. ४८** | **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. या विभागाकरीता Co,Electronic Endoflator खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.४९** | **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता Instrument खरेदी करणेबाबत. (अ व ब )** |
| **विषय नं.५०** | **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी.या विभागाकरीता Light Source with Head Lamp जुने Buyback करुन नवीन खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५१** | **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine बायबॅक करुन नविन मशिन खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५२** | **CVTS OT-H, CRU-III, GICU व डायलेसि विभागातील यु.पी.एस.करीता बॅटरीज खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५३** | **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Refrigerated Blood Bag Centrifuge Machine जुने Buyback (परत) करुन नवीन खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५४** | **यु.व्ही.एअर स्टरीलायझरचे दुरुस्तीबाबत.** |
| **विषय नं.५५** | **मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे (withdraw) घेणेबाबत.** |
| **विषय नं.५६** | **श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पासाठी ISO,Security,IT Service Management System, Website Quality, Bio-metric Device Testing, software & system Etc., बाबत केद्र शासनाचे STQC (Standardisation Testingn and Quality Certification) पुणे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद घेणेबाबत.** |
| **विषय नं.५७** | **संस्थान प्रकाशीत कै.शिवराम ठाकूर लिखीत साईसतचरित्र हिंदीचा काश्मिरी भाषेत अनुवाद करणेबाबत.** |
| **विषय नं.५८** | **संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरित-मराठी पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे रंगीत फोटो दर्शन लाईनमध्ये लावणेकरीता स्विकारणेबाबत.** |
| **विषय नं.५९** | **व्दारावती भक्तनिवास इमारत कारंजाकरीता आवश्यक इले.मोटार व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.६०** | **श्री सदगुरु नारायणगीरीजी गुरुकुल, बाभळेश्वर ता.राहाता, जि.अहमदनगर येथील विद्यार्थ्यास मोफत भोजन देणेबाबत.** |
| **विषय नं.६१** | **श्री साईप्रसादालयातील स्टे.स्टील ताटे बफींग करणेस मान्यता मिळणेबाबत.** |
| **विषय नं.६२** | **खोल्यामध्ये छोटे साबण पुरविणेबाबत.** |
| **विषय नं.६३** | **लॉन्ड्रीतील जुने मशिन बायबॅक देऊन नविन अत्याधुनिक मशिनरी अशंत: देणगी स्वरुपात स्विकारणे व उर्वरीत रक्कम अदा करणेबाबत.** |
| **विषय नं.६४** | **गाद्या खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मागे घेणेबाबत व प्रकरण निरस्त करणेबाबत.** |

| | |
|---|---|
| विषय नं.६५ | साईधर्मशाळा विभागातील खोल्यांसाठी ऑनलाईन बुकींग सुविधा सुरु करणे व सेवा आकार बाबत. |
| विषय नं.६६ | लोखंडी कपाटे खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबत. |
| विषय नं.६७ | श्री.टी.सुब्बारेड्डी, सिकंदराबाद यांचे निर्देश वजा सुचना पत्राबाबत. |
| विषय नं.६८ | जुनी वाहने जाहीर लिलावाने विक्री करणे बाबत. |
| विषय नं.६९ | न्यासाच्या /समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापराबाबत. |
| विषय नं.७० | आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये केलेल्या गुंतवणुकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये होणा-या गुंतवणूकीस मान्यता मिळणे बाबत. |
| विषय नं.७१ | शांतीनिवास दर्शन हॉलमधील गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्लायडींग गेट तयार करणेबाबत. |
| विषय नं.७२ | श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ, बनविणेचे पातेलेवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टीलच्या जाळीचे झाकणे बनविणेबाबत. |
| विषय नं.७३ | श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचे प्रमाणे संस्थानचे प्रसादालय किचनसाठी अद्ययावत मशिनरी खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.७४ | आय.एस.ओ. ऑडीटर यांनी साईआश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसविणेबाबत दिलेल्या सुचना. |
| विषय नं.७५ | स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच टाईप पोल यांना रंगकाम करणेबाबत. |
| विषय नं.७६ | संस्थानचे विविध विभागांना झेरॉक्स पेपर रिम खरेदी करणेबाबत. |
| विषय नं.७७ | जाहिरात खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.७८ | धर्मशाळा परिसरातील व्दारावती इमारत समोरील बागेतील चिल्ड्रेन पार्क मध्ये नवीन खेळणी बसविणेबाबत. |
| निर्णय क्र.३०४ | वेळेअभावी उपरोक्त विषय नं.४० ते ७८ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. |

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणेत आली.

आयत्या वेळेचा

**विषय नं.०१** **श्री रामनवमी उत्सव- २०१६ करीता सांस्कृतिक कार्यक्रम व कुस्त्यांचे फड आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** सौ.अनिताताई विजयराव जगताप, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी तसेच अध्यक्ष, यात्रा कमिटी यांनी दि.२८/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये "शिर्डी शहरात सालाबादाप्रमाणे याही वर्षी शिर्डी शहरातील सर्व ग्रामस्थांनी रामनवमीचा उत्सवाचे आयोजन केलेले आहे. तरी सदरचा उत्सव साजरा करण्यासाठी ग्रामस्थांनी गावामध्ये लोकवर्गणी गोळा केलेली असून आपणही दरवर्षी प्रमाणे याही वर्षी साईभक्तांची पार्कीग व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतरही सर्व व्यवस्था कराव्यात तसेच साईबाबा संस्थानकडून १५ लाख रुपयांचा निधी दयावा म्हणजे कुस्त्या, लावणी कार्यक्रम, तमाशा मंडळ व इतर सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाचे व्यवस्थीतरित्या नियोजन केले जाईल तसेच या निमित्त सर्व ग्रामस्थांनी बैठकीचे ही आयोजन केलेले आहे. तरी साईबाबा संस्थानने या रामनवमी कार्यक्रमासाठी रु.१५ लाख रुपये निधी द्यावा, अशी विनंती केलेली आहे.

त्याच प्रमाणे दिनांक २८/०३/२०१६ रोजी संस्थानचे सभागृहात शिर्डी ग्रामस्थांच्या बैठकीत ही ग्रामस्थांनी श्री रामनवमी उत्सव – २०१६ चे अनुषंगाने, संस्थानमार्फत विविध सोयी-सुविधा करणेबाबत सुचित केलेले आहे. त्यामध्ये श्रीरामनवमी उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कुस्त्यांच्या फंडासाठी सुमारे १५,००,०००/- मात्र रक्कम आवश्यक आहे, तरी सदरचा निधी श्री रामनवमी उत्सवासाठी संस्थानकडून मिळावा अशी आग्रहाची विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७९ नुसार "श्री रामनवमी उत्सव-२०१६ साजरा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. ७७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाचे आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी" असा पारीत झालेला आहे. सदर निर्णयानुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस सादर करणेत आलेल्या दिवाणी अर्जास आहे. दिनांक १८/०३/२०१६ रोजी मान्यता मिळालेली

श्री रामनवमी उत्सव- २०१६ करीता मंजूर करणेत आलेल्या अंदाजित खर्च रुपये ७७,००,०००/- मात्र या रक्कमेत रु.७,००,०००/- मात्र कुस्ती हंगामा या शीर्षाखाली तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि आता, वर परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे शिर्डी ग्रामस्थ व यात्रा कमिटीने कुस्त्यांचे आयोजनासह सांस्कृतिक कार्यक्रमासाठी जादा तरतूद म्हणून रुपये ८,००,०००/- मात्र मंजूर करावेत म्हणून विनंती केलेली आहे.

श्री रामनवमी उत्सव – २०१६ चे अंदाजित खर्चात रुपये ७,००,०००/- मात्र इतकी रक्कम कुस्ती हंगामासाठी मंजूर करणेत आलेली आहे. त्यामुळे आता, शिर्डी ग्रामस्थ व यात्रा कमिटीने वर परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे कुस्त्यांसह सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रक्कम रुपये १५,००,०००/- मात्रची मागणी केलेली आहे. गतवर्षी म्हणजे सन २०१५ चे श्री रामनवमी उत्सवाकरीता सुरुवातीस रुपये ७,००,०००/- मात्र नंतर वाढीव रक्कम रुपये २,७५,०००/- अशी एकूण रक्कम रुपये ९,७५,०००/- मंजूर करणेत आलेली आहे.

तरी श्री रामनवमी उत्सव– २०१६ मध्ये शिर्डी ग्रामस्थांमार्फत आयोजित करणेत येणा-या कुस्त्यांसह सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मा.व्यवस्थापन समितीसह मा.न्यायालयाने कुस्ती हगामासाठी मंजूर केलेल्या रुपये ७,००,०००/- मात्र या रक्कमे व्यतिरिक्त जादा रक्कम रुपये ८,००,०००/- मात्र (म्हणजेच एकूण रक्कम रुपये १५,००,०००/- मात्र) श्री रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांना मंजूर करणेत यावी किंवा कसे याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव– २०१६ चे अंदाजपत्रकास मा.उच्च न्यायालयाची मंजुरी घेण्यात आलेली असून त्या अंदाजपत्रकामध्ये कुस्ती हगाम्यासाठी रु.७,००,०००/- मात्र खर्चास मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिलेली असल्यामुळे शिर्डी ग्रामस्थांनी जादा मागणी केलेली रु.८,००,०००/- मात्र रक्कम त्यांना देता येणार नाही, असे ठरले.** (कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी-०५)

---

वरील निर्णय क्र.२६५ ते ३०५ सर्वानुमते घेण्यात आले.
सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | प्रमुख जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**